# नाना पाटेकर अनंतात विलीन



## महाराष्ट्र हळहळला, डोळे पाणावले!

### डोणजे गावात भावपूर्ण वातावरणात 'नटसम्राटा'ला शेवटचा निरोप

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार ९ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





पुणे/प्रतिनिधी : अभिनय क्षेत्रातील लाडकं व्यक्तिमत्व आणि ख-याखु-या आयुष्यातील 'नटसम्राट' अशी ख्याती असलेले ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर अनंतात विलीन झाले. पुणे जिल्ह्यातील डोणजे येथील त्यांच्या फार्महाउसवर शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या लाडक्या अभिनेत्याला डोळे भरून शेवटचा निरोप देण्यासाठी आणि अंतिम दर्शन घेण्यासाठी डोणजे गावात हजारोंचा जनसमुदाय लोटला होता. अश्रू ढाळत आणि जड अंतःकरणाने संपूर्ण महाराष्ट्राने या महान कलावंताला अखेरचा निरोप दिला. नाना पाटेकर यांचा मुलगा मल्हार याने त्यांना मुखाग्नी दिली. त्यावेळी 'नाना पाटेकर अमर रहे' अशा घोषणा उपस्थित असलेल्यांनी दिल्या. नाना पाटेकरांच्या अकाली एक्झिटनं मनोरंजनसृष्टीला मोठा धक्का बसला आहे.

गोव्यातील दोना पावलामधील निवासस्थानी नाना पाटेकरांना हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्यांना मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या या अकाली एक्झिटमुळे मराठी रंगभूमीसह संपूर्ण भारतीय चित्रपटसृष्टीला मोठा धक्का बसला आहे. निधनाचे वृत्त समजताच गोव्याहून नाना पाटेकरांचे पार्थिव विशेष एअर ॲम्ब्युलन्सद्वारे पुणे विमानतळावर आणण्यात आले. तिथून रस्तेमार्गे पार्थिव त्यांच्या डोणजे येथील फार्महाउसवर अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले. नानांच्या निधनाची बातमी पसरताच अवघा महाराष्ट्र हळहळला आणि चाहत्यांनी डोणजे गावाकडे धाव घेतली.

आजचा अग्रलेख/पान ४
'नटसम्राट' पडद्यामागे
श्रध्दांजली/पान ३
नाना ते 'नाम'/पान ७

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती- नाना पाटेकरांना अंतिम निरोप देण्यासाठी आणि श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी राजकीय, सामाजिक आणि चित्रपट क्षेत्रातील दिग्गज मान्यवर डोणजे गावात उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रामदास आठवले, सुनील तटकरे, माधुरी मिसाळ, आमदार गोपीचंद पडळकर, अर्जुन खोतकर, (पान २ वर)

## नाना पाटेकर यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन

मुंबई : भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ आणि प्रतिभावंत अभिनेते विश्वनाथ पाटेकर, म्हणजेच नाना पाटेकर यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. गोव्यातील त्यांच्या निवासस्थानी ते अचानक बेशुद्ध अवस्थेत आढळले. कुटुंबीयांनी आणि सहका-यांनी त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले, मात्र डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतरही त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या अकस्मात जाण्याने केवळ मराठी किंवा हिंदी चित्रपटसृष्टीच नव्हे, तर संपूर्ण देश एका महान कलाकाराच्या आणि संवेदनशील माणसाच्या विरहाने हळहळत आहे. नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनयाची सुरुवात रंगभूमीवरून केली आणि पुढे जाउन त्यांनी चित्रपटसृष्टीत स्वतॉचे एक वेगळे स्थान निर्माण केले. संवादफेकीची अनोखी शैली, डोळ्यांतील तीव्रता आणि कोणत्याही भूमिकेत पूर्णपणे उतरण्याची क्षमता ही त्यांची खरी ताकद होती. परिंदा, क्रांतिवीर आणि अग्निसाक्षी यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या उत्कृष्ट अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांनी गौरवण्यात आले. त्याशिवाय नटसम्राट चित्रपटातील आप्पासाहेब बेलवलकर यांची त्यांची भूमिका मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात अजरामर झाली. वेलकम, ब्लफमास्टर आणि अपहरण यांसारख्या चित्रपटांतून त्यांनी आपल्या अष्टपैलू अभिनयाची चुणूक दाखवून दिली. चित्रपटसृष्टीतील योगदानासोबतच नाना पाटेकर हे त्यांच्या सामाजिक बांधिलकीसाठी ओळखले जात होते. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील शेतक-यांच्या मदतीसाठी त्यांनी अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासोबत नाम फाउंडेशनची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून हजारो शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत, विहिरींचे खोदकाम आणि पाण्याचे पुनर्भरण यांसारख्या कामांतून मोठा आधार मिळाला.त्यांच्या निधनाची बातमी समजताच कला, राजकीय, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्तकेले आहे. एका तडफदार अभिनेत्यासोबतच सामान्यांच्या दुःखात धावून जाणारा एक सच्चा माणूस गमावल्याची भावना सर्वांकडून व्यक्त केली जात आहे. नाना पाटेकर यांच्या निधनाने भारतीय कला आणि सामाजिक विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

- महत्त्वाचे सन्मान आणि पुरस्कार- नाना पाटेकर हे फिल्मफेअरच्या इतिहासात सर्वोत्कृष्ट अभिनेता, सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता आणि सर्वोत्कृष्ट खलनायक हे तिन्ही श्रेणीतील पुरस्कार जिंकणारे एकमेव अभिनेते ठरले आहेत.
- पद्मश्री पुरस्कार (२०१३): कला आणि चित्रपट क्षेत्रातील योगदानाबद्दल केंद्र सरकारकडून सन्मानित.
- राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारः
  परिंदा (१९८९) - सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता
  क्रांतिवीर (१९९४) - सर्वोत्कृष्ट अभिनेता
  अग्निसाक्षी (१९९६) - सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता
- इतर सन्मानः फिल्मफेअर पुरस्कार (हिंदी व मराठी), राज्यशासन पुरस्कार आणि दीनानाथ मंगेशकर पुरस्कार यांसारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे.
- सामाजिक कार्य नाम फाउंडेशन
  चित्रपट कारकिर्दीसोबतच नाना पाटेकर यांनी सामाजिक भान जपले. अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासोबत त्यांनी नाम फाउंडेशनची स्थापना केली. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकरी, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे आणि पाणीटंचाईने ग्रस्त गावांना मदत करण्याचे मोठे कार्य या संस्थेमार्फत केले जाते.
- नाना पाटेकर यांची कारकीर्द- नाना पाटेकर (विश्वनाथ पाटेकर) हे भारतीय चित्रपटसृष्टी आणि नाट्यसृष्टीतील एक अतिशय प्रभावशाली, अष्टपैलू आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असणारे अभिनेते आहेत. आपली तडफदार संवादफेक, नैसर्गिक अभिनय आणि सामाजिक बांधिलकी यामुळे त्यांनी चित्रपटसृष्टीत एक स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.
- रंगभूमीवरून सुरवात आणि सुरुवातीचा काळ- नाना पाटेकर यांच्या कारकिर्दीची सुरवात मराठी रंगभूमीवरून झाली. हसवाफसवी, हमीदाबाईची कोठी, आणि पुरुष यांसारख्या प्रसिद्ध नाटकांतून त्यांनी आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली. नाटकातील त्यांच्या कामगिरीने त्यांना चित्रपटसृष्टीचे दरवाजे उघडे करून दिले.
- चित्रपटांतील पदार्पण आणि सुवर्णकाळ -१९७८ मध्ये गमन या हिंदी चित्रपटातून त्यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर मराठी आणि हिंदी दोन्ही भाषांत त्यांनी वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या.

## नानांची अकाली 'एक्झिट' मनाला चटका लावणारी-मुख्यमंत्री

मुंबई : मराठी तसेच हिंदी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे गुरुवारी (८ ऑक्टोबर) हृदयविकाराच्या झटक्याने निधन



झाल्याचे समोर आले आहे. या निधनाच्या बातमीने फक्त सिनेमासृष्टीतच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझे निकटचे मित्र नाना पाटेकर यांची अशी अकाली आणि अचानक एक्झिट मनाला मोठा धक्का देणारी असल्याचे म्हंटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करत म्हटले की, ज्येष्ठ अभिनेते आणि माझे निकटचे मित्र नाना पाटेकर यांची अशी अकाली आणि अचानक एक्झिट मनाला मोठा धक्का देणारी आहे. मन प्रचंड दुःखी आहे. नाना जितके पडद्यावर मोठे, तितकेच मनाने सुद्धा मोठे होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांनी एक कालखंड दिला. त्यातून प्रामुख्याने एक राष्ट्रभक्त अशीच त्यांची प्रतिमा प्रेक्षकांना भावली. क्रांतिवीर ते नटसम्राट या त्यांच्या प्रवासात जो दमदार आणि कसदार अभिनयाचा पट त्यांनी उभा केला, त्याला तोड नाही. त्यामुळे अभिनेता म्हणून त्यांचे जाणे ही मोठी हानी आहे.परखडपणा, बेधडकपणा हे स्वभावगुण त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलवणारे ठरले. पण मी मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांच्यातील हळवा माणूस कायम पाहत आलो आहे. असे म्हणत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## त्र्यंबकेश्वर मंदिर २ महिने दर्शनासाठी बंद

नाशिक - सिंहस्थ कुंभमेळ्याची घटिका समीप येत असताना संथपणे सुरू असलेली विकासकामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी त्र्यंबकेश्वर मंदिर दोन महिने भाविकांच्या दर्शनासाठी बंद ठेवण्याचा प्रस्ताव आहे. या कालावधीत मंदिरातील पूजा-अर्चा सुरू राहणार असून, भाविकांसाठी दर्शन तात्पुरते बंद असेल. यासंदर्भातील अंतिम तारीख विश्वस्त मंडळाच्या निर्णयानंतर निश्चित करण्यात येणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याचा ध्वजारोहण सोहळा ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथे दर्शन पथ, अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, कुशावर्तासह अन्य तीर्थ व प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार, घाटांची उभारणी, फरशी बदलणे, गोदावरी प्रवाही करण्याची योजना, अशी एकाचवेळी अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. दर्शन पथासाठी शासकीय इमारती जमीनदोस्त केल्या जात आहेत. अन्य कामांसाठी विविध रस्त्यांवर खोदकाम सुरू आहे. भाविकांची मोठी गर्दी असल्याने या कामांमध्ये अडथळे येत असून, स्थानिकांनाही त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. कुशावर्त तीर्थ परिसरातील कामे ध्वजारोहणापूर्वी पूर्ण करणे आवश्यक असल्याने अलीकडेच हे तीर्थ ३१ ऑक्टोबरपर्यंत भाविकांसाठी बंद करण्यात आले आहे.

### सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय!

## पंजाबमधील निवडणुका रद्द, फेरमतदानाचे आदेश

नवी दिल्ली/वृत्तसंस्था :सध्या देशभरात निवडणूक प्रक्रिया, निवडणूक



आयोग, आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याबाबत चर्चा सुरू आहे. निवडणूक आयोगातील निर्णयांमध्ये अनियमितता असल्याचा दावा करत देशभरात आंदोलन सुरू आहे. याचदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने एक मोठा निर्णय देत एका राज्यातील काही निवडणुका पुन्हा घेण्याचे आदेश दिले आहेत. पंजाबमधील पतियाळा आणि मोगा जिल्ह्यांमधील ५० नगरपालिका प्रभागांमध्ये (म्युनिसिपल वार्ड) झालेल्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयाने रद्द ठरवल्या आहेत. या सर्व ५० प्रभागांमध्ये पुढील सहा आठवड्यांच्या आत नव्याने मतदान प्रक्रिया पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जोयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या माजी

## केंद्रीय पथकाचा आजपासून दुष्काळी पाहणी दौरा

मुंबई/प्रतिनिधी : खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतर मंत्रालयीन पथक राज्याच्या दौ-यावर आले आहे. पथक अकरा ऑक्टोबरपर्यंतच्या या दौ-यात राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेणार आहे. पाउस, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चा-याच्या स्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे.

केंद्राच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल पथकाचे प्रमुख आहेत. केंद्र शासनाच्या कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग आणि अन्य संबंधित विभागांतील प्रशासकीय आणि तांत्रिक अधिका-यांचा पथकात समावेश आहे. सह्याद्री अतिथीगृहात केंद्रीय



पथकातील सदस्यांबरोबर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. अग्रवाल यांनी पावसाच्या कमतरतेमुळे महाराष्ट्रातील काही भागांत निर्माण झालेली पाणी टंचाई, टँकरची संभाव्य गरज, शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर व जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांची स्थलांतराची शक्यता आणि शेतकरी आत्महत्या या बाबींकडे केंद्रीय पथकाचे लक्ष वेधले. मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव विनिता वेद-सिंगल यांनी राज्यातील पावसाची स्थिती, अल निनोमुळे हवामान आणि पावसावर झालेले परिणाम तसेच शेती पिकांच्या नुकसानीची सविस्तर माहिती दिली.

कृषी विभागाच्या वतीने सचिव परिमल सिंह आणि आयुक्तसुरज मांढरे यांनी राज्यातील पिकांच्या नुकसानीची आणि जिल्हानिहाय परिस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती केंद्रीय पथकासमोर मांडली. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयुक्त ड?. किरण पाटील यांनी जनावरांच्या चा-याची सद्यस्थिती तसेच आगामी सात महिन्यांसाठीच्या संभाव्य परिस्थितीची माहिती दिली. पाणी पुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन, भूजल सर्वेक्षण व विकास आयुक्त रवींद्र खेबुडकर, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जलसंधारण (पान २ वर)

## जमिनीच्या वादातून पोटच्या मुलानेच संपवले कुटुंब

## आई, भाऊ अन् पुतण्याची चाकूने भोसकून निर्घृण हत्या!

बुलढाणा/चिखली:-बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील सोमठाणा येथे गुरुवारी ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी उशिरा जमिनीच्या वादातून एकाच कुटुंबातील तिघांची धारदार चाकूने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. जन्मदात्या आईसह सख्खा भाऊ आणि केवळ २५ वर्षांच्या निष्पाप पुतण्याचा जीव घेणाऱ्या या घटनेमुळे संपूर्ण जिल्हा रक्ताच्या नात्याला कलंक लावणाऱ्या या प्रकाराने हादरून गेला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सोमठाणा येथील रहिवासी असलेल्या सुरडकर कुटुंबात गेल्या काही दिवसांपासून शेतीच्या कारणावरून तीव्र वाद सुरू होते. गुरुवारी सायंकाळी याच वादाने अत्यंत हिंसक वळण घेतले. संशयित आरोपी दीपक फत्तेसिंह सुरडकर याने रागाच्या भरात घरातच कौटुंबिक सदस्यांवर धारदार चाकूने हल्ला चढवला.

या भीषण हल्ल्यात आरोपीची ७० वर्षीय वृद्ध माता सरस्वती फत्तेसिंह सुरडकर, सख्खा भाऊ संजय फत्तेसिंह सुरडकर (वय ५५ वर्ष) आणि पुतण्या रणजीत संजय सुरडकर (वय २५ वर्ष) या तिघांचाही जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडून मृत्यू झाला. एकाच वेळी तिघांचा जीव घेताना आरोपीला आपल्या वृद्ध मातेचीही दया आली नसल्याने घडलेल्या घटनेने सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.



**हत्येमागील धक्कादायक कारण-** प्राथमिक तपासात आणि गावकऱ्यांमध्ये असलेल्या चर्चेनुसार, आईने आरोपी दीपकच्या हिश्श्याची शेती त्याचा लहान भाऊ संजय याच्या नावावर केली होती. याच शेतीच्या वाटणीचा राग दीपकच्या मनात धुमसत होता. काल सायंकाळी हाच वाद विकोपाला गेला आणि दीपकने संपूर्ण कुटुंबाचाच काटा काढला.

**सोमठाणा गावात शोककळा; आरोपी फरार-** घटनेची माहिती मिळताच चिखली पोलीस ठाण्याचे पथक तातडीने सोमठाणा गावात दाखल झाले. घटनेचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलीस अधिकारी, श्वान पथक आणि ठसेतज्ज्ञांचे पथकही घटनास्थळी पाचारण करण्यात आले असून पोलिसांनी पुरावे संकलित करण्यास सुरुवात केली आहे. या तिहेरी हत्याकांडानंतर संशयित आरोपी दीपक सुरडकर घटनास्थळावरून पसार झाला आहे. चिखली पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी विविध पथके रवाना केली असून परिसरातील नाकेबंदी वाढवण्यात आली आहे. या घटनेमुळे सोमठाणा गावात प्रचंड भीतीचे आणि दुःखाचे वातावरण पसरले असून संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. चिखली पोलीस या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहेत.

## छोट्या चुकांसाठी मोठी कारवाई नाही अधिका-यांचे अटक करण्याचे अधिकार रद्द, GST परिषदेचा मोठा निर्णय

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : व्यापारी आणि करदात्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ५७व्या GST कौन्सिलच्या बैठकीत कर नियमांशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. छोट्या चुका किंवा विलंबासाठी व्यापा-यांवर होणारी अनावश्यक कठोर कारवाई कमी करणे हा या बदलांचा मुख्य उद्देश आहे. GST कायद्यांतर्गत कर अधिका-यांकडे असलेला करदाते किंवा इतर व्यक्तींना अटक करण्याचा अधिकार पूर्णपणे रद्द करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. नव्या निर्णयानुसार, सामान्य स्वरूपाच्या चुकांमध्ये कारवाई कराची वसुली, व्याज आणि प्रमाणानुसार दंड यापुरती मर्यादित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय, अभियोजनाची मर्यादा १ कोटी रुपयांवरून ५ कोटी रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे ५ कोटी रुपयांपेक्षा कमी रकमेच्या संबंधित प्रकरणांमध्ये थेट अभियोजनाची कारवाई होण्याची शक्यता कमी होणार आहे. तसेच, किमान शिक्षेची तरतूदही हटवण्यात आली आहे. दंड किंवा



कारावासाची शिक्षा द्यायची की नाही, याचा निर्णय आता न्यायालयीन विवेकावर अवलंबून राहणार आहे.

**सामान्य दंड २५ हजारांवरून १० हजार रुपये-** एखाद्या विशिष्ट चुकीसाठी स्वतंत्र दंडाची तरतूद नसल्यास आकारला जाणारा सामान्य दंड कमी करण्यात आला आहे. हा दंड २५ हजार रुपयांवरून १० हजार रुपये करण्यात आला आहे. त्यामुळे विशेषतः छोट्या व्यापा-यांना आणि करदात्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. एखाद्या करदात्याने रिटर्न उशिरा भरला, काही चूक केली किंवा कर भरण्यास विलंब झाला, तर त्याच्याकडून कराची वसुली, व्याज आणि प्रमाणानुसार दंड आकारला जाईल. मात्र, सामान्य परिस्थितीत त्याच्यावर अतिरिक्तकठोर कारवाई केली जाणार नाही. कौन्सिलने छोट्या कर प्रकरणांबाबतही (पान २ वर)









जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# हर्षवर्धन देशमुख शरदरत्न शिक्षण व जनसेवा पुरस्काराने सन्मानित



**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षण, कृषी आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे माजी कृषीमंत्री हर्षवर्धन देशमुख यांना शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान, मुंबई यांच्यातर्फे 'शरदरत्न शिक्षण व जनसेवा विशेष पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले

रवींद्र नाट्यमंदिर मुंबई येथे काल झालेल्या एका सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'कृषी, शिक्षण आणि जनसेवा या तिन्ही क्षेत्रात आपण केलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. माजी कृषी मंत्री म्हणून शेतकरी हित, कृषी विकास आणि ग्रामीण प्रगतीसाठी आपण सातत्याने केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीच्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कारक्षम पिढी घडविणे आणि समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी आपण दिलेले योगदान अत्यंत मोलाची आहे. आपल्या दूरदर्शी नेतृत्वाने कृषी आणि शिक्षण या समाजाच्या दोन क्षेत्रात महत्त्वाच्या आधारस्तंभांना अधिक बळकटी मिळाली आहे. सार्वजनिक जीवनातील आपली कार्यनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे आपण अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरला आहात,' या शब्दात श्री हर्षवर्धन देशमुख यांच्या कार्याचा या समारंभात गौरव करण्यात आला. शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे आयोजित या भव्य सोहळ्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला भजन सम्राट कोयना रत्न ह.भ.प. राजाराम बुवा शेलार, उपाध्यक्ष भावनाताई घाणेकर, संस्थेचे कार्याध्यक्ष गणेश पाटील सचिव एच. बी जंगम आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती.

शाल ,श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# वन्यजीव सप्ताहात १३१ सापांना जीवदान

## -दोन माकडे, नीलगायीचे पिलू, तीन घोरपडींसह वटवाघळे व पक्ष्यांचेही रेस्क्यू -'वॉर' संस्थेचा उपक्रम



**अमरावती/प्रतिनिधीः** पावसाळ्यात मानवी वस्तीत शिरलेल्या सरपटणाऱ्या प्राण्यांसह विविध वन्यजीवांचे प्राण वाचविण्यासाठी वाईल्ड लाईफ अव्हरनेस रिसर्च ॲण्ड वेल्फेअर सोसायटी (वॉर) ने वन्यजीव सप्ताहात विशेष मोहीम राबविली. १ ते ७ ऑक्टोबरदरम्यान जिल्ह्यातील विविध भागांत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत तब्बल १३१ सापांना जीवदान देण्यात आले. याशिवाय दोन जखमी माकडे, नीलगायीचे एक पिलू, तीन घोरपडी, सात वटवाघळे आणि एका पक्ष्याचे रेस्क्यू करून त्यांना सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. अमरावती वनविभागाचे उपवनसंरक्षक के. आर. अर्जुन आणि सहाय्यक उपवनसंरक्षक मयूर भैलुमे ज्ञानेश्वर देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. वनविभागाच्या रॅपिड रेस्क्यू टीमसह वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल व कर्मचाऱ्यांनी वन्यजीवांना कोणतीही इजा होणार नाही, याची काळजी घेत त्यांना सुरक्षितस्थळी हलविले. मोझरी, अनकवाडी, तिवसा, माहुली जहागीर, सावर्डी, जुना धामणगाव, कमनापूर, हनुमान टाऊन, सोनेगाव, खरडा, कावली, वासड, सुपरवाडा, आर्वी, जडगाव, तरोडा, वाटोडा, पारसोडी रोड, ब्राह्मणवाडा भगत, देवरी, नांदुरा पिंडई, गोराडा, ब्राह्मणवाडा गोविंदपूर, एमआयडीसी, जेवडनगर, मेहरबाबा कॉलनी, निंभोरा, राजापेठ, मंगलधाम कॉलनी, चिमटे लेआउट, फरशी स्टॉप, रुख्मिणीनगर, मुढलकर पेठ, न्यू कॉलनी, गोपालनगर, एसआरपीएफ कॅम्प, वलगाव, अकोली आदी भागांत सापांसह विविध वन्यजीव आढळून आले. माहिती मिळताच 'वॉर'च्या कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेत वनविभागाच्या सहकार्याने त्यांचे रेस्क्यू केले.

अनकवाडी व तळेगाव ठाकूर परिसरात दोन अजगरांचेही रेस्क्यू करण्यात आले. या अजगरांनी नीलगायीचे तसेच बकरीचे पिलू गिळल्याचे निदर्शनास आले होते. 'वॉर'चे अध्यक्ष निलेश कांचनपुरे यांनी वनविभागाच्या मदतीने या अजगरांना सुरक्षितपणे पकडून त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडले. याशिवाय विविध ठिकाणी आढळून आलेल्या तीन घोरपडी, सात वटवाघळे, एक नीलगायीचे पिलू, एक पक्षी आणि दोन जखमी माकडांचेही रेस्क्यू करण्यात आले. जखमी वन्यजीवांबाबत वनविभागाला माहिती देऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली.

या मोहिमेत 'वॉर'चे अध्यक्ष निलेश कांचनपुरे यांच्यासह अभिजीत दाणे, शुभम विखे, समीर नेवारे, निखिल उईके, रुपेश नेवारे, सौरभ वानखडे, सुयोग झाडे, महेश नेव्हीया, ओ. वानखडे, ओम गवळी, भूषण निकोसे, सुमेध वानखडे, केशव गवळी, संकेत मते, पवन दिवगडे, साहिल चावके आदींनी परिश्रम घेतले. ऋतिक उईके व वंश यावले यांनीही मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

**विषारी साप संख्या -** १९ नाग, ३ मण्यार ,७ घोणस, ,निमविषारी , भारतीय अंडे खाऊ साप २, मांजरा साप २ ,१ हरणटोळ ,बिनविषारी २८ धामण, ९कवड्या, २८ दिवड, २ तस्कर, ६ गवत्या, १६ अजगर, २ मंडुळ, १पोवळा, २माकड ,३घोरपड, ७ वटवाघूळ, एक नीलगाय पिलू, मानवी वस्तीत मुख्य विषारी साप आढळून आले.

### वन्यजीव आढळल्यास काय कराल?

लोकवस्तीत साप अथवा अन्य वन्यजीव आढळल्यास नागरिकांनी घाबरून जाऊ नये किंवा त्यांना मारण्याचा प्रयत्न करू नये. वन्यजीवांना इजा न करता तातडीने वनविभागाच्या १९२६ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच 'वॉर' संस्थेच्या ९५७९१११०१७, ९७६६१६९१७४ या क्रमांकावरही माहिती देता येईल.

**—निलेश कांचनपुरे, वॉर संस्था**

# १ व १० वरिल उर्वरित

## नाना पाटेकर अनंतात विलीन

रु पाली चाकणकर, सदाभाउ खोत आणि उदय सामंत यांनी उपस्थित राहून पुष्पचक्र अर्पण केले. अभिनेते मकरंद अनासपुरे, नागराज मंजुळे, नीना कुलकर्णी, प्रवीण तरडे, सुरेश वाडकर, पुरु षोत्तम बेर्डे, सुशांत शेलार, लेखक अरविंद जगताप यांच्यासह 'नाम' (NAAM) फाउंडेशनचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केंद्रीय पथकाचा आजपासून

विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, रोजगार हमी योजनेचे सचिव अप्पासाहेब धुळाज आदींनी आपआपल्या विभागाचे सादरीकरण केले. आगामी सात महिन्यांतील संभाव्य परिस्थितीची माहिती दिली.**अहिल्यानगर, सोलापूरमध्ये करणार पाहणी-** केंद्रीय पथक आज, शुक्रवारी अहिल्यानगर जिल्ह्यात अहिल्यानगर, कर्जत तालुक्यांत बाजरी, तूर आणि सोयाबीन पिकाची पाहणी करेल. शनिवारी सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, सांगोला तालुक्यांत डाळिंब, उस, मका, तूर पिकांसह पाणी टंचाई, टँकरने होणा-या पाणी पुरवठ्याची आणि रोजगार हमीच्या कामाची पाहणी करणार आहे.

## अधिका-यांचे अटक करण्याचे अधिकार

महत्त्वाचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. १० हजार रु पये किंवा त्यापेक्षा कमी रकमेच्या प्रकरणांमध्ये GST नोटीस जारी केली जाणार नाही. तसेच, अशा स्वरू पाच्या जुन्या प्रलंबित नोटिसाही मागे घेण्याचा प्रस्ताव आहे. नोटीस आणि पुढील कारवाईसाठी संपूर्ण देशात समान निकष लागू करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

## २१ गोवंशांची सुटका; दोघे संशयित

त्यानंतर गुन्हे शाखेचे पथक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसह संबंधित ठिकाणी पोहोचले. प्लॉटवरील टिनाच्या शेडमध्ये पाहणी केली असता ११ गोवंश आखूड दोराने अमानुषपणे बांधून ठेवलेले आढळले. या जनावरांना चारापाणी देण्यात आले नव्हते, तसेच त्यापैकी काही जनावरे जखमी अवस्थेत होती. शेडच्या मागील मोकळ्या जागेतही आणखी १० गोवंश आखूड दोराने निर्दयतेने बांधून ठेवल्याचे आढळून आले. पंचांसमक्ष सर्व २१ गोवंश जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या जनावरांची अंदाजे किंमत ३ लाख ३० हजार रुपये आहे. जप्त गोवंशांना देखभाल व संरक्षणासाठी दस्तुरनगर येथील गोरक्षण संस्थानमध्ये हलविण्यात आले आहे. याप्रकरणी नागपुरी गेट पोलिस ठाण्यात संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर

होणार असून, दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. नवरात्रोत्सवादरम्यान शहरातील विविध ठिकाणी रास गरबा व दांडिया नृत्याचे कार्यक्रमही आयोजित केले जाणार आहेत. २० ऑक्टोबरपासून दुर्गादेवी विसर्जनाला सुरुवात होणार आहे. दरम्यान, विविध उपोषण, आंदोलन अथवा निदर्शने होण्याची शक्यता पाहता कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली आहे.

## बालगृहातील तीन मुलींच्या कुटुंबाचा

किलो,उंची १३५ सेमी आणि वर्ण सावळा आहे. ती फक्त तुरळक हिंदी शब्द बोलते.सद्य: स्थितीत तिला मोझरी येथील मतीमंदाच्या शाळेत पाठविण्यात आले आहे. बालिकेच्या कुटुंबियांचा शोध घेण्याबाबत भातकुली पोलीस स्टेशनला कळविण्यात आले आहे.

सोनी अकील यादव ही बालिका जबलपूर रेल्वे मध्ये एकटी भटकतांना आढळल्याने तीला अमरावती रेल्वे पोलिसांमार्फत बालगृहात दाखल करण्यात आले. सोनीचे वडील रेल्वेतून पडून त्यांचा मृत्यू झाल्याचे तर आई सोडून गेल्याचे ती सांगते. गावाचे नाव उत्तर प्रदेशातील सिद्धार्थनगर येथील कुडीयागाव वस्का बाजार तर जवळच्या पोलीस स्टेशनचे नाव इटावा सांगते. बालीकेचे २९ सप्टेंबर २०२४ रोजी मरीयमपूर येथे स्थानांतरण करण्यात आले.१५ सप्टेंबर २०२६ रोजी ती होली क्रॉस बाल शिक्षण केंद्र अमरावती येथून न सांगता निघून गेली.ती नागपूर येथे पोलीसांना आढल्यानंतर शासकीय मुलींच्या बालगृहात दाखल करण्यात आले.

## परतवाड्यात धक्कादायक घटनेने

आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या वृद्धास तातडीने पुढील उपचारासाठी रुग्णालय, अचलपूर येथे दाखल करून नंतर शस्त्रक्रियेसाठी अमरावती येथे दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळाचा पंचनामा परतवाडा पोलिसांनी केला आहे. पोलिसांना आधार कार्ड मिळून आले आहे. त्या वृध्द व्यक्तीची संपूर्ण माहिती पुढील तपासात पोलिस करणार आहे तसेच हा हल्ला होता का ? की त्या वृद्धाने हे पाऊल उचलले ? हे पोलिस तपासात समोर येणार आहे.

## SIR प्रक्रियेविरोधात इंडिया आघाडीचा

सहभागी झाले होते. यावेळी निवडणूक आयोग व शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

या आंदोलनाचे नेतृत्व माजी मंत्री ॲड.यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध ऊर्फ बबलू देशमुख, माजी मंत्री सुनील देशमुख, माजी आमदार वीरेंद्र जगताप, शहर काँग्रेस अध्यक्ष बबलू शेखावत, विलास इंगोले, मिलिंद चिमोटे आदींनी केले.

मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर पोहोचल्यानंतर पोलिसांनी आंदोलकांना गेटवरच थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आंदोलकांनी कार्यालयाच्या आवारात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याने काही काळ पोलिस आणि आंदोलकांमध्ये शाब्दिक वाद झाला. त्यानंतर आंदोलक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात पोहोचले.

यावेळी इंडिया आघाडीच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. SIR प्रक्रियेदरम्यान मतदारांची नावे वगळण्याच्या संपूर्ण प्रक्रियेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, पात्र मतदारांची नावे तातडीने पुनर्नोंदणीत आणावीत, मतदारांना आक्षेप नोंदविण्याची पुरेशी संधी द्यावी तसेच मतदार यादीतील बदलांची माहिती पारदर्शकपणे उपलब्ध करून द्यावी, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीबाबत उपस्थित करण्यात आलेल्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून दोष आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. तसेच निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता व घटनात्मक स्वायत्तता सुनिश्चित करण्याबरोबरच नागरिकांच्या मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करण्याची मागणी करण्यात आली.काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमिततेविरोधात आवाज उठविल्याचा उल्लेख करत, आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस कारवाईचीही इंडिया आघाडीने निषेध केला. लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार अबाधित ठेवावा, अशी मागणीही करण्यात आली.SIR प्रक्रियेतील कथित अनियमितता, मतदारांच्या हक्कांचा प्रश्न आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत उपस्थित झालेल्या मुद्द्यांकडे शासनाने गांभीर्याने पाहावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. 'लोकशाही वाचवा, संविधान वाचवा, मतदारांचा अधिकार वाचवा', अशा घोषणा देत आंदोलन करण्यात आले.यावेळी माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी मंत्री सुनील देशमुख, खासदार बळवंत वानखडे बबलु देशमुख, माजी आमदार वीरेंद्र जगताप, बबलु शेखावत,विलासराव इंगोले, मिलिंद चिमोटे, डॉ.राजीव जामठे (शहर जिल्हाध्यक्ष शरद पवार गट), अनिल जळमकर( जिल्हाध्यक्ष शरद पवार गट) सुनील मेटकर (जिल्हा सचिव भाकप), AISF च्या राज्य सचिव प्रतीक्षा ढोके, हरिभाऊ मोहोड, कांचनमाला गावंडे,प्रदीप देशमुख, प्रकाश काळबांडे,मुकद्दर खाँ पठाण, शैलेश गवई, प्रवीण मनोहर, हरेराम मालवीय,प्रमोद दाळू,किशोर देशमुख, नामदेव तनपुरे, अरविंद लंगोटे, प्रदीप देशमुख,राहुल येवले,सुनील गावंडे,संजय बेलोकर,पप्पू होले, मुकुंद देशमुख, अभय देशमुख,गजानन देशमुख, शैलेश मालवीय, नितेश वानखडे, गौरव वैद्य, हेमंत येवले, राजा खान, भूषण कोकाटे, श्रीकांत झोडपे, विपुल भडांगे, विलास बोरेकर, अमोल चिमोटे, वैभव वानखडे,कैलास आवारे,मोहन सिंघवी, चंदू डहाणे, अमोल देशमुख इत्यादी उपस्थित होते.

## खून प्रकरणात आरोपीची

यांनी २२ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या निर्णयात आरोपी क्र. १ शरद कुमारे यांच्यासह तिन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. आरोपी क्र. १ च्या बचावासाठी ॲड. प्रकाश एम. देशमुख यांनी केलेल्या युक्तिवादामुळे या प्रकरणात बचाव पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडली गेली.

## दर्यापूर ज्वेलर्स दरोडा टोळीवर

पद्धतीने गुन्हे करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचा पोलिसांचा दावा आहे. हिंसा, हिंसेची धमकी, जबरदस्ती अथवा अन्य बेकायदेशीर मार्गांचा वापर करून मागील सुमारे दहा वर्षांपासून संघटित गुन्हेगारी कारवायांमध्ये सहभागी असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. वर्चस्व प्रस्थापित करणे तसेच आर्थिक लाभ मिळविणे हा टोळीचा उद्देश असल्याचेही पोलिसांच्या कारवाईत नमूद आहे.या टोळीच्या कारवायांना आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी दर्यापूर पोलिसांना मकोका अंतर्गत कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार दर्यापूर पोलिसांनी दरोड्याच्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम २३ (१) (अ) अंतर्गत कलमवाढ करण्याचा प्रस्ताव विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील, अमरावती परिक्षेत्र यांच्याकडे सादर केला. प्रस्तावाची पडताळणी केल्यानंतर विशेष पोलिस महानिरीक्षकांनी मकोका कलम २३ (१) (अ) अंतर्गत कलमवाढीस मंजुरी दिली.

## हातभट्टी दारू विक्रेता एक वर्षासाठी

यांनी जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांना दिले होते. या पार्श्वभूमीवर बेनोडा पोलिस ठाण्याने अवैध हातभट्टी दारूची निर्मिती व विक्री करणाऱ्या तसेच परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या अतुल खंडाळे याच्याविरुद्ध महाराष्ट्र धोकादायक व्यक्तींच्या घातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबतच्या अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव तयार केला. हा प्रस्ताव पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्याकडे सादर करण्यात आला. प्रस्तावाची पडताळणी केल्यानंतर तो जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे पाठविण्यात आला. प्रस्तावाची छाननी करून जिल्हाधिकाऱ्यांनी ६ ऑक्टोबर २०२६ रोजी खंडाळे याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचा आदेश जारी केला. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या तसेच गुन्हेगारी कारवायांमध्ये सक्रिय असलेल्या व्यक्तींवर यापुढेही कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे ग्रामीण पोलिसांकडून सांगण्यात आले. सण-उत्सवांच्या काळात अवैध दारूविक्री आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून विशेष लक्ष दिले जात आहे.

## मनपा कार्यालयातील लाचखोर

या घराची कर आकारणीची पावती आपल्या नावावर करून घेण्यासाठी तक्रारदाराने ६ ऑगस्ट २०२६ रोजी महापालिकेच्या झोन क्रमांक ३ कार्यालयात अर्ज केला होता. त्यानंतर १८ सप्टेंबर रोजी तक्रारदार कार्यालयात गेले असता, कनिष्ठ लिपिक भागीरथ खैरकर यांनी कर आकारणीची पावती नावावर करून देण्यासाठी १ हजार ५०० रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने ७ ऑक्टोबर रोजी एसीबीकडे याबाबत तक्रार केली. त्यानंतर एसीबीच्या पथकाने ८ ऑक्टोबर रोजी तक्रारीची गोपनीय पडताळणी केली. त्यावेळी खैरकर यांनी १ हजार ५०० रुपये लाचेची मागणी केल्याचे तसेच ती स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे पडताळणीत निष्पन्न झाल्याचे एसीबीने सांगितले. त्यानंतर एसीबीच्या पथकाने दुपारच्या सुमारास सायन्सकोर मैदान परिसरातील जिल्हा परिषद शाळेसमोर सापळा रचला. पंचांच्या उपस्थितीत तक्रारदाराने खैरकर यांच्याकडे १ हजार ५०० रुपये दिल्यानंतर दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्यांना तत्काळ ताब्यात घेतले. खैरकर यांच्या ताब्यातून लाचेची १ हजार ५०० रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली. खैरकर यांच्याविरुद्ध सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या प्रकरणात त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई एसीबीचे पोलिस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलिस अधीक्षक सुनील किनगे आणि पोलिस उपअधीक्षक राजेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधीक्षक मंजूषा भोसले, मोहन ठाणेकर, उपेंद्र थोरात, सतीश किटुकले तसेच चालक गोवर्धन नाईक यांच्या पथकाने केली.

## मुदत संपलेली २४१ बिस्किटांची

जनता पान सेंटरची तपासणी केली. दुकानातील विक्री व्यवहार पाहणाऱ्या मनशाउल रहेमान शेख मेहबुब सौदागर यांच्या संमतीने दुकानाची झडती घेण्यात आली. त्यावेळी मुदत संपलेल्या बिस्किटांचा साठा आढळून आला. मुदत संपलेली बिस्किटे दुकानात आढळून आल्याने ती ग्राहकांच्या विक्रीसाठी उपलब्ध होती का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे संबंधित बिस्किटांची अंतिम वापर तारीख ऑगस्टमध्येच संपली होती. त्यामुळे मुदत संपल्यानंतरही हा साठा दुकानात का ठेवण्यात आला, याचा तपास अन्न प्रशासनाकडून केला जात आहे. दुकानमालकाने हा माल सुमारे तीन महिन्यांपूर्वी फिरत्या विक्रेत्याकडून खरेदी केल्याचे अधिकाऱ्यांना सांगितले. मात्र, या मालाच्या खरेदीची बिले उपलब्ध नसल्याचेही तपासणीत समोर आले.

**२३७ पाकिटांचा केला नायनाट-** अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी चारही प्रकारच्या बिस्किटांचे प्रत्येकी एक नमुना पुढील तपासणीसाठी ताब्यात घेतला. उर्वरित २३७ पाकिटांचा २ हजार ३७० रुपये किमतीचा साठा पंचांसमक्ष नष्ट करण्यात आला. बिस्किटांची पाकिटे फोडून त्यातील खाद्यपदार्थ नष्ट करून कचऱ्यात टाकण्यात आला. मुदत संपलेले खाद्यपदार्थ ग्राहकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतात. त्यामुळे या प्रकरणात अन्न व औषध प्रशासनाकडून पुढील कायदेशीर कारवाईकडे लक्ष लागले आहे.

## दस्तूर नगरजवळ आढळला तरुणाचा

झाले होते. मात्र, काही वेळानंतर प्रकरणाचा उलगडा झाल्यावर प्राथमिक अंदाजानुसार, संबंधित तरुणाचा मृत्यू गंभीर आजारामुळे झाला असावा आणि तीन तास एकाच ठिकाणी पडून तडफडल्यानंतर त्याचा मृत्यू झाला असावा, असे सांगण्यात येत आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केलेली आहे राजापेठ आणि गुन्हे शाखेचा पथक संयुक्त तपास करत आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुनील हा मिक्सर दुरुस्तीचे काम करत होता आणि बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजता नेहमी प्रमाणे कामाच्या शोधात घरून अमरावतीला आला होता. रात्री उशिरापर्यंत तो घरी न परतल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध सुरू केला, मात्र त्याचा थांगपत्ता लागला नाही. त्यानंतर गुरुवारी सकाळी दस्तूर नगर चौकाजवळ त्याचा मृतदेह पडलेला आढळला. मृतदेह सापडल्यानंतर सुरुवातीला घटनेबाबत संशय निर्माण झाला होता. सुनीलच्या शरीराच्या खालच्या भागावर रक्त लागलेले होते. मात्र, पोलिसांच्या तपासात आणि सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर प्रकरणाचे वेगळे चित्र समोर आले. कुटुंबीयांशी झालेल्या चर्चेतून असेही समोर आले की, सुनीलला आधीपासूनच यकृताचा त्रास आणि पोट फुगण्याची समस्या होती.माहितीनुसार, बुधवारी दुपारपर्यंत सुनील त्याच्या काही मित्रांसोबत दस्तूर नगर चौक परिसरातच होता. नंतर त्याचे मित्र तेथून निघून गेले. त्यानंतर सुनीलची तब्येत बिघडू लागली आणि तो कथितरित्या सुमारे तीन तास एकाच ठिकाणी पडून होता. याच दरम्यान त्याच्या शरीरातून रक्तस्त्राव झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे त्याचे कपडे रक्ताने माखले होते. बराच वेळ त्याच अवस्थेत पडून राहिल्यानंतर त्याचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, मृत्यूचे खरे कारण शव विच्छेदन अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

# बांधकाम मजुरांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**अमरावती/प्रतिनिधीः-** बांधकाम कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी तिवसा तालुक्यातील बांधकाम मजुरांनी आज गुरुवार ८ ऑक्टोंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी संतप्त मजुरांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जोरदार घोषणाबाजी करीत राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाचा निषेध केला. बांधकाम कामगार योजनांसंदर्भात १३ जुलै २०२६ रोजी जारी करण्यात आलेली चारही परिपत्रके बेकायदेशीर असल्याचा आरोप संघटनेने केला. ही चारही परिपत्रके तातडीने रद्द करून लोकसेवा हमी हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी मोर्चेकऱ्यांनी केली.बांधकाम मजुरांना दिवाळी बोनस म्हणून दहा हजार रुपये जाहीर करून त्याचे तातडीने वाटप करावे, शैक्षणिक सहाय्य योजना पूर्ववत सुरू करावी, तसेच आरोग्य व वैद्यकीय सहाय्य योजनांची अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय बांधकाम कामगारांसाठी विवाह सहाय्य योजना आणि गृहनिर्माण योजना सुरू करावी, तालुकास्तरावर बांधकाम साहित्याचे वाटप करावे, अशीही मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. मोर्चा दरम्यान मजुरांनी विविध मागण्यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी केली. शासनाने बांधकाम कामगारांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून प्रलंबित योजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाकडे सादर करण्यात आले असून, शासनाने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. मोर्चामध्ये मजुरांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

## सुधाकर मारुडकर यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** मूळ अमरावती येथील तसेच सध्या पिंपरी-चिंचवड परिसरातील पिंपळे सौदागर येथील रहिवासी सुधाकर बकाराम मारुडकर (वय ८४) यांचे बुधवारी (दि. ७) रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. ते अमरावती येथील बीएसएनएलमधून सिनीअर टेलीग्राम ऑफीसर या पदावरून निवृत्त झाले हाते. त्यांच्या पश्चात पत्नी आशा, मुलगा आशुतोष, मुलगी शीतल तसच जावई आणि नातवंडे असा आप्त परिवार आहे.



## रमेशराव रावणगावकर यांचे निधन

**मोर्शी/प्रतिनिधीः-** गांधी चौक येथील रहिवासी रमेशराव रावणगावकर यांचे आज अमरावती येथील हॉस्पिटलमध्ये दुपारी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुल,दोन मुली असून आज त्यांच्यावर अंतिम संस्कार होणार आहे. निधनाने एक कर्तव्यनिष्ठ सैनिक, कष्टाळू शेतकरी, साहित्यप्रेमी आणि कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व आपण गमावले आहे.



त्यांनी केवळ भारतीय सैन्यात आपली सेवा बजावली नाही, तर शेतकरी म्हणून सक्रिय राहून कष्ट, प्रामाणिकपणा आणि स्वाभिमानाने आपले जीवन जगले. संपूर्ण रामायणाचा मराठी भाषेत अनुवाद करून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला एक अमूल्य साहित्यिक देणगी दिली. त्यांचे हे कार्य त्यांच्या विद्वत्तेचे, संस्कृतीवरील प्रेमाचे आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतीक आहे. देशसेवा, शेती, साहित्य आणि कुटुंबाप्रती असलेली जबाबदारी या सर्वच क्षेत्रांत त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा अमिट ठसा उमटवला.

## भास्करराव इंगोले यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** येथील भाजी बाजार, तारखेडा परिसरातील रहिवासी तसेच छायाचित्रकार प्रदीप इंगोले यांचे वडील भास्करराव आनंदराव इंगोले (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने इंगोले कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. भास्करराव इंगोले यांच्या पश्चात कुटुंबीय व आप्तस्वकीय असा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल विविध स्तरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.



अकोला । वाशिम । बुलडाणा

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ शुक्रवार, ९ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

## ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी इंडिया आघाडीचे आंदोलन

### अनुच्छेद ३२६ चे सामूहिक वाचन; 'ज्ञानेशकुमार हटाव, देश बचाव'च्या घोषणांनी परिसर दणाणला

■ प्रतिनिधी | अकोला ■

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील इंडिया आघाडीच्या आंदोलनाच्या धर्तीवर गुरुवारी अकोल्यातही इंडिया महाविकास आघाडीच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. शहीद मदनलाल धिंग्रा चौकात झालेल्या आंदोलनात घोषणाबाजी व नारेबाजी करीत ज्ञानेशकुमार यांना हटविण्याची मागणी करण्यात आली.



आंदोलनापूर्वी स्वराज्य भवन येथून इंडिया महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी हातात फलक घेऊन रॅली काढली. रॅली धिंग्रा चौकात पोहोचल्यानंतर 'ज्ञानेशकुमार हटाव, देश बचाव' अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी संविधानाच्या अनुच्छेद ३२६ चे सामूहिक वाचन करण्यात आले. प्रत्येक मतदाराच्या अधिकाराशी संबंधित या अनुच्छेदाला धक्का पोहोचविण्याचे काम ज्ञानेशकुमार, नरेंद्र मोदी व अमित शहा करीत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण, अकोला जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रकाश तायडे व महानगराध्यक्ष महेंद्र गवई यांच्या नेतृत्वात हे आंदोलन झाले. आंदोलनाला माजी मंत्री अजहर हुसेन, माजी आमदार बबनराव चौधरी, महेश गणगणे, अशोक अमानकर, प्रशांत पाचडे, निखिलेश दिवेकर, विजय देशमुख उगवेकर, माजी आमदार हरिदास भदे, शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश मुरूमकार, शहरप्रमुख आशिष गावंडे, अभय खुमकर, सुरेंद्र विसपुते, चंदू तिवारी, राजूभाऊ वरोकार, गजानन चौधरी, विकी इंगळे, गजानन फोनकर, अश्विन कपले, आपचे जिल्हाध्यक्ष कैलास प्रांजळे, शहराध्यक्ष मकसूद भाई, राष्ट्रवादीचे मोहम्मद युसूफ भाई, महमूद पठाण, मनसेचे पंकज साबळे, सौरभ भगत, रंजीत राठोड, प्रदीप मस्तूद, समाजवादी पार्टीचे इब्राहिम खालिद, काँग्रेसचे विजय तिवारी, मनीष मिश्रा, मो. इरफान, नगरसेवक मोईन खान, नगरसेवक तश्वर पटेल, प्रशांत प्रधान, गुड्डू पठाण, नगरसेवक मोहीम खान, नगरसेवक नावेद गवळी, नगरसेवक फिरोज आलियार खान, नगरसेवक हरीश कटारिया, रवी पाटणे, कशिश खान, यशोदाताई गायकवाड, किशोर अरुढकर, शुभम गोळे, सुनील चंदनबटवे, अतुल मानकर, दीपक गवई, प्रशांत वानखडे, राजकुमार वानखडे, मो. शकील शेख, अतुल खोटरे, स्वप्निल पाठक, श्रीकांत सरोदे, यसीन ऊर्फ बब्बू भाई, योगेश थोरात, राधे पेठकर, विजय पचारे, रवी पाटणे, शेख जाकीर, सै. जफर, सै. हसन, नगरसेवक सुनील वानखडे, संदेश वानखडे, योगेश शिराळे, पंकज काठोळे, हर्षित कांबळे, सोनू याकूफ खान, विशाल इंगळे, गणेश ताले, गौसिया खान यांच्यासह इंडिया पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ज्ञानेशकुमार हटाव, देश वाचवा; एसआयआर रद्द करा!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार 'लोकशाही वाचवा सप्ताह' आणि 'मत वाचवा–देश वाचवा' अभियानांतर्गत महाविकास आघाडीच्या वतीने गुरुवारी (८ ऑक्टोबर) वाशिम शहरात मोटारसायकल मोर्चा काढण्यात आला. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या मोर्चात महाविकास आघाडीतील विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### महाविकास आघाडीचा वाशिममध्ये मोटारसायकल मोर्चा; जिल्हाधिकाऱ्यांना संयुक्त निवेदन



दुपारी एक वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मोर्चाला सुरुवात झाली. त्यानंतर मोटारसायकल रॅलीद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय गाठण्यात आले. यावेळी 'ज्ञानेशकुमार हटाव, देश बचाव', 'एसआयआर रद्द करा' यासह विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे महाविकास आघाडीच्या वतीने सर्व सहभागी पक्षांच्या संयुक्त स्वाक्षरीचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले. यावेळी भारतीय संविधानातील कलम ३२६ चे सार्वजनिक वाचन करण्यात आले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात तात्काळ कार्यवाही करून अटक करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. तसेच त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून व पायदळी तुडवून निषेध व्यक्त करण्यात आला.

मोर्चाच्या समारोपावेळी राष्ट्रगीत घेण्यात आले. या आंदोलनात काँग्रेससह शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, संभाजी ब्रिगेड, आम आदमी पार्टी, भीमशक्ती तसेच अन्य समविचारी पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी, शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे जिल्हाध्यक्ष अमित खडसे, मनसे जिल्हाध्यक्ष राजू किडसे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गजानन भोयर, गजानन धामणे, प्रकाश कांबळे, ॲड. दिलीपराव सरनाईक, डॉ. सिद्धार्थ देवळे, गजानन देशमुख वडजीकर, डॉ. सुधीर कवर, किसनराव मस्के, कॅप्टन प्रशांत सुर्वे, राजू भांदुर्गे, मनीष भालेराव, ॲड. पी.पी. अंभोरे, गजानन खरात, परसरामजी भोयर, वैभव सरनाईक, मधुकर जुमडे, दिलीप देशमुख, शिवम वाघ, गजानन गोटे, नंदाताई गनोदे, मीनाताई वाठोरे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस उज्वल देशमुख यांनी केले. आभार प्रदर्शन जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचिव सुरेश रत्नपारखी यांनी केले.

## सह्याद्री मेडिकलचा औषध विक्री परवाना २० दिवसांसाठी निलंबित



**वाशिम :** पुसद नाक्याजवळील सह्याद्री मेडिकल, गुलाटी से-आऊट येथील औषध विक्री पेढीविरुद्ध प्राप्त तक्रारीची अन्न व औषध प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटी व नियम तसेच परवाना अटींच्या उल्लंघनाच्या अनुषंगाने संबंधित औषध विक्रेत्यास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर औषध विक्रीचा परवाना २० दिवसांसाठी निलंबित करण्यात आला आहे.

ब्राह्मणवाडा, ता. व जि. वाशिम येथील भागवत ज्ञानबा हिरवे यांनी सह्याद्री मेडिकलविरोधात तक्रार अर्ज सादर केला होता. या तक्रारीची दखल घेत अन्न व औषध प्रशासन, वाशिम कार्यालयाकडून ३ सप्टेंबर २०२६ रोजी संबंधित औषध विक्री पेढीची तपासणी करण्यात आली.तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटी, नियम व परवाना अटींच्या उल्लंघनाच्या अनुषंगाने संबंधित औषध विक्री संस्थेस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. नोटीसनंतर औषध विक्रेत्याकडून प्राप्त झालेला खुलासा तसेच चौकशीतील निष्कर्षांच्या आधारे औषधे व प्रसाधने कायदा, १९४० व नियम, १९४५ मधील तरतुदीनुसार औषध विक्रीचा परवाना २० दिवसांसाठी निलंबित करण्यात आला आहे.

ही कारवाई सहाय्यक आयुक्त (औषधे) अन्न व औषध प्रशासन, वाशिम कार्यालयाकडून करण्यात आली आहे. सह्याद्री मेडिकलच्या औषध विक्री व्यवसायावर प्रशासनाने थेट कारवाईचा बडगा उगारल्याचे स्पष्ट झाले आहे.

## रिसोड बाजार समितीत हळदीला विक्रमी भाव; १९ हजार ६०० रुपयांवर दर

■ प्रतिनिधी | रिसोड ■

कृषी उत्पन्न बाजार समिती, रिसोड येथे हळदीच्या दराने विक्रमी पातळी गाठली असून, हळदीला १९ हजार ६०० रुपये प्रति क्विंटल असा उच्चांकी भाव मिळाला. बाजार समितीत सध्या हळदीची मोठ्या प्रमाणात आवक होत असून, दर्जेदार मालाला बाजारात चांगली मागणी असल्याचे दिसून येत आहे.



रिसोडसह परिसरातील विविध गावांमधून शेतकरी हळद विक्रीसाठी बाजार समितीत आणत आहेत. आवक वाढलेली असतानाही दर्जेदार हळदीला मिळणाऱ्या चांगल्या दरामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. विक्रमी भावामुळे हळद उत्पादकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

याबाबत बाजार समितीचे संचालक रवी चोपडे म्हणाले, 'बाजार समितीत हळदीची मोठ्या प्रमाणात आवक होत असून, दर्जेदार हळदीला १९ हजार ६०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत भाव मिळाला आहे. शेतकऱ्यांनी स्वच्छ व प्रतवारी केलेला माल बाजार समितीत आणल्यास त्यांना चांगला दर मिळण्यास मदत होईल. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा, यासाठी बाजार समितीच्या माध्यमातून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.' हळदीच्या दरातील या वाढीमुळे आगामी काळातही चांगला भाव मिळण्याची अपेक्षा हळद उत्पादक शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

## कर्जमाफी यादीत नाव असूनही कर्जमुक्तीपासून वंचित!

### शेतकऱ्याची सहाय्यक निबंधक यांच्याकडे धाव

■ प्रतिनिधी | मानोरा ■

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या यादीत नाव आले असूनही एक शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहण्याची घटना समोर आली आहे. फार्मर आयडी नसल्याने थम केवायसी होत नसल्याने कर्जमाफी रखडली असल्याची तक्रार शेतकरी युवराज नथु जाधव यांनी सहाय्यक निबंधक यांच्याकडे केली आहे.

दिलेल्या अर्जात नमूद केले आहे की, मी आसोला खुर्द ठिकाणचा रहिवासी असून माझे वडील नामे नथ्थू बदु जाधव यांच्या नावानी मौजे गव्हा शिवारात शेत सर्व्हे नं. १२८ असा असून एकूण क्षेत्र २.४३ हे. आर. आहे. मी माझ्या वडिलांच्या ७/१२ उताऱ्यावर अंदाजे ६ वर्षांपूर्वी माझ्या वडिलांचे वय ८० वर्षांपेक्षा जास्त असल्यामुळे मी मुखत्यार पत्राद्वारे (दस्त क्र. ४९५/२०२०) माझ्या नावाने करून कर्ज घेतलेले आहे. तरी माझे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती यादीमध्ये नाव आलेले असून माझ्या नावानी शेत जमीन नसल्याकारणामुळे माझ्या नावानी आजरोजी फार्मर आयडी झालेली नाही.

## गुणवंत विद्यार्थी व नवनियुक्त कर्मचाऱ्यांचा मंगरूळपीरमध्ये सत्कार सोहळा उत्साहात



■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

वंजारी समाज सेवा समिती, मंगरूळपीर यांच्या वतीने गुरुवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी गुणवंत विद्यार्थी, नवनियुक्त शासकीय कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यास वाशीम जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, समाजातील ज्येष्ठ व प्रतिष्ठित नागरिक, समाजबांधव-भगिनी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या गुणवंत विद्यार्थी व नवनियुक्त शासकीय कर्मचाऱ्यांचा समाजाच्या वतीने यावेळी गौरव करण्यात आला. दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणारे विद्यार्थी, वैद्यकीय क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी तसेच शिक्षण, शासकीय सेवा आणि इतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. नवनियुक्त शासकीय कर्मचाऱ्यांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला समाजातील ज्येष्ठ नागरिक व विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. गुणवंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि गुणवंतांचा सन्मान करण्याची परंपरा अधिक बळकट व्हावी, हा या सोहळ्यामागील उद्देश असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

## मत्स्य व्यवसायातील शेतकरी व उद्योजकांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मत्स्य व्यवसाय व जलकृषी क्षेत्रातील शेतकरी, मत्स्य व्यावसायिक आणि संबंधित घटकांना केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना – मत्स्य क्षेत्रातील सूक्ष्म व लघु उद्योगांना सहाय्य योजना (PM-MKSSY) अंतर्गत राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय डिजिटल प्लॅटफॉर्म संदर्भात जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

ॲग्रीकल्चर स्किल कौन्सिल ऑफ इंडिया (ASCI) यांच्या सहकार्याने व ICAR-ATARI, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश मत्स्य व जलकृषी क्षेत्रातील लाभार्थ्यांना NFDP वर



नोंदणी, PM-MKSSY अंतर्गत उपलब्ध लाभ, अर्ज प्रक्रिया तसेच डिजिटल प्लॅटफॉर्मचा प्रत्यक्ष वापर याबाबत मार्गदर्शन करणे हा आहे.

या कार्यक्रमामध्ये मत्स्य उत्पादक, मत्स्यपालन करणारे शेतकरी, मत्स्य कामगार, मासे विक्रेते, मत्स्य व्यवसायिक व उद्योजक, FPO/FFPO, सहकारी संस्था, स्वयं-सहायता गट (SHGs), स्टार्टअप्स, सूक्ष्म व लघु उद्योग तसेच मत्स्य मूल्यसाखळीशी संबंधित इतर घटकांचा सहभाग अपेक्षित आहे.

## गांधी जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | कारंजा ■

गांधी जयंतीचे औचित्य साधून स्थानिक जे. डी. चवरे विद्यामंदिरात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शाळेचे व्यवस्थापक मंडळ व मुख्याध्यापकांच्या सूचनेनुसार दरवर्षी राबवल्या जाणाऱ्या सहशालेय उपक्रमाचा भाग म्हणून बुधवार, दिनांक ७ ऑक्टोबर रोजी सकाळ व दुपार अशा दोन्ही सत्रांत वर्ग ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा पार पडली. दोन्ही सत्रांच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्रीनिवास जोशी उपस्थित होते.



सकाळचे सत्र (वर्ग ५ वी ते ७ वी): सकाळच्या सत्रात वर्ग ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा रंगली. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे पर्यवेक्षक कैलास सोनुले उपस्थित होते, तर परीक्षणाची जबाबदारी पंकज संघई व विशाखा सोनोने यांनी उत्तमरीत्या सांभाळली. या सत्रात इयत्तानिहाय विविध विषयांवर एकूण २२ स्पर्धकांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले: वर्ग ५ वी (विषय: निसर्ग आपला मित्र): प्रथम क्रमांक – कु. परी सावदे, द्वितीय क्रमांक – कु. हिंदवी आजनकर. वर्ग ६ वी (विषय: व्यायाम, आहार पद्धती व स्वच्छता यांचे जीवनातील महत्त्व): प्रथम क्रमांक – शंभू तिवसकर, द्वितीय क्रमांक – अर्णवी जोगे. वर्ग ७ वी (विषय: मोबाईलचा योग्य वापर - आजची गरज): प्रथम क्रमांक – स्निग्धा आखाडे, द्वितीय क्रमांक – अमन राराणी. याप्रसंगी सोनुले सरांनी विद्यार्थ्यांना वक्तृत्व अधिक प्रभावी करण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन करून त्यांचे कौतुक केले. या सत्राचे सूत्रसंचालन वृंदा जोहरापूरकर यांनी केले, तर आभार निलेश मानकर यांनी मानले.

## डॉ.कपले यांना निसर्गोपचार गौरव सन्मान प्रदान

**अकोला :** शासकीय पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचे जीवरसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ प्रशांतकुमार म. कपले यांना पंचगव्य व गोआधारित उत्पादने या संदर्भातील शेतकरी प्रशिक्षण संशोधन व विस्तार यातील योगदानाबद्दल बुलडाणा येथे निसर्गोपचार गौरव सन्मान प्रदान करण्यात आला. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, एजीएमए व योग निसर्गोपचार चिकित्सक असोसिएशनतर्फे हा कार्यक्रम रविवारी झाला.

जाहिरात

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियान (MSRLM), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, बुलढाणा अंतर्गत मोताळा, लोणार, खामगाव, शेगाव तालुक्यात एकात्मिक शेती प्रभाग (IFC) प्रकल्पांतर्गत IFC Block Anchor ( ४ पदे) तसेच Senior CRP (वरिष्ठ समुदाय संसाधन व्यक्ती) ( १२ पदे) या दोन्ही पदांकरिता दि. १९/१०/२०२६ संध्याकाळी ०६:०० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. याबाबतची सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बुलढाणा तसेच तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष मोताळा, लोणार, खामगाव, शेगाव या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे.

**(पांडूरंग कोल्हे)**
प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं
तथा जिल्हा अभियान सहसंचालक उमेद
- म.रा.ग्रा. जी. अभियान बुलढाणा

## रुग्णालयाचा कारभार पारदर्शक करा; रुग्णांच्या हक्कांना सर्वोच्च प्राधान्य द्या

### डॉक्टर, विशेषज्ञ, रिक्त पदे, १६ विभागांसह सुरक्षा, स्वच्छता, भोजन व लॉन्ड्री व्यवस्थेची संपूर्ण माहिती सादर करण्याची संतोष धोंगडे यांची ठाम मागणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

उपजिल्हा रुग्णालयाच्या दारात येणारा प्रत्येक रुग्ण हा केवळ एक आकडा नसतो; तो आपल्या कुटुंबाच्या आशा-अपेक्षा घेऊन उपचारासाठी आलेला एक जीव असतो. त्यामुळे त्याला वेळेत, योग्य आणि सन्मानपूर्वक आरोग्य सेवा मिळणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नाही, तर रुग्णाचा मूलभूत हक्क आहे. याच रुग्णहिताच्या संवेदनशील भूमिकेतून रुग्ण कल्याण समितीचे सदस्य संतोष शेषराव धोंगडे यांनी उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे विविध महत्त्वपूर्ण बाबींची अद्ययावत व वस्तुनिष्ठ माहिती मागितली आहे.

आमदार सईताई प्रकाशदादा डहाके यांनी नामनिर्देशन केलेले रुग्ण कल्याण समिती सदस्य संतोष धोंगडे यांनी वैद्यकीय अधीक्षक तथा सदस्य सचिव, रुग्ण कल्याण समिती, उपजिल्हा रुग्णालय, कारंजा लाड यांच्याकडे निवेदन सादर करून रुग्णालयातील वैद्यकीय, प्रशासकीय व सहाय्यक सेवा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यासाठी माहिती



उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

#### रुग्णालयात किती डॉक्टर? कोणत्या विभागात कोणती सेवा?

रुग्णालयात सध्या किती वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत, त्यांची नावे व संपर्क क्रमांक, किती विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध आहेत, ते कोणत्या विभागात कार्यरत आहेत आणि त्यांच्याकडून रुग्णांना सेवा कोणत्या पद्धतीने दिली जाते, याची सविस्तर माहिती मागविण्यात आली आहे.त्याचबरोबर रुग्णालयातील रिक्त पदांची अद्ययावत माहिती सादर करण्याची मागणी करण्यात आली आहे. कारण डॉक्टर किंवा आवश्यक कर्मचारी उपलब्ध नसतील, तर त्याचा थेट परिणाम उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णावर होतो.

#### १६ विभागांचा कारभार आणि जबाबदारी स्पष्ट करा

उपजिल्हा रुग्णालयातील १६ विभागांची नावे, संबंधित विभागप्रमुखांची नावे व संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. कोणत्या विभागाची जबाबदारी कोणाकडे आहे, याची स्पष्ट प्रशासकीय माहिती उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे धोंगडे यांनी नमूद केले आहे.

#### सुरक्षा आणि स्वच्छता–रुग्णालयाच्या विश्वासाचा आधार

रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसोबत त्यांचे नातेवाईकही मोठ्या विश्वासाने रुग्णालयाच्या व्यवस्थेकडे पाहतात. त्यामुळे सुरक्षा रक्षकांची संख्या, नावे, संपर्क क्रमांक व ड्युटी लिस्ट, तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या, नावे, संपर्क क्रमांक व ड्युटी लिस्ट सादर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

रुग्णालय स्वच्छ असेल तर उपचाराच्या वातावरणात विश्वास निर्माण होतो; सुरक्षा सक्षम असेल तर रुग्ण आणि नातेवाईकांना मानसिक आधार मिळतो. त्यामुळे या दोन्ही बाबींकडे केवळ कंत्राटी किंवा नियमित प्रशासकीय काम म्हणून न पाहता रुग्णसेवेचा अविभाज्य भाग म्हणून पाहणे गरजेचे आहे.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३१२ ■ शुक्रवार, ९ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# आधी तहान भागवा, मग शेती; जिल्हाधिकाऱ्यांचा पाणीवापरावर दणका

## पाणी टंचाईत 'पिण्याला पहिला हक्क ; शेतीला दुय्यम स्थान

**वर्धा जनमाध्यम :** पावसाने ओढ दिली, पावसाचे खंड वाढले आणि जिल्ह्यावर पुन्हा एकदा पाणीटंचाईचे सावट गडद झाले आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याचे निर्देश देत जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी ७ ऑक्टोबर रोजी महत्त्वपूर्ण आदेश निर्गमित केला आहे. त्यानुसार पाण्याच्या वापरात मानव आणि जनावरांसाठी पिण्याचे पाणी सर्वोच्च प्राधान्याने, तर शेतीसाठी पाणी दुय्यम प्राधान्याने देण्यात येणार आहे. त्यामुळे पाण्यावर डल्ला मारणाऱ्यांवर आता प्रशासनाची नजर राहणार आहे.

जिल्ह्यातील सात तालुके दुष्काळी ट्रिगर-१ मध्ये आले आहेत. आगामी काळात टंचाई तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेऊन सार्वजनिक पिण्याचे स्त्रोत, जलाशय, नदी, तलाव, बंधारे, को. पा. बंधारे, विहिरी, बोअरवेल आणि पाणीपुरवठा योजनांमधून होणारा अनधिकृत उपसा रोखण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पंप, विद्युत मोटार, टँकर, सायफनिंग किंवा अनधिकृत जोडणीच्या माध्यमातून पाणी उपसा केल्यास थेट कारवाई केली जाणार आहे.

**पाण्याचा पहिला हक्क तहानलेल्या माणसाचा :**



पाणी वापराचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला असून सर्वप्रथम मानवासाठी पिण्याचे पाणी, त्यानंतर जनावरांना पिण्यासाठी तसेच चाऱ्यासाठी आवश्यक पाणी देण्यात येणार आहे. त्यानंतर उभ्या पिकांसाठी आवश्यक आणि मर्यादित सिंचनाला प्राधान्य राहणार आहे. पाणीटंचाईच्या काळात ऊस आणि अधिक पाणी लागणाऱ्या पिकांना शेवटचे प्राधान्य देण्यात आले आहे.

**पाणीचोरीवर आता पथकांचा पहारा :**

अनधिकृत आणि नियोजनबाह्य पाणी उपशाचा शोध, तपासणी, पंचनामा, जप्ती आणि कायदेशीर कारवाईसाठी तालुकास्तरावर विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली या पथकात जलसंपदा, जलसंधारण, महसूल, पोलिस, पाणीपुरवठा, भूजल सर्वेक्षण, महावितरण आणि ग्रामस्तरावरील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. महसूल मंडळनिहायही स्वतंत्र भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत.

**वैध शेती पाणी वापराला संरक्षण:**

शेतकऱ्याच्या स्वतःच्या शेतातील वैध व नोंदणीकृत विहीर, विंधनविहीर किंवा शेततळ्याचा वापर, सार्वजनिक पिण्याच्या स्त्रोतावर विपरीत परिणाम होत नसल्यास, केवळ दुष्काळाच्या कारणावरून बंद करता येणार नाही. मंजूर कालवा, उपसा सिंचन, पाणी कोटा, पाळी आणि पाणी हक्कानुसार होणाऱ्या वापरावरही अकारण कारवाई न करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**अनधिकृत उपशावर थेट कारवाई:**

मंजूर पाणी नियोजनाच्या बाहेर उपसा करणे, राखीव पिण्याच्या स्रोतावर पंप बसविणे, अनधिकृत सायफनिंग, सार्वजनिक पाणीपुरवठा वाहिनीला जोडणी, प्रतिबंधित क्षेत्रात भूजल उपसा किंवा विक्री तसेच अनधिकृत विद्युत जोडणीचा वापर यावर तात्काळ कारवाई केली जाणार आहे. व्यावसायिक आरओ व पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर प्लांटचीही नियमित तपासणी करण्याचे आदेश आहेत.

**दर महिन्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे :**

भरारी पथकांना मासिक अहवाल कार्यकारी अभियंत्यांकडे सादर करावा लागणार असून कार्यकारी अभियंत्यांनी एकत्रित अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## नाना पाटेकर यांच्या निधनाने संवेदनशील कलाकार गमावला

### पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची श्रद्धांजली



**वर्धा जनमाध्यम :** ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने महाराष्ट्राने संवेदनशील कलाकार आणि समाजहितैषी व्यक्तिमत्त्व गमावले असल्याची भावना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केली. दमदार अभिनयातून अनेक दशके रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या नाना पाटेकर यांनी प्रत्यक्ष जीवनातही माणुसकी जपली. शेतकरी आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी तसेच जलसंधारणाच्या कामासाठी त्यांनी 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून केलेले कार्य सदैव स्मरणात राहील. भारतीय चित्रपटसृष्टीतील अद्वितीय प्रतिभावंत आणि परखड व्यक्तिमत्त्व गमावल्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि चाहत्यांच्या दुःखात सहभागी असल्याचे सांगत डॉ. भोयर यांनी नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## महामार्गाच्या हद्दीत अतिक्रमणावर बुलडोझर

### पुलगावात एनएचएआयची धडक कारवाई; छोट्या व्यावसायिकांच्या कारवाईवर नागरिकांचा आक्षेप



**पुलगाव जनमाध्यम :** राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीत झालेले अतिक्रमण हटविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने गुरुवारी ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता पुलगाव शहरात धडक मोहीम राबविली. कॅम्प रोडवरील आय. एम. स्कूलपासून सुरू झालेल्या या कारवाईत जेसीबीच्या सहाय्याने दुकानांसमोरील ओटे, टिनशेड आणि अन्य अतिक्रमणे हटविण्यात आली.

महामार्ग प्राधिकरणाने ६ ऑक्टोबर रोजी अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावून स्वतःहून अतिक्रमणे हटविण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर अनेकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेतली. मात्र, उर्वरित अतिक्रमणांवर गुरुवारी प्रत्यक्ष कारवाई करण्यात आली. रस्त्याच्या मध्यभागापासून १६ मीटरपर्यंतच्या महामार्गाच्या कार्यक्षेत्रातील अतिक्रमणे कारवाईच्या कक्षेत घेण्यात आली.

दरम्यान, कारवाई सुरू असताना काही नागरिकांनी आक्षेप नोंदवत संताप व्यक्त केला. छोट्या व्यावसायिकांच्या दुकानांवर तातडीने कारवाई केली जात असताना मोठ्या अतिक्रमणधारकांना अभय दिले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला. सर्व अतिक्रमणांवर समान कारवाई झाली पाहिजे, अशी मागणीही करण्यात आली. यावर महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकारी लांजेवार यांनी कोणावरही अन्याय केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. महामार्गाच्या हद्दीत जे अतिक्रमण येते, त्या प्रत्येक अतिक्रमणावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे पुढील टप्प्यात कोणाकोणाच्या अतिक्रमणावर हातोडा पडतो, याकडे पुलगावकरांचे लक्ष लागले आहे.

लांजेवार यांच्या मार्गदर्शनाखाली अभियंता शुभम कोहळे यांच्या उपस्थितीत कारवाई सुरू होती. यावेळी नायब तहसीलदार श्याम कवटी, पोलिस निरीक्षक सदानंद ढाकणे, पोलिस उपनिरीक्षक धोडके, पोलिस उपनिरीक्षक राय, पोलिस कर्मचारी सिद्धार्थ सोमकुंवर, रवी रामटेके यांच्यासह अन्य पोलिस कर्मचारी आणि नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## ऊन, वारा, पावसात जनतेला जागवणाऱ्यांचा आज एल्गार

### वृत्तपत्र विक्रेत्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा



**वर्धा जनमाध्यम :** समाजाच्या हातात दररोज माहिती, ज्ञान आणि वर्तमान घडामोडींचा आरसा पोहोचविणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आज, शुक्रवार ९ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता म्हाडा कॉलनी येथील वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संघाच्या कार्यालयातून मोर्चाला सुरुवात होईल.

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या आवाहनानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर आंदोलन करण्यात येत आहे. स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ तातडीने कार्यान्वित करून विक्रेत्यांना सामाजिक व आर्थिक सुरक्षा द्यावी, ही प्रमुख मागणी आहे.

ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता पहाटेपासून जनतेच्या दारात वर्तमानपत्र पोहोचविणाऱ्या विक्रेत्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. मोर्चानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन देण्यात येणार आहे. विक्रेते व वितरकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष सुनील पाटणकर, सचिव गजानन मसने, संजय देवगिरकर, सुधीर मुंजेवार, सतीश मिसाळ, मोहन मसने, यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## नाना पाटेकर यांच्या निधनाने कलासृष्टीत कधीही न भरून निघणारी पोकळी

### खासदार अमर काळे यांची भावपूर्ण श्रद्धांजली

**वर्धा जनमाध्यम :** ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने भारतीय सिनेसृष्टी आणि मराठी रंगभूमीवर कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. आपल्या कसदार अभिनयाने आणि खणखणीत आवाजाने असंख्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या या महान कलावंताच्या निधनाबद्दल खासदार अमर काळे यांनी तीव्र दुःख व्यक्त करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



नाना पाटेकर हे केवळ उत्कृष्ट अभिनेते नव्हते, तर संवेदनशील आणि दिलदार माणूस होते. रंगभूमी असो वा रुपेरी पडदा, त्यांनी साकारलेली प्रत्येक भूमिका अजरामर ठरली. अभिनय ही केवळ उपजीविका नसून जीवनाशी जोडलेली प्रामाणिक कला आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. त्यांचा दमदार आवाज, प्रभावी अभिनय, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी कायम स्मरणात राहील. नानांच्या जाण्याने कलाक्षेत्राची मोठी हानी झाली असून, त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना खासदार काळे यांनी व्यक्त केली.

## विरुळात नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी

### १५ सार्वजनिक मंडळांत देवीच्या आकर्षक मूर्तींची स्थापना

**विरुळ आकाजी जनमाध्यम :** जिल्ह्यात नवरात्रोत्सवासाठी विशेष ओळख असलेल्या विरुळ आकाजी येथे यंदाही नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. गावातील १५ सार्वजनिक मंडळांकडून आकर्षक देवीच्या मूर्तींची स्थापना करण्यात येणार असून, भवानी माता, अंबादेवी व कुरझाई माता मंदिरात ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापना होणार आहे.



नऊ दिवस चालणाऱ्या या धार्मिक उत्सवामुळे विरुळला यात्रेचे स्वरूप प्राप्त होते. विदर्भाच्या विविध भागांतून भाविक भवानी माता व अंबादेवीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने येथे येतात. देवीच्या मूर्ती अमरावती, वर्धा, पुलगाव व धामणगाव येथून आणल्या जातात. विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसह भजन, कीर्तन आणि आकर्षक विद्युत रोषणाईने गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे.

पुणे, मुंबई, अमरावती, वर्धा व अकोला येथून येणारी बँड पथके उत्सवाची रंगत वाढविणार आहेत. नातेवाईक व पाहुण्यांचीही मोठी वर्दळ राहणार आहे. उत्सवाला गालबोट लागू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून सहकार्य केले जाणार असून, श्रद्धा आणि भक्तीच्या या सोहळ्यात भवानी मातेच्या चरणी माथा टेकण्यासाठी भाविकांची पावले विरुळकडे वळणार आहेत.

## नफ्याच्या आमिषाला भुलले शिक्षक; १० लाखांची ऑनलाइन फसवणूक

### बनावट व्हॉट्सॲप ग्रुप अन् ॲपच्या जाळ्यात ओढले; सायबर पोलिसांत गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** ट्रेडिंगमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत शिक्षकाला तब्बल १० लाख रुपयांचा ऑनलाइन गंडा घालण्यात आला. व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून विश्वास संपादन करून बनावट ट्रेडिंग ॲप डाउनलोड करण्यास भाग पाडण्यात आले. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नालवाडी येथील आयुष अपार्टमेंटमध्ये राहणारे अर्जुन नामदेव खोब्रागडे वय ४७ हे सेलू येथील यशवंत महाविद्यालयात शिक्षक आहेत. मार्च २०२६ मध्ये त्यांना ट्रेडिंगसंदर्भातील एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सहभागी होण्यासाठी संदेश आला. लिंकवर क्लिक केल्यानंतर ते कोटक ब्लूप्रिंट प्रॅक्टिस क्लब या ग्रुपमध्ये सहभागी झाले. त्यानंतर संबंधितांनी ट्रेडिंगमधील मोठ्या नफ्याचे संदेश दाखवून त्यांचा विश्वास संपादन केला. यानंतर एनईओ केओटीएमए नावाचे ॲप




डाउनलोड करण्यास सांगून कोटक सिक्युरिटी हेल्प अँड सपोर्ट या ग्रुपमध्ये सहभागी करण्यात आले. ट्रेडिंगसाठी १० लाख रुपये गुंतविल्यास मोठा नफा मिळेल, असे आमिष दाखविण्यात आले. त्यावर विश्वास ठेवून खोब्रागडे यांनी आरटीजीएसद्वारे १० लाख रुपये पाठविले.

काही दिवसांनी आणखी रक्कम मागण्यात आल्याने त्यांना संशय आला. त्यांनी गुंतवलेली रक्कम परत मागितली. मात्र, विविध कारणे सांगून टाळाटाळ करण्यात आली. अखेर त्यांनी राष्ट्रीय सायबर गुन्हे रिपोर्टिंग पोर्टलवर तक्रार केली. त्याआधारे सायबर पोलिसांनी ऑनलाइन फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## ग्रामीण भागातील २५० नागरिकांची सर्वसमावेशक आरोग्य तपासणी

### पाच गावांतील नागरिकांना मोफत तपासणी, औषधोपचार व वैद्यकीय सल्ला

**वर्धा जनमाध्यम :** ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या जवळच प्राथमिक आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ऑक्टोबरमध्ये आयोजित सर्वसमावेशक आरोग्य तपासणी शिबिराचा पाच गावांतील सुमारे २५० नागरिकांनी लाभ घेतला. एवोनिथ स्टीलच्या वतीने आयोजित या शिबिरात विविध आजारांची तपासणी आणि तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला देण्यात आला.



एवोनिथ स्टीलतर्फे वर्धा जिल्ह्यातील २० आणि मलकापूर परिसरातील १० गावांमध्ये दोन समर्पित आरोग्य व्हॅनच्या माध्यमातून नियमित आरोग्यसेवा दिली जाते. या उपक्रमातून दरमहा दोन हजारांहून अधिक नागरिकांना मोफत वैद्यकीय सेवा मिळत आहे. एमबीबीएस डॉक्टर आणि पात्र परिचारिकांच्या माध्यमातून वैद्यकीय सल्ला, निदान सेवा तसेच डॉक्टरांनी सुचविलेली औषधे उपलब्ध करून दिली जातात.

शिबिरात प्राथमिक नेत्र तपासणी, स्त्रीरोग तपासणी, मधुमेह, रक्तदाब, सीबीसी रक्त तपासणी आणि सामान्य वैद्यकीय तपासणी करण्यात आली. पुढील उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना सरकारी आरोग्य सुविधांशी जोडण्यात आले. रुग्णांसाठी वाहतूक आणि भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्रात नेत्र तपासणीची सुविधा नसल्याने नागरिकांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

## गर्दीत हरवली वाट; आरपीएफने दिला आधार

### १६ वर्षीय मुलीचे रेस्क्यू; चाइल्ड हेल्पलाइनच्या स्वाधीन

**वर्धा जनमाध्यम :** सेवाग्राम रेल्वे स्थानकावर गर्दीत अडकलेल्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला आरपीएफच्या सतर्क जवानांनी सुखरूप ताब्यात घेतले. रेल्वे सुरक्षा दलाच्या वेळीच लक्ष गेल्याने मुलीला सुरक्षित आधार मिळाला.

५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.४५ वाजता डाउन केरळ एक्स्प्रेस स्थानकातून रवाना झाल्यानंतर प्रधान आरक्षक प्रमोद दैने फलाट क्रमांक तीनवर गस्त घालत होते. यावेळी एका युवकासोबत मुलगी बाकावर बसलेली दिसली. दोघांच्या चौकशीत समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने त्यांना आरपीएफ चौकीत आणण्यात आले.

सविस्तर चौकशीत मुलगी अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाले. ती संबंधित युवकासोबत घरच्यांना न सांगता हैदराबादला गेली होती. काम न मिळाल्याने दोघे परतीच्या प्रवासाला निघाले. गर्दीमुळे चंद्रपूर येथे उतरावे लागले. पुढे केरळ एक्स्प्रेसने सेवाग्रामला आल्यानंतर पाणी घेण्यासाठी खाली उतरले आणि पुन्हा गाडीत चढता आले नाही.

घटनेची माहिती चाइल्ड हेल्पलाइनला देण्यात आली. जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीनंतर मुलीला सुरक्षितपणे चाइल्ड हेल्पलाइनच्या स्वाधीन करण्यात आले.

## पेपरफुटी, विलंब अन् रिक्त पदे; विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राष्ट्रवादी आक्रमक

### ७० हजार रिक्त पदे भरा; MPSC चा गोंधळ थांबवा

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा आणि भरती प्रक्रियेतील प्रलंबित प्रश्नांवरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप करीत पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. श्झ्एण अध्यक्ष विवेक भिमनवार यांचा राजीनामा घेऊन स्वच्छ प्रतिमेच्या अध्यक्षांची नियुक्ती करावी, अशी थेट मागणी यावेळी करण्यात आली.

श्झ्एणची तयारी करणारे हजारो विद्यार्थी वर्षानुवर्षे मेहनत घेत आहेत. मात्र परीक्षा प्रक्रिया, भरतीतील विलंब, कथित गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता वाढत असल्याचे राष्ट्रवादीने निवेदनात म्हटले आहे. पुण्यात आमदार रोहितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वर्ध्यातही विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी आवाज उठविण्यात आला.

राज्य शासनाच्या विविध विभागांतील सुमारे ७० हजार रिक्त पदांची भरती तातडीने सुरू करून ती वेळबद्ध पद्धतीने पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली. परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता कायम ठेवण्यासाठी गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या घटनांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली. श्झ्एणच्या परीक्षा शक्य तितक्या ऑनलाइन पद्धतीने घ्याव्यात. परीक्षा केंद्रांवर सुरक्षित आणि पारदर्शक व्यवस्था करावी. विद्यार्थ्यांवरील परीक्षा शुल्काचा आर्थिक भार कमी करण्यासाठी सवलतीची व्यवस्था करावी. परीक्षांचे आणि भरती प्रक्रियेचे निश्चित वेळापत्रक जाहीर करून अनावश्यक विलंबाला लगाम घालावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.



विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सरकारने आता केवळ आश्वासनांची मलमपट्टी न करता ठोस निर्णय घ्यावा, अशी भूमिका राष्ट्रवादीने मांडली. परीक्षार्थींशी नियमित संवाद साधण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची मागणीही करण्यात आली.

यावेळी प्रदेश सरचिटणीस सुनील राउत, प्रदेश उपाध्यक्ष किशोर माथनकर, युवा नेते समीर देशमुख, राजेंद्र शर्मा, संदीप किटे, योगिता इंगळे, प्रणय कदम, प्रशांत कुत्तरमारे, बालू वानखेडे, अमोल बोरकर, राकेश चंदनखेडे, अभिजित ढोबळे, प्रणय येवले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मराठवाड्यासह विदर्भातील बळीराजाचा आधारवड हरवला

## दुष्काळमुक्तीसाठी लढा, शेतक-यांचे पुसले अश्रू

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात भीषण दुष्काळ पडला, अनेक शेतक-यांनी जीवन संपवले. हा संकट मोठे होते. अशावेळी नाना पाटेकर यांचे संवेदनशील मन हेलावले. त्यांनी अभिनेते मकरंद अनासपूरे यांच्या मदतीने नाम फाउंडेशन उभारले. त्यातून दुष्काळमुक्तीसाठी लढा दिला. बळीराजा त्यांना कधीही विसरणार नाही.

नानांच्या अचानक एक्झिटमुळे अनेकांना मोठा धक्का बसला. विशेषतः विदर्भ, मराठवाड्यातील शेतक-यांचा आधारवड हिरावला. केवळ अभिनयापूरते त्यांचे व्यक्तिमत्व मर्यादित नव्हते.. अनेक क्षेत्रात त्यांनी अमिट ठसा उमटवला होता. ते सामाजिक भान जपणारे अभिनेते होते. २०१४-१५ मध्ये मराठवाडा आणि विदर्भावर दुष्काळाचे सावट होते. शेतक-यांच्या आत्महत्येने समाजमन हेलावले. नानांच्या काळीज हेलावले. त्यांनी अभिनेते मकरंद अनासपूरे यांच्या सोबत मिळून नाम फाउंडेशन उभारले. शेतक-यांचे अश्रु पुसण्याचे काम त्यांनी केले.



प्रसिद्धीच्या झोतात असतानाही त्यांनी सामाजिक भान जपले. त्यांच्या या कृतीचे कौतुक झाले. दहा वर्षांपूर्वीच्या दुष्काळात नाम फाउंडेशनची स्थापन झाली. सप्टेंबर २०१५ मध्ये ही चळवळ सुरू झाली. नाना आणि मकरंद या दोन नावातील अद्याक्षरं घेउन नाम फाउंडेशन शेतक-यांच्या मदतीला उतरले. मराठवाडा आणि विदर्भातील भीषण दुष्काळाने अनेकांचे सर्वस्व हिरावले होते. शेतकरी आत्महत्येचा डाग प्रगतशील आणि पुरोगामी महाराष्ट्रावर लागलेला होता. शेतक-यांच्या विधवांच्या, मुलांच्या हार्त हाकेला नाम फाउंडेशनने मदत केली. पण केवळ आर्थिक मदतीपुरती ही चळवळ मर्यादित राहिली नाही.पाणी संवर्धन, पाणी अडवा, पाणी जिरवा, पाणी व्यवस्थापन, शेतकरी मार्गदर्शन, विविध पाणी प्रकल्पांवर काम, महिलांना स्वतःच्या पायावर उभा राहता यावे यासाठीचा प्रयत्न आणि मुलांना चांगले शिक्षण मिळवून देण्यासाठी नाम झटली आणि हे काम सुरू आहे. नाम ही केवळ एक संस्था न राहता चळवळ झाली. नाना पाटेकर यांनी या काळात मराठवाड्यातील विविध ठिकाणी भेटी दिल्या. विदर्भातील यवतमाळमध्ये ते गेले. त्यांनी अनेक मुलाखतीत हे विदारक चित्र मांडले आणि थेट मदत करण्याचे आवाहन केले.

**लाखो शेतक-यांना नामचा आधार**

नाम फाउंडेशनच्या संकेतस्थळावरील माहितीनुसार, ७७,१७,००० लाख शेतक-यांना या संस्थेने मदत केली आहे. ५०,९०८ कुटुंबांना मदत केली. तर वीरगती प्राप्त लष्करी जवानांच्या १०२ कुटुंबांना आर्थिक मदत करण्यात आली आहे. ४,९५७ विधवांना या फाउंडेशनने मदत केली आहे. राज्यातील २१८७ गावांपर्यंत नाम फाउंडेशन पोहचले आहे. यामुळे १,२७,२३,१२६ कोटी लोकांना पाण्याची सोय होण्यासाठी मदत झाल्याचे या संकेतस्थळावर म्हटले आहे.

**आजही दुष्काळाचे सावट, पण काळाने नानांना हिरावले**

सुपर अल निनोमुळे महाराष्ट्रावर दुष्काळाचे भीषण सावट उभे ठाकले आहेत. ऐन हिवाळ्यातच पाणवठे आटायला सुरुवात झाली आहे. राज्यातील जवळपास सर्वच तालुके भीषण दुष्काळाचे चटके सहन करत आहेत. अशावेळी अनेकांना नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांची आठवण झाली आहे. पण काळाने नानांना आपल्यातून हिरावले आहे. मराठवाड्यासह विदर्भातील अनेक कुटुंब पोरकी झाली आहेत.

## माझा जिवाभावाचा मित्र गमावला

### अशोक सराफ भावूक

**मुंबई/ प्रतिनिधी-** प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. नाना पाटेकर यांच्या निधनानंतर सिनेसृष्टीत खळबळ उडाली आहे. नाना



पाटेकर यांची ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्यासोबत चांगली मैत्री होती. अशोक सराफ यांनी पाटेकरांच्या निधनावर प्रतिक्रिया देत भावूक झाले.यावेळी त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.अशोक सराफ यांनी एका प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी सराफ यांनी बातमी ऐकूण धक्काच बसला. सराफ म्हणाले, सर्वात वाईट गोष्ट आहे. मला यावर विश्वास ठेवता येणार नाही. माझा अत्यंत जवळचा मित्र होता. माझी आणि त्याची एकत्र सुरु वात झाली. आम्ही एकत्र नाटक केले होते. त्याने ते नाटक केल्यानंतर मागे वळून पाहिले नाही. त्याच्याविषयी.. काय काय सांगणार. मागील काही दिवसांपासून त्यांच्यासोबत बोलणे झालेले नाही. बरेच दिवस झाले, त्याची भेट झाली नव्हती. परंतु आम्ही चांगले मित्र होतो. त्याचे निधन हे अत्यंत दुःखद आहे. मला अजूनही विश्वास होत नाही. इतक्या ताकदीचा माणूस, शारिरीक, मानसिकरित्या मजबूत माणूस गेला. माझ्या जिवाभावाचा मित्र गमावला. हे दुःख कायम राहील. आमची मैत्री खूप वेगळी होती. इतकी चांगली होती की, त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. तो माझी मालीश करायचा. हातपाय दाबयाचा. त्यावेळी मी खिशात दोन रु पये टाकायचो. नंतर तो मुकाट्याने पुढे जायचा. त्याने कधी स्वतःचा स्टेटस दाखवला नाही. तो इतका मोठा झाला, तरी त्याचा मोठेपणा दाखवला नाही. त्याची ती वृत्ती कमी झाली नाही. भावापेक्षा मित्र गमावाल. बाहेरू न रागीट दिसणारा, पण आतून अत्यंत कोमल असा माणूस होता, असे सराफ यांनी पुढे सांगितले.

## नाना सारखा माणूस होणे नाही; अण्णा हजारे भावूक

**अहिल्यानगर / प्रतिनिधी-**ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने अत्यंत भावूक झाले. त्यांना अश्रू अनावर झाले. नाना पाटेकर म्हणजे समाज



आणि देशासाठी दीपस्तंभासारखे होते, असे अण्णा म्हणाले. जलसंधारण, नाम फाऊंडेशन अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी मोठे कार्य केले. त्यांचे जाणे म्हणजे समाजासाठी मोठी हानी असून, असा माणूस होणे नाही. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे हे नाना पाटेकरांवर बोलताना अस्वस्थ झाले. त्यांच्या तोंडातून शब्दच फुटत नव्हते. डोळ्यातून अश्रू येत होते. नाना पाटेकरांचे कार्य दीपस्तंभासारखे आहे. त्यांनी खूप मोठे काम केले. असा माणूस होणार नाही, अशा शब्दात अण्णा हजारे यांनी नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहिली आहे. नाना पाटेकर गेल्याचे वृत्त ऐकून अण्णा हजारेही अस्वस्थ झाले. मीडियासमोर त्यांना अश्रू आवरणे कठिण झाले. नाना सारखा माणूस होणार नाही. त्यांनी फार मोठे काम केले आहे. नुसते काम केले नाही, वादळी सागरात संचार करणा-या नौकांना जसा दिपस्तंभ आधार असतो, तसे नाना पाटेकरांचे जीवन दीपस्तंभासारखे आधार होतें. समाज आणि देशासाठी नाना पाटेकर दीपस्तंभासारखे आधार होते. त्यांनी केवळ एकाच क्षेत्रात काम केले नाही. त्यांनी सर्वच क्षेत्रात खूप मोठे काम केले. साधा पाण्याचा प्रश्न त्यांनी उचलून धरला. पाणी अडवा, पाणी जिरवा. हे त्यांनी कृतीने करू न दाखवले असे अण्णा हजारे म्हणाले. अशी माणसे होणार नाही. त्यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो, अशी ईश्वचरणी प्रार्थना करतो. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी मोठे काम केले.समाजाला दिशा देणारेकाम झाले. माणसे येतात जातात. येणे-जाणे हे एका कालचक्रासारखे सुरू आहे. पण काही माणसं समाजाला दिशा देउन जातात. देशाला नवीन दिशा देउन जातात, असे काही माणसांचे जीवन असतं. नाना पाटेकरांच्या जीवनात ते पाहायला मिळालं, असंही अण्णा म्हणाले.

**नानांचे जाणे दुःखद:**पोपटराव पवार

यावेळी पोपटराव पवार यांनीही नाना पाटेकर यांना



श्रद्धांजली अर्पण केली. नानांचे जाणे दुःखद आहे. दुष्काळी परिस्थितीत महाराष्ट्राचा आधारवड हरवला. नानांचा आणि हिवरे बाजारचा ऋणानुबंध २२ सप्टेंबर २०१५ पासूनचा होता. नानांनी त्यांच्या घरी गणपतीसाठी बोलवले होते. त्यावेळी नानांनी मारलेली मीठी आजही स्मरणात आहे. नाम फाऊंडेशनची सुरु वातही हिवरे बाजारपासूनच झाली, असं पोपटराव पवार म्हणाले.

## पंतप्रधानांकडून नाना पाटेकरांना श्रद्धांजली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नाना पाटेकर यांच्या अचानक जाण्याने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केले असून एक्स वर पोस्ट करत त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. अतिशय मोजक्या अभिनेत्यांमध्ये अशी तीव्रता, अनोखे व्यक्तिमत्त्व आणि अजोड स्क्रीन प्रेझेन्स असतो, जो नाना पाटेकर यांच्याकडे होता. त्यांनी



आपल्या प्रत्येक भूमिकेत अष्टपैलूत्व आणि सर्जनशीलता आणली आणि आपल्याला अशी अजरामर पात्रे दिली जी पिढ्यानपिढ्या लक्षात ठेवतील. ते त्यांच्या स्पष्ट आणि रोखठोक मतांसाठीही ओळखले जात होते; आपल्या तत्त्वांसाठी उभे राहताना आणि स्वतःच्या मतांवर ठाम राहताना त्यांनी कधीही आढेवेढे घेतले नाहीत, असं पतंप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील नाना पाटेकर यांचे योगदान अथांग होते. त्यांच्या जाण्याने कलाविश्वात कधीही न भरू न निघणारी एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या, मित्रांच्या आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. ओम शांती, असं म्हणत त्यांनी श्रद्धांजली वाहिली. आज सकाळीच एक बातमी आली की प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांचं निधन झालं. ते अत्यंत उत्तम कलाकार होते. त्यांनी विविध भूमिका साकारू न प्रेक्षकांची मने जिंकली. नाना पाटेकर यांचं जीवन तिरंगाच्या आन-बान आणि शानसाठी समर्पित राहिले. ते बंधनात राहिले नाही, त्यांनी परिंदा (पक्ष्या)प्रमाणे चित्रपटाच्या आकाशात उंच भरारी घेतली. समाजातील व्यवस्थांवर चित्रपटांच्या माध्यमातून त्यांनी प्रहार केला. ते असे क्रांतिवीर होते, त्यांनी वाईट प्रवृत्तीविरोधात काम केलं. त्यांची भाषा तेज होती आणि त्यांची शांतताही तितकीच प्रभावी होती, अशा शब्दांत नरेंद्र मोदी यांनी इंडिया मोबाईल काँग्रेसच्या कार्यक्रमात श्रद्धांजली वाहिली.

## गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केले दुःख

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुरु वारी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आणि या घटनेला कलाविश्वासाठी 'अपूर्णीय हानी' असे संबोधले. 'एक्स' (X) या सोशल मीडिया प्लॅटफार्मवर अभिनेत्यासोबतचे स्वताचे फोटो शेअर करत अमित शाह यांनी लिहिले, 'महान भारतीय चित्रपट अभिनेते नाना पाटेकर यांचे निधन ही कलाविश्वासाठी एक न भरू न निघणारी हानी आहे. पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी आपल्या नैसर्गिक अभिनयाने आणि प्रभावी संवादफेकीने प्रेक्षकांच्या मनावर अमिट छाप पाडली. गंभीर सामाजिक विषय असोत किंवा उपरोध (व्यंग), त्यांनी साकारलेल्या प्रत्येक पात्रात त्यांनी जीव ओतला. दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत करण्यासाठी 'नाम फाऊंडेशन'च्या माध्यमातून केलेले कार्य असो किंवा सैनिकांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी सीमेवर दिलेली भेट प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही ते आपल्या मुळांशी जोडलेले राहिले.'अमित शाह यांनी 'एक्स'वर पुढे



लिहिले, 'जेव्हा जेव्हा मी त्यांना भेटलो, तेव्हा त्यांच्या साधेपणाने आणि स्पष्टवक्तेपणाने माझ्या मनावर नेहमीच खोल छाप पाडली. ईश्वर शोकाकुल कुटुंब आणि चाहत्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो आणि दिवंगत आत्म्याला आपल्या पवित्र चरणी स्थान देवो. ओम शांती, शांती, शांती.'

## समाजातल्या सामान्य माणसाच्या मनात साठलेल्या भावनांचा चेहरा हरपला

**मुंबई/ प्रतिनिधी-** नानांना निरोप देताना केवळ एका मोठ्या अभिनेत्याला आपण निरोप देत नाही आहोत तर समाजातल्या सामान्य माणसाच्या मनात साठत गेलेल्या असंख्य भावनांचा एक चेहरा आज आपल्यातून निघून गेला आहे, असे लिहित महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्मवर नाना पाटेकर यांच्या अभिनयाबाबत आणि एक माणूस नाना कसे होते, याबाबत भाष्य केले आहे. नानांच्या अभिनयाला पाहून हालिवूडमधील मार्गन फ्रीमन आठवायचे, असेही ठाकरेंनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे. त्यांनी आपल्या पोस्टमधून म्हटले आहे की, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे निधन झाले. हिंदी चित्रपट सृष्टी म्हणजे मुंबई हे दृढ समीकरण.मुंबई आली की इथली रंगभूमी, इथले व्यावसायिक सिनेमाचे जग, इथल्या झोपडीपासून, चाळीपासून कुठेतरी रोज या शहरात स्वतःचे अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करणारा इथला मध्यमवर्ग, निम्न मध्यमवर्ग आला, पुढे याच शहरातला आणि हळूहळू या देशातील उध्वस्त होत गेलेला कामगार वर्ग आला, त्यातून आलेल्या सामाजिक नैराश्यातून उदयाला आलेले अंडरवर्ल्डचे विश्व असेल, सामाजिक सलोखा बघता बघता विस्कटून जाण्याचा काळ असेल,

पुढे याच मध्यमवर्गाच्या आकांक्षा उदारीकरणानंतर विस्तारत जाणे आणि या सगळ्याच्या भोवती फिरणारे राजकारण. या प्रत्येक टप्प्यात नाना पाटेकर कधी नाटकातून कधी सिनेमातून दिसले. हमीदाबाईची कोठीपासून ते परिंदा ते क्रांतिवीर ते अब तक छप्पन ते अगदी नटसम्राटपर्यंत प्रत्येक ठिकाणी नाना पाटेकर दिसत राहिले . या प्रत्येक टप्प्यावरची कुठेतरी अस्वस्थता उराशी घेउन जगणारा सामान्य माणूस नाना पाटेकर कधी पडद्यावर तर कधी रंगभूमीवर उभा करत राहिलेअशा भावना राज ठाकरेंनी व्यक्त केल्या. तसेच,सामान्य माणसाच्या मनात सातत्याने राग, अपमान, शक्तिहीनता, नैराश्य, अनैतिक गोष्टींबद्दलची घृणा, व्यवस्थेबद्दलची निराशा, वर्ग संघर्ष हे सगळे आत धुमसत असते. ते अगदी कधीतरी किरकोळ भांडणे किंवा घरातील आदळआपट यातून



### राज ठाकरेंनी वाहिली नानांना श्रद्धांजली

बाहेर पडते, अन्यथा ते आत धुमसत राहते. हे धुमसत राहणे, प्रेशर कुकर सारखे आत रटरटत राहणे हेच त्याच्या वाट्याला येते.नानांच्या अभिनयाकडे बघताना हा सामान्यांच्या आयुष्यातला भावनांचा प्रेशर कुकर बघतोय असं वाटायचं. आणि मग कधीकधी नाना असतील किंवा अँग्री यंग मॅन अमिताभ बच्चन असतील यांनी पडद्यावर केलेले दोन हात ही माणसाच्या मनाच्या प्रेशर कुकरमधील वाफ बाहेर काढतात. मी जसे नेहमी म्हणतो की लतादीदी, आशाताई, किशोर कुमार, रफी साहेब, इत्यादी गायकांनी, संगीतकारांनी, चित्रपट तसेच नाटक निर्माते, दिग्दर्शक, कलाकारांनी भारतीयांचे किमान ६०/७० वर्ष मन रिझवले तसेच नाना असतील किंवा बच्चन साहेब असतील यांनी आतली वाफ पडद्यावर ताकदीने बाहेर काढली म्हणून ठीक नाही तर या देशांत दर महिन्याला अराजकता निर्माण झालं असते असे लिहिले आहे.

नानांना पाहून हालिवूडमधल्या मार्गन फ्रीमन यांची आठवण नानांच्या अभिनयाकडे बघताना मला नेहमीच हालिवूडमधल्या मार्गन फ्रीमन यांची आठवण येते. रू प असेल व्यक्तिमत्व असेल दोघेही तत्कालीन बालिवूड किंवा हालिवूडच्या कलाकाराच्या पठडीत बसणारे अभिनेते नाहीत. मार्गन फ्रीमन यांच्याकडे पाहिल्यानंतर अनेकदा असे वाटते की या माणसाने काळाच्या ओघात शहाणपण, पेशन्स, आणि आहे हे हे असं आहे हे स्वीकारलेपण आत्मसात केले आहे. तर नानांच्या अभियाकडे पाहून मला राग, चंचलता, आणि खूप खोल साठलेलं नैराश्य जाणवायचे. या माणसाने खूप बघितले आहे. असे वाटणारा मार्गन फ्रीमन आणि या माणसाने खूप भोगले आहे आता बस असे वाटणारे नाना. माणसाची दोन टोकाची रू पं असतात. यातले दुसरे टोक नाना मनस्वीपणे पडद्यावर आणू शकायचे म्हणून ते मोठे कलाकार होते. अशा भावना राज ठाकरेंनी नानांच्या अभिनयाबाबत व्यक्त केल्या.

**असंख्य भावनांचा चेहरा हरपला-** तर आपल्या पोस्टच्या शेवटी राज ठाकरेंनी लिहिले की नाना गेले, पण नानांनी पडद्यावर उभा केलेला तो माणूस अजूनही आपल्या आजूबाजूला आहे. त्याचा राग आहे, त्याची अस्वस्थता आहे, त्याचा अपमान आहे, त्याची धडपड आहे आणि परिस्थितीशी दोन हात करण्याची त्याची अधूनमधून उसळणारी ताकदही आहे. कदाचित म्हणूनच नानांना निरोप देताना केवळ एका मोठ्या अभिनेत्याला आपण निरोप देत नाही आहोत तर समाजातल्या सामान्य माणसाच्या मनात साठत गेलेल्या असंख्य भावनांचा एक चेहरा आज आपल्यातून निघून गेला आहे. नाना पाटेकरांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## विरोधी पक्षनेते राहुल गांधी कडून शोक व्यक्त

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनावर तीव्र शोक व्यक्त करत त्यांना आदरांजली अर्पण केली



आहे. राहुल गांधी यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे कीः प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर जी यांचे निधन अत्यंत दुःखद आहे. आपल्या अभिनय आणि पात्रांच्या माध्यमातून त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर आणि प्रेक्षकांच्या हृदयावर एक अमिट छाप सोडली आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी गोवा येथील त्यांच्या निवासस्थानी हृदयविकाराच्या झटक्यामुळे ८ ऑक्टोबर २०२६ रोजी निधन झाले.राहुल गांधी यांच्यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह अनेक नेत्यांनी व कलाकारांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे।

## असामान्य, संवेदनशील अन् प्रभावी पर्व संपले

### नाना पाटेकरांच्या निधनावर शरद पवारांकडून शोक व्यक्त

**मुंबई / प्रतिनिध-** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीतील एक असामान्य, संवेदनशील आणि प्रभावी पर्व आज संपले असल्याची भावना शरद पवारांनी व्यक्त केली. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पोस्टमध्ये म्हटले की, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाचे दुःखद वृत्त अत्यंत वेदनादायी आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीतील एक असामान्य, संवेदनशील आणि प्रभावी पर्व आज संपले आहे. आपल्या दमदार अभिनयाने,



आगळ्या संवादफेकीने आणि प्रत्येक भूमिकेतील विलक्षण सहजतेने त्यांनी रसिकांच्या मनावर कायमची अमिट छाप उमटवली. परिंदा, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, अब तक छप्पन, वेलकम, नटसम्राट अशा अनेक चित्रपटांमधून त्यांच्या अभिनयाचे विविध पैलू रसिकांना अनुभवायला मिळाले. असे म्हणत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाचे दुःखद वृत्त अत्यंत वेदनादायी आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीतील एक असामान्य, संवेदनशील आणि प्रभावी पर्व आज संपले आहे.

## नाना पाटेकर यांच्या निधनाने चित्रपसृष्टी हळहळली; कलाकारांनी वाहिली श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्येष्ट अभिनेते नाना पाटेकर यांचे गुरु वारी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. गेल्या पन्नास वर्षांपासून चित्रपटसृष्टीवर राज्य करणा-या नाना पाटेकरांच्या अकाली निधनाने चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. हिंदी, मराठी, दाक्षिणात्या चित्रपटसृष्टीतील कलाकारांनी नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**मन अत्यंत दुःखी :** अक्षय कुमार



नानांच्या निधनाचे वृत्त ऐकून मन अत्यंत दुःखी झाले. ते अशा मोजक्या अभिनेत्यांपैकी एक होते, ज्यांना प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी फार काही करावे लागत नसे. तो धीरगंभीर आवाज, जबरदस्त अभिनय आणि प्रत्येक पात्रातील सहज प्रामाणिकपणाड्य त्यांची स्वतःची एक वेगळी शैली होती. वेलकम आणि नुकत्याच झालेल्या हाउसफुल ५ मध्ये त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. त्या सेटवरच्या अशा अनेक आठवणी आहेत, ज्या मी आयुष्यभर मनात जपून ठेवीन. नाना पाटेकर खरोखरच अद्वितीय होते. नाना आता आपल्यात नाही यावर विश्वास ठेवणे कठीण जात आहे. तुमची उणीव शब्दांत व्यक्त करता येणार नाही इतकी भासेल, असे अक्षय कुमारने ट्विट केले आहे.

### कलेप्रती समर्पण सदैव स्मरणात : मनीषा कोईराला



एका महान अभिनेत्याच्या, प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या आणि अभिनय क्षेत्रातील एका ख-या आधारस्तंभाच्या निधनाने मन अत्यंत दुःखी झाले आहे. सिनेमासृष्टीतील त्यांचे योगदान आणि त्यांचे कलेप्रती असलेले समर्पण सदैव स्मरणात राहील

### चित्रपटसृष्टीची फार मोठी हानी : संजय दत्त



माझा भाउ, माझा मित्र नाना आता आपल्यात नाही यावर अजूनही विश्वास बसणे कठीण जात आहे. आम्ही एकत्र घालवलेल्या क्षणांच्या अशा अनेक सुंदर आठवणी आहेत, ज्या मी आयुष्यभर मनात जपून ठेवीन. त्यांचे जाणे ही केवळ त्यांच्यावर प्रेम करणा-या आणि त्यांना ओळखणा-यांचीच नव्हे, तर संपूर्ण चित्रपटसृष्टीची फार मोठी हानी आहे. आपण एका असामान्य अभिनेत्याला, एका महान कलाकाराला आणि एका खरोखरच अत्यंत खास व्यक्तीला गमावले आहे. माझ्या संवेदना आणि प्रार्थना त्यांच्या कुटुंबासोबत व आप्तेष्टांसोबत आहेत. भावपूर्ण श्रद्धांजली, नाना.



## क्रिकेटविश्वाकडून नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**मुंबई / प्रतिनिधी-** भारतीय चित्रपटसृष्टीतील दिग्गज आणि अष्टपैलू अभिनेते नाना पाटेकर यांचे ८ ऑक्टोबरच्या सकाळी गोव्यातील निवासस्थानी निधन झाले. वयाच्या ७५ व्या वर्षी त्यांनी अंतिम श्वास घेतला. त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच चित्रपटसृष्टीसह क्रीडाविश्वातही मोठा शोक पसरला असून विराट कोहली, सचिन तेंडुलकर आणि शिखर धवन यांसारख्या दिग्गजांनी सोशल मीडियाद्वारे नानांना भावूक श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### अत्यंत साधे,जमिनीवर असणारे व्यक्तीः तेंडुलकर



क्रिकेटचा देव मानल्या जाणा-या सचिन तेंडुलकरने नानांच्या आठवणींना उजाळा देत म्हटले, नाना पाटेकर हे अत्यंत साधे आणि जमिनीवर असणारे व्यक्ती होते. त्यांच्या कामात तीच प्रामाणिकता दिसून यायची. मराठी असो वा हिंदी सिनेमा, त्यांनी नेहमीच आपल्या भूमिकांमध्ये वास्तववादी जिवंतपणा आणला. त्यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद असून, मी त्यांच्या कुटुंबाप्रती आणि जवळच्या लोकांप्रती संवेदना व्यक्त करतो.

### भारतीय सिनेमाचे एक खरे लीजेंड : विराट कोहली



भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली याने नाना पाटेकर यांचा फोटो शेअर करत लिहिले की, भारतीय सिनेमाचे एक खरे लीजेंड तुमचे कार्य आणि वारसा येणा-या अनेक पिढ्यांसाठी सदैव जिवंत राहील. ईश्वर तुमच्या आत्म्यास शांती देवो.

### अत्यंत खास प्रतिभा गमावली : शिखर धवन



माजी क्रिकेटपटू शिखर धवनने, आज भारतीय सिनेमाने एक अत्यंत खास प्रतिभा गमावली आहे, अशा शब्दांत दुःख व्यक्त केले, तर प्रसिद्ध क्रिकेट कमेंटेटर हर्षा भोगले यांनी नानांच्या उत्कृष्ट अभिनयाचे आणि रंगमंचावरील प्रभावाचे कौतुक करत हा दिवस अत्यंत दुःखद असल्याचे म्हटले. नानांनी प्रत्येक गोष्टीत आपले १०० टक्के योगदान दिले, अशा शब्दांत त्यांनी नानांना श्रद्धांजली वाहिली.

### अप्रतिम अभिनेते हरपले : अजिंक्य राहणे



अजिंक्य राहणे म्हणाला की, नाना पाटेकर जी हे खरोखरच एक अप्रतिम अभिनेते होते, ज्यांच्या कामाने अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली आणि मनोरंजन केले. त्यांच्या निधनाची बातमी ऐकून खूप दुःख झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो.

### खरा महान नट गमावला : युवराज सिंह



भारताचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंह म्हणाला की, चित्रपटसृष्टीने एक खरा महान नट गमावला आहे, जे आपण पाहिलेल्या सर्वोत्तम अभिनेत्यांपैकी एक होते! मला त्यांचे अनेक चित्रपट पाहिल्याचे आठवते आणि त्यांचा आवाज, त्यांचा वावर आणि त्यांच्या अविस्मरणीय अभिनयाने मी थक्क झालो. माझ्या संवेदना त्यांच्या कुटुंबासोबत आहेत.

### अत्यंत दुःखद दिवस : हर्षा भोगले



प्रसिद्ध क्रिकेट समीक्षक हर्षा भोगले यांनीदेखील नानांच्या निधनावर दुःख व्यक्त केले. त्यांनी लिहिले की, हा अत्यंत दुःखद दिवस आहे. हर्षा यांनी नानांचा उल्लेख एक उत्कृष्ट अभिनेता असा करत त्यांच्या स्क्रीन आणि स्टेज प्रेझन्सचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, नानांनी प्रत्येक गोष्टीत आपले १०० टक्के योगदान दिले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



## संपादकीय

### प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# 'नटसम्राट' पडद्यामागे

पडद्यावर आपल्या खणखणीत आवाजाने, डोळ्यांतील अंगाराने आणि अंगभूत ऊर्जेने संवाद फेकत समोरच्याला निरुत्तर करणारा, तर कधी सहज-सोप्या अभिनयाने प्रेक्षकांच्या डोळ्यांत पाणी आणणारा एक 'नटसम्राट' शांत झाला आहे. नाना पाटेकर यांचे अचानक जाणे ही भारतीय चित्रपटसृष्टीची आणि विशेषतः महाराष्ट्र राज्याची कधीही न भरून निघणारी हानी आहे. नाना हे केवळ एक अभिनेते नव्हते; ते एक अशी प्रवृत्ती होते, जी अन्यायाविरुद्ध पडद्यावर आणि पडद्यामागेही सारखीच पेटून उठायची. अभिनयाचा वेगळा बाज आणि जरब होती. मुरुड-जंजिरासारख्या छोट्या गावातून आलेल्या विश्वनाथ पाटेकर यांचा 'नाना' होण्याचा प्रवास सोपा नव्हता. मुंबईच्या जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्‌समधून कलाशिक्षण घेतानाच त्यांच्यातील अभिनयाची ठिणगी पडली. १९७८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'गमन' सिनेमातून नाना पाटेकर यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. चित्रपटसृष्टीत एन्ट्री घेतल्यावर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. त्यांचे एका पाठोपाठ एक सगळेच सिनेमे सुपरहिट ठरले. 'क्रांतिवीर', 'परिंदा', 'तिरंगा' यांसारख्या चित्रपटांनी तर बॉक्स ऑफिसवर इतिहास रचला होता. 'गमन', 'अंकुश', 'प्रातिघात' मधून सुरू झालेला हा प्रवास 'परिंदा', 'क्रांतिवीर', 'अग्निसाक्षी', 'यशवंत' ते थेट 'वेलकम' आणि 'नटसम्राट' पर्यंत येऊन पोहोचला. 'पक पक पकाक' या २००५ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटाने मराठी सिनेमाला एक नवीन दिशा दिली. नाना पाटेकरांनी साकारलेला 'भूत्या' घराघरांत पोहोचला. हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषांमधील सिनेमांवर त्यांनी स्वतःची स्वतंत्र मुद्रा उमटवली. नानांच्या संवादाची एक खास शैली होती. शब्दांमधील चढ-उतार आणि त्यासोबत चेहऱ्यावर येणारे भाव यांवर त्यांची हुकमी पकड होती. 'क्रांतिवीर' मधील त्यांचा शेवटचा मोनोलॉग असो किंवा 'नटसम्राट' मधील गणपतराव बेलवलकरांची शोकांतिका, नानांनी ती भूमिका केवळ जगली नाही, तर प्रेक्षकांच्या मनावर कायमची कोरून ठेवली. तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि पद्मश्री सन्मान हे त्यांच्या अभिनयाची पावती होते. नाना पाटेकर हे केवळ अभिनयापुरते मर्यादित नव्हते. 'प्रहार' चित्रपटाच्या वेळच्या अनुभवानंतर ते भारतीय लष्कराच्या इतके प्रेमात पडले की त्यांनी टेरिटोरियल आर्मीमध्ये मानद लेफ्टनंट कर्नल म्हणून सेवा दिली. १९९९ च्या कारगिल युद्धादरम्यान त्यांनी प्रत्यक्ष सीमेवर जाऊन जवानांचा उत्साह वाढवला. हे धाडस आणि देशप्रेम कोणत्याही बॉलीवूड स्टारपेक्षा त्यांना वेगळे ठरवणारे होते. नाना पाटेकर यांच्यातला खरा माणूस दिसला तो महाराष्ट्रातील दुष्काळी भागांमध्ये. मकरंद अनासपुरे यांच्या सोबतीने त्यांनी सुरू केलेली 'नाम फाउंडेशन' ही केवळ एक संस्था नव्हती, तर लाखो शेतकऱ्यांचा तो आधारवड बनली. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मदत करणे, नदी पुनरुज्जीवन, तलाव खोलीकरण या माध्यमातून त्यांनी कोरड्या नद्यांमध्ये पाणी आणले. पडद्यावरचा 'क्रांतिवीर' खऱ्या आयुष्यातही लाखो शेतकऱ्यांसाठी मसीहा बनून धावून गेला. आपल्या मृत्यूच्या काही दिवस आधीच गोव्यातील एका कार्यक्रमात बोलताना नाना म्हणाले होते, 'प्रत्येकाला जायचेच आहे... पण समाजाचे आपण काही देणे लागतो ना? माझा ओबडधोबड चेहरा तुम्ही मान्य केला, त्यामुळे माझे समाजाप्रती देणे लागते.' हा विचार केवळ नानाच मांडू शकत होते. आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत ते साधेपणाने जगले. काटेकोर शिस्त, परखडपणा आणि बेधडकपणा हीच त्यांची ओळख होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटल्याप्रमाणे ते पडद्यावर जितके मोठे, तितकेच मनानेही मोठे होते. मराठी बाणा त्यांनी कधी सोडला नाही. मकरंद अनासपुरे यांच्यासोबत २०१५ साली 'नाम फाऊंडेशन' या संस्थेची स्थापना केली होती. या संस्थेच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांसाठी काम केले. यामध्ये दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत करणे, गरीब आणि शेतकरी कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी आर्थिक हातभार लावणे, नद्यांचे खोलीकरण, अतिवृष्टीमुळे संकट आलेल्या शेतकऱ्यांची मदत, अशी विविध कामे केली जात होती. 'नाम फाउंडेशन' स्थापन करून शेतकऱ्यांसाठी, दुष्काळग्रस्तांसाठी स्वतः शेतात उतरून काम केले. हा अभिनेता नव्हे, तर एक संस्था होती. वनबीएचके च्या घरात राहणारा आणि कोट्यवधी रुपये शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी देणारा हा फकीर कलाकार आता अनंत प्रवासाला निघून गेला आहे. नाना, तुमचा तो खणखणीत आवाज, समाजासाठी कळवळणारे ते हळवे मन आणि तुमचा पडद्यावरील तो करारी बाणा कधीही विसरता येणार नाही. एका खऱ्या नटसम्राटाला आणि समाजसेवकाला भावपूर्ण श्रद्धांजली!

# दुष्काळ इष्टापत्ती ठरो!



**दुष्काळाला इष्टापत्ती ठरवायचे असेल तर सरकारी यंत्रणेने हात झटकून कामाला लागायला हवे. शेतीला सावरण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. शेतकऱ्यांच्या घामाला योग्य मोबदला मिळाला असता तर आज ही वेळच आली नसती. शरद जोशी नेमके हेच तर सांगत होते; पण त्यांचे म्हणणे आपल्याला कळलेच नाही.**

शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांनी सर्वप्रथम 'भीक नको, हवे घामाचे दाम,' अशी मांडणी केली होती. सरकार असेल किंवा अन्य कोणी. ज्यावेळी बळिराजा पिकवतो तेव्हा यंत्रणा ठरवून शेतमालाचे भाव पाडते. तेल, जनावरासाठीची पेंड, कापूस, साखर यांची आयात करून शेतकऱ्यांचीच कोंडी करण्यात येते.

शेतकऱ्याकडे पिकते तेव्हा त्याला याचा लाभ मिळत नाही. दुष्काळाच्या काळामध्ये काहीच त्याच्या हातात लागत नाही. कधी ओला तर कधी कोरड्या दुष्काळाच्या संकटाला शेतकऱ्यांना सामोर जावे लागते. शरद जोशी यांचा दुष्काळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा खूप वेगळा होता, ते दुष्काळाला इष्टापत्ती म्हणत असत. कारण याच काळामध्ये शेतातील राहिलेली कामे पूर्ण करण्याची संधी असते. सिंचनाच्या आघाडीवर देखील आपल्याला काम करता येते. शेतीची उत्पादकता वाढविता येईल, अशी कामे या काळामध्ये मार्गी लावता येतात.

बांधबंदिस्ती केल्याने पुढील कामाचा ताण कमी होतो. त्यानंतर जेव्हा पाऊस पडतो तेव्हा शेतीमधील उत्पादनही वाढलेले असते. शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या संपन्न करायचे असेल तर एक गोष्ट सरकारने आवर्जुन करायला पाहिजे ती म्हणजे जेव्हा पिकते तेव्हा त्या शेतमालाचे भाव पाडण्याचे कारस्थान आधी थांबविले पाहिजे, शरद जोशी यांचे हेच म्हणणे होते. दुष्काळ आला की नियोजनाच्या चर्चा सुरू होतात पण मुळात ही संकल्पनाच गैरलागू आहे. नियोजन कशाचे करायचे?

सरकार स्वतःचे नियोजन करू पाहत आहे. जेव्हा एखाद्या पिकाचे बंपर उत्पादन होते तेव्हा त्याचे भाव पाडले नाहीत, तर शेतकऱ्याला लाभ मिळू शकतो. राज्यातील शेतकऱ्यांची संख्या एवढी मोठी आहे की कितीही आपण ठरविले तरीसुद्धा प्रत्येकाला मदत देता येणे शक्य होणार नाही. प्रत्येकाला मदत करण्याएवढी क्षमता सरकारच्या तिजोरीमध्ये नाही. त्यामुळेच सरकारने जपून पावले टाकायला हवीत.

**पंचनामा कशाचा करायचा?**

माझ्या शेतकरी मित्राचेच उदाहरण यानिमित्ताने मी आपल्याला देऊ इच्छितो. त्याने ३५ एकरामध्ये पेरणी करण्यासाठी साडेतीन ते चार लाख रुपये खर्च केले पण आता त्यांच्या हातामध्ये काहीच पडण्याची शक्यता नाही. त्याच्या शेतामध्ये गेलो तेव्हा सोयाबीनला शेंगा लागल्याचे दिसून आले पण त्या भरण्यासाठी मातीमध्ये पुरेशी ओलच नाही. ज्वारीच्या बारीक दाण्यासारखे दाणे या शेंगांमध्ये आहेत. आता या शेतकऱ्याच्या हाती नेमके किती पीक येईल, हे कुणीच सांगू शकत नाही. अनेक भागांमध्ये पिके माना टाकायला लागली आहेत.

अशा स्थितीमध्ये आपण एक गोष्ट करायला पाहिजे ती म्हणजे शेतकऱ्यांचा लागवड खर्च करून भरून निघेल यासाठी त्याला तातडीने आर्थिक मदत करायला हवी. शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी सरकारने अन्य योजनांवरील खर्चाला कात्री लावायला हवी. 'एल-निनो'चा प्रभाव पुढील वर्षी देखील जाणवणार आहे, अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेतीमध्ये पैसा घातला, आता त्यांच्या हाती काहीच लागणार नाही.

दोन वर्षांचा आर्थिक बोजा शेतकऱ्यांवर येणार आहे. शेतकऱ्यांना आता पुढील वर्षीपर्यंत टिकवून ठेवणे गरजेचे आहे, त्यासाठी सरकारने काटेकोर नियोजन आखणे गरजेचे असते.

दुष्काळ पडला म्हणून शेतीमधील इतर कामे थांबत नाहीत. शेतात वाढलेले तण काढून टाकावे लागते. नाही तर ते पुढील वर्षी आणखी जोमाने फोफावते. पुढील वर्षीपर्यंत शेती टिकवून ठेवण्याइतपत तरी किमान मदत त्याला आपण करायला पाहिजे. खरा प्रश्न हा आहे की शेतकऱ्यांना देण्यासाठी राज्य सरकारकडे खरेच पुरेसे पैसे आहेत का? आता प्रत्येकाचा एकरी दहा ते पंधरा हजार रुपयांचा खर्च झाला असून सरकार नेमकी किती भरपाई देणार आहे? सरकार फार तर एकरी २४ हजार रुपये एवढी भरपाई देऊ शकेल;

पण त्यामुळे काहीच होणार नाही. दुष्काळ पडला की सरकार पंचनाम्याचे नाटक करते. पंचनामा झाल्याने तातडीने शेतकऱ्याचे कर्ज फिटणार नाही. केंद्र सरकारच्या आपत्ती व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्य सरकार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करत असते. तीही केवळ दोन हेक्टरपर्यंत मर्यादित दिली जाते आणि ती तुटपुंजी असते. प्रत्यक्षात शेतकऱ्यांचा एकरी लागवडीचा खर्च खूप मोठा असतो. शेतकरी केवळ दोन हेक्टर लागवड करून थांबतो का? तर याचे उत्तर नाही असे आहे. मग जेवढ्या क्षेत्रावर शेतकऱ्यांनी पेरा केला आहे तेवढ्या क्षेत्रासाठी जो काही खर्च झाला असेल तो खर्च राज्य सरकारने सरळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला पाहिजे.

**उसाचा अतिरेक**

देशभरामध्ये पाणीवाटपाचे नियोजन चुकले आहे. गेल्या वीस वर्षांत राज्यात साखर कारखानदारीचे मोठे पीक फोफावले. त्यामुळे पुढाऱ्यांचे दोन फायदे झाले. एक तर उसाच्या कारखान्यामधून त्यांना पैसे कमावण्याची संधी मिळाली. दुसरे म्हणजे गावात राजकीय प्रभाव निर्माण करण्यासाठी उसासारखे शस्त्र त्यांच्या हाती लागले. मराठवाड्यासारख्या आधीच पाण्याची टंचाई असणाऱ्या भागामध्ये उस आला आणि सगळे गणितच बिघडले. आज या भागामध्ये हजार फुटांपर्यंत बोअरवेल घेतले तरीसुद्धा पाणी लागत नाही. उसाला जेव्हा अधिक पाणी लागते तेव्हा सगळे बोअरवेल तळाला गेलेले असतात.

सरकारचे धोरणही चुकीचे आहे.

एकीकडे जलसिंचन आणि संवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घ्यायचा आणि दुसरीकडे उसाला प्रोत्साहन द्यायचे. उसावर प्रेम करणारे हे सरकार अन्य पिकांचे भाव ठरवून पाडते. सोयाबीन, तूर, हरभरा यांना मग काही किंमतच राहत नाही. हे पाडापाडीचे गणित कसे असते ते पाहा, डाळी आयात करून तूर, हरभरा यांचे भाव पाडायचे. खाद्यतेलाची आयात करून सोयाबीन आणि करडई यांच्यासारख्या तेलबियांना मातीमोल करायचे. मग अशा स्थितीमध्ये शेतकरी स्वाभाविकपणे उसाकडे वळतो. काहीही करा, कोठूनही पाणी मिळवा पण उसाची लागवड करा, अशी त्याची मानसिकता होते. या उसानेच जमिनीतील पाणी शोषून घेतले असून त्याच्याकडे आपण जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतो.

**अनंत देशपांडे**
(लेखक शेतकरी संघटना ट्रस्टचे विश्वस्त आहेत.)

# बामणी व्यवस्थेचा 'हाऊस निग्रो'



गवई यांना बामण वकिलाने बूट फेकून मारल्यानंतर, गवई ला दलित समूहाचा प्रतिनिधी समजून गवई च्या बाजूने मी आणि Suhas Bhasme यांनी 'द वायर आणि दैनिक सकाळ' मधे ऐक लेख लिहला होता. गवईच्या बाजूने ,बोलणे काही लिहणे ही माझी चूक होती. असे आता वाटते आहे . या क्षणी गवई बाबत माझी खालील भूमिका आहे.

अमेरिकेच्या इतिहासात काळ्या लोकांचे अंदोलन चालवणारे माल्कम एक्स आणि मार्टिन ल्यूथर किंग हे दोन नेते होते.मार्टिन ल्युथर ला काळ्या लोकांच्या आंदोलनाला गोऱ्या लोकांची सहानुभूती म्हत्वाची वाटत होती. मार्टिन ल्युथर चा प्रभाव असणारे काळे लोक गोऱ्या लोकांच्या विचारांचे, मूल्यांचे आणि सौंदर्याच्या मानकांचे अंधानुकरण करून त्यांची सहानुभूती मिळवण्याचा भाभडा प्रयत्न करायचा.या उलट माल्कम एक्स ची भूमिका होती.

त्याने निग्रोचे दोन प्रकार केले . 'हाऊस नीग्रो' विरुद्ध फील्ड नीग्रो': हाऊस नीग्रो' (मालकाचे मूल्य आत्मसात करणारा) आणि 'फील्ड नीग्रो' (स्वातंत्र्यासाठी लढणारा) हाऊस नीग्रो हे गोऱ्यांच्या मूल्यांचे ,विचारांचे अनुकरण करायचे (उदा. केस सरळ करणे, त्वचा फिकट करणे ,धर्माचे अनुकरण करणे, गोऱ्या लोकांना आपले मुक्तिदाता समजणे ) हे हाऊस नीग्रो स्वतःच्याच आत्म-अस्वास्थ्य आणि वैचारिक गोंधळाचे कैदी होते . ते त्यांच्या स्व-ओळखीच गंभीर संकट होते ' गोऱ्यांच्या विचारांचे समर्थन करणारे काळे लोक'हाऊस नीग्रो' च्या भूमिकेत होते.

माल्कम एक्स ला हे कधीच मान्य नव्हते, तो म्हणाला ही वृत्ती गुलामगिरी आणि वसाहत वादाच्या मानसिकतेतून निर्माण झालेली 'मानसिक गुलामगिरी' होती. काळ्या लोकांनी गोऱ्यांच्या मान्यतांवर अवलंबून राहण्या ऐवजी स्वतःची परंपरा, इतिहास आणि सौंदर्य यांचा शोध घेऊन आत्म-सन्मान निर्माण करावा.

भारतातील काही दलित हे हाऊस निग्रो सारखी बामण आणि बामणी व्यवस्थेची 'सहानुभूती' आणि 'व्यवस्थात्मक लाभ' मिळवण्यासाठी बामण आणि बामणी व्यवस्थेचे हाऊस निग्रो बनण्याची धडपड करत राहतात.भूषण गवई बामणी व्यवस्थेचा 'हाऊस निग्रो' आहे .

**केशव वाघमारे**

## पडद्यावरचा रांगडा राजा !

गुरुवारी सकाळी नाना पाटेकर यांचे आकस्मिक निधन झाल्याची बातमी धक्कादायक होती. पडद्यावरचा तो रांगडा, रोखठोक आणि तितकाच हळवा माणूस आज हरपला. 'क्रांतिवीर' ते 'नटसम्राट' पर्यंत त्यांचा अभिनय हा अभिनय नव्हता तर सत्याची प्रचिती होती. तो आवाज, ती नजर आणि ती आगळी देहबोली रसिक विशेषतः महाराष्ट्र कधीच विसरू शकत नाही. काटेकोर शिस्त, परखडपणा आणि बेधडकपणा हीच त्यांची ओळख होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटल्याप्रमाणे ते पडद्यावर जितके मोठे, तितकेच मनानेही मोठे होते.

मराठी बाणा त्यांनी कधी सोडला नाही. मुंबईतील छोट्याशा घरात राहूनही त्यांनी मकरंद अनासपुरे यांच्यासोबत 'नाम फाउंडेशन' स्थापन करून शेतकऱ्यांसाठी, दुष्काळग्रस्तांसाठी स्वतः शेतात उतरून काम केले. हा अभिनेता नव्हे, तर एक संस्था होती.त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**प्रा. विजय कोष्टी**

## 'नटसम्राटा'ला भावपूर्ण श्रद्धांजली!

ज्येष्ठ आणि अष्टपैलू अभिनेते नाना पाटेकर (विश्वनाथ गजानन पाटेकर) यांच्या एकाएकी जाण्याच्या हृदयद्रावक बातमीने मन सुन्न झाले. हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीवर गेली अनेक दशके आपल्या खणखणीत आवाजाने आणि संवादफेकीच्या अनोख्या धारधार शैलीने त्यांनी छाप पाडली होती. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीची आणि रंगभूमीची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे. 'पुरुष' या अजरामर नाटकातील एक भ्रष्ट आणि अहंकारी राजकारणी 'गुलाबराव' ही भूमिका असो, 'नटसम्राट'मधील 'गणपतराव बेलवलकर' असो, 'क्रांतिवीर'मधील बेडर नायक असो किंवा 'परिंदा', 'प्रहार' आणि 'तिरंगा' यांसारख्या हिंदी चित्रपटांतील त्यांच्या बंडखोर नायकाच्या भूमिका असोत, नाना पाटेकर प्रत्येक भूमिका अक्षरशः जगले. 'क्रांतिवीर'(१९९४) चित्रपटातील त्यांचा तो ऐतिहासिक संवाद, 'आ गए मेरी मौत का तमाशा देखने...' तसेच हिंदू-मुस्लिम रक्तातील फरक दाखवणारा तो प्रसंग आजही अंगावर शहारा आणतो.

'एक मच्छर साला आदमी को हिजडा बना देता है...' हा 'यशवंत' (१९९७) चित्रपटातील त्यांचा डायलॉग हिंदी सिनेमाच्या इतिहासातील गाजलेल्या सर्वात प्रभावी संवादांपैकी एक आहे. नाना पाटेकर हे केवळ एक महान अभिनेते म्हणूनच नव्हे तर एक संवेदनशील आणि सहृदय माणूस होते. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी त्यांनी स्थापन केलेल्या 'नाम फाउंडेशन' च्या माध्यमातून केलेले सामाजिक कार्य त्यांच्यातील दातृत्वाची आणि सहृदयतेची साक्ष देते. सामाजिक भान जपणाऱ्या या नटसम्राटाला भावपूर्ण श्रद्धांजली!

**प्रदीप मोरे**

# मतदार याद्यांमधील घोळ

मी १९७७ पासून मतदान करत आलो आहे. त्यापूर्वी आणि नंतरही मतदारांच्या याद्या निर्दोष नसायच्या. ग्रामीण राजकारणात रुची असणारे परंतु शहरात येऊन वसलेले शेकडो लोक दोन्ही ठिकाणच्या मतदार यादीत स्वतःचे नाव असले पाहिजे, याची काळजी घ्यायचे. तसेच मरण पावलेल्या व्यक्तींची नावे दीर्घकाळ मतदार यादीत असायची. देशाच्या औद्योगीक रणासोबतच फार मोठ्या प्रमाणात आदिवासींचे व ग्रामीण मजुरांचे विस्थापन/स्थलांतर होऊन मतदार यादीत आपले नाव असावे याबाबत त्यांच्यात जागरूकता नव्हती. नव्याने मतदानाचा हक्क मिळालेली युवा पिढी सुद्धा यादीत नाव सामील करून घेण्यासाठी स्वतःहून फारसे कष्ट घेत नव्हती. निवडणूकीचे महत्व आणि त्याबाबतची जागरूकता हळू हळू वाढत गेली.




लोक प्रतिनिधी कायद्याअंतर्गत मतदार याद्या अद्यावत ठेवणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. उचित वाटल्यास निवडणूक आयोग केव्हाही मतदार याद्यांचे विशेष सखोल परीक्षण (एईं) करू शकतो. तसे तर मृतांची नावे वगळणे, मतदारांनी पत्ता बदलला असल्यास त्याची नोंद करणे, नवीन मतदार नोंदविणे हे काम सातत्याने सुरु राहणेच अपेक्षित आहे. परंतु मतदार याद्यांमध्ये खुप दोष आहेत, असे निवडणूक आयोगास आढळून आल्यास एसआयआर केला जातो. त्यासाठी कायद्याने कालावधी निश्चित केलेला नाही. एसआयआर हा एखाद्या मतदार संघाचा, राज्याचा अथवा अनेक राज्यांचा एकाच वेळी करण्याची मुभा आहे. त्यासाठी आयोगाच्या कर्मचाऱ्यांनी घरोघर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करणे अपेक्षित असते. बिहार, पश्चिम बंगाल, आसाम मधील निवडणुकांपूर्वी त्या त्या राज्यांच्या मतदार याद्या सदोष आहेत अशी खात्री झाल्यामुळेच निवडणूक आयोगाने त्या राज्यांमध्ये एसआयआरची प्रक्रिया राबविली असणार. या तिन्ही राज्यांमधील मतदार यादीत नक्की कोणकोणत्या प्रकारचे दोष आढळले, याची माहिती मात्र उपलब्ध नाही.

आसाम, बिहार व पश्चिम बंगाल मध्ये फार मोठ्या प्रमाणात बांगलादेशी घुसखोर शिरले असून त्यांची नावे मतदार यादीत घुसडली गेली आहेत, असा आरोप भाजपचे सर्वोच्च नेते वारंवार करत होते. तशी तक्रार त्यांनी लेखी स्वरुपात निवडणूक आयोगाकडे करून एसआयआरची मागणी केली की नाही, याची मला माहिती नाही. त्यांच्या भाषणांची दखल घेऊन आयोगाने स्वतःच एसआयआर करण्याचे ठरविले असावे. तसे जर असेल तर एसआयआर नंतर या तीन राज्यांमध्ये व आता महाराष्ट्रासह इतरही राज्यांमध्ये जी मोठ्या प्रमाणात नावे वगळण्यात आली आहेत, त्यापैकी घुसखोरांची संख्या किती, हे कळणे अत्यावश्यक आहे. कारण ही संख्या कळल्यास केंद्र शासनास देशाच्या सीमांवर अधिक कडेकोट बंदोबस्त ठेऊन घुसखोरांना देशात शिरण्यापूर्वीच अटकाव करता येईल. अर्थात सीमेवर बंदोबस्त पूर्वीपासून आहेच. तरीही जर मोठ्या प्रमाणात घुसखोर शिरले असतील तर तो केंद्र शासनाचा निष्काळजीपणा ठरतो. कोणत्या घुसखोरांची कोणत्या वर्षापासून मतदार यादीत नावे आहेत, हे कळल्यास कॉंग्रेसचे व भाजपचे माप त्यांच्या त्यांच्या पदरात टाकता येईल.

घुसखोरी वरून आठवले. १९७१ मध्ये बांगलादेश निर्मितीपूर्वी आम्ही निर्वासित छावण्यांमध्ये काही महिने स्वयंसेवक म्हणून भारत-पाकिस्तान सीमेजवळ (बंगाल मधील जलपायगुडी जवळ) राहिलो होतो. त्यावेळी असे ऐकायला मिळायचे की अनेक बांगलादेशी (त्यावेळचे पाकिस्तानी) लोक भारतात काम करायला दिवसा यायचे आणि रात्री आपापल्या गावी निघून जायचे. भारतीय लष्कराने तर एकदा आम्हाला जीपमधून बांगलादेशच्या आत २०-३० मैल फिरवूनही आणले होते.

निवडणूक आयोगाविरोधात सध्या जो गदारोळ सुरु आहे, त्यातून काही मुद्दे स्पष्ट होतात.

१. निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करणाऱ्या समितीत पूर्वी सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सदस्य असायचे. ते, पंतप्रधान व विरोधी पक्षनेता अशा तिघांची समिती आयुक्तांची निवड करत असे. परंतु भाजप सरकारने त्या समितीतून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना वगळण्याचा व त्यांच्या ऐवजी एका कॅबिनेट मंत्र्याचा समावेश करणारी दुरुस्ती कायद्यात केली. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेविषयी नागरिकांमध्येही साधार शंका निर्माण झाली.

२. जी सुमारे १३ कोटी नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत, त्यांची वर्गवारीसह माहिती आयोगाने न दिल्यामुळे आयोग हा सरकारच्या इशाऱ्यावर बेकायदेशीर काम करत आहे, असा समज वाढू लागला.

३. इंडियन एक्स्प्रेस, द हिंदू आणि रिपोर्टर्स कलेक्टीव यांनी शोधपत्रकारिता करून अलीकडे जी माहिती उजेडात आणली आहे, त्यामुळे सामान्य जनतेचा आयोगावरचा विश्वास डळमळीत झालेला आहे.

या वृत्तपत्रांवर आणि वार्ताहरांवर आयोगाने अथवा शासनाने आजपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही. शोध पत्रकारांनी प्रसिद्ध केलेल्या माहितीचे आयोगाने मुद्देवार खंडन केलेले नाही. भाजपचे अथवा शासनाचे जे प्रवक्ते आंदोलकांवर अनेक प्रकारचे आरोप करणाऱ्या मुलाखती देत आहेत, त्यांनी देखील निःसंदिग्धपणे असे विधान केलेले नाही की एक्सप्रेस अथवा हिंदू मध्ये आलेले वृत्त साफ खोटे आहे. तीनही निवडणूक आयुक्तांनी एकत्रपणे पत्र परिषद घेऊन हे सगळे आरोप खोडून काढलेले नाहीत. त्यामुळे ज्ञानेश कुमारांवर होत असलेले आरोप खरेच असावे, असे मानण्यास भरपूर जागा आहे.

**किशोर देशपांडे**

# सोयाबीन कापणीला वेग; पावसाच्या धास्तीने शेतकऱ्यांची धावपळ

## ढगाळ वातावरण अन् विजांच्या कडकडाटाने चिंता वाढली

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
परिसरात सोयाबीन कापणीच्या हंगामाला वेग आला असून, बहुतांश सोयाबीन उत्पादक शेतकरी कापणीच्या कामात व्यस्त आहेत. त्यातच ६ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील काही भागांत पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. परिसरात ढगाळ वातावरणासह विजांचा कडकडाट झाल्याने कापणी करून शेतात पडून



असलेल्या सोयाबीन पिकाला पावसाचा फटका बसण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. यंदा आधीच पावसाच्या खंडामुळे सोयाबीनच्या उत्पादनावर परिणाम झाला असून, उरलेले पीक तरी सुरक्षितपणे घरी आणण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू झाली आहे. आभाळात ढग दाटून येताच शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत. हातातोंडाशी आलेले पीक पावसामुळे खराब होऊ नये, यासाठी शेतकरी दिवसरात्र कष्ट घेत आहेत. अखेरच्या टप्प्यातही निसर्गाची परीक्षा सुरूच असल्याचे चित्र आहे.

■ 'कापणी केलेले सोयाबीन शेतात पडून आहे. रात्री ढगाळ वातावरण आणि विजांचा कडकडाट झाल्याने पावसाची भीती वाढली. सकाळी लवकरच शेतात जाऊन पीक सुरक्षित करण्याचे काम सुरू केले.'

**-संजय नवले,** शेतकरी

■ 'यंदा आधीच उत्पादन कमी आहे. उरलेले सोयाबीन पावसात भिजले तर मोठे नुकसान होईल. त्यामुळे हवामानाचा अंदाज घेत कापणी आणि सोयाबीन सुरक्षित ठिकाणी आणण्यासाठी घाई करावी लागत आहे.'

**- मोहन नेरकर,** शेतकरी

# अंजनगाव सुर्जी एसबीआय मुजोर कारभार उघड

## पीक कर्जासाठी विमा पॉलिसीची जबरदस्ती
## शिवसेना,प्रहार संघटनेने व्यवस्थापकाला धरले धारेवर

**अंजनगाव सुजी/वार्ताहर**
सध्या जिल्ह्यात भयंकर दुष्काळी परिस्थिती असताना शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत अंजनगाव सुर्जी येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) शाखेतून पीक कर्ज घेण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना भर रकमेच्या विमा पॉलिसीची सक्ती केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.धनेगाव येथील शेतकरी राहुल येवले यांनी हा प्रकार उघडकीस आणल्यानंतर पीक कर्ज काढणारे अनेक शेतकरी तक्रारी घेऊन पुढे येऊ लागले आहेत. बँक अधिकारी कर्ज मंजुरीच्या वेळी शेतकऱ्यांना नाहक विमा पॉलिसी घेण्यास भाग पाडत असल्याचा आरोप



शेतकऱ्यांनी केला आहे.

या प्रकरणाची माहिती मिळताच माजी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट आणि प्रहार संघटनेचे शंभू मालठाणे यांनी थेट एँह शाखा गाठून शाखा व्यवस्थापकांना धारेवर धरले. यावेळी बँक अधिकाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले.कोणत्याही शेतकऱ्याला पीक कर्जासाठी विमा पॉलिसीची सक्ती केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा गोपाल पाटील अरबट आणि शंभू मालठाणे यांनी बँक प्रशासनाला दिला.यावर शाखा व्यवस्थापक सचिन कसबे यांनी यापुढे कोणत्याही शेतकऱ्याला विमा पॉलिसीची सक्ती केली जाणार नाही, असे लेखी आश्वासन दिले. तसेच बँक शाखेत 'पीक कर्जासाठी विमा पॉलिसी बंधनकारक नाही' अशा आशयाचा सूचना फलक लावण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.'सध्या दुष्काळाची परिस्थिती गंभीर आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. शिवसेना नेते आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेतकऱ्यांना सरकारतर्फे सर्वतोपरी मदत करीत आहेत.

शेतकऱ्यांना त्रास दिल्यास संबंधितांना थेट कारवाईला सामोरे जावे लागेल. शेतकऱ्यांनी विम्याची सक्ती केल्यास थेट आमच्याकडे तक्रार दाखल करावी,' असे आवाहन गोपाल पाटील अरबट यांनी केले.रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (RBI) नियमानुसार कोणत्याही प्रकारच्या कर्जासाठी विमा पॉलिसी बंधनकारक करता येत नाही. तरीही शाखा पातळीवर असे प्रकार घडत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे.यावेळी शिवसेना शहर प्रमुख मुन्ना इसोकार, विशू पाटील सावरकर, सुधाकर पाटील खारोळे, नितीन चौखडे, सुधाकर फुलबंकर,सोणू रायलकर, ज्ञानदीप बारब्दे यांच्यासह शिवसैनिक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रध्दांजली



## नाना पाटेकर

### नाना दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या पाठीशी

ज्येष्ठ अभिनेते व सामाजिक कार्यकर्ते नाना पाटेकर यांच्या निधनाने भारतीय कलाविश्वाची आणि महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे, अशा शब्दांत माजी मंत्री तथा आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी तीव्र शोक व्यक्त केला.आपल्या शोकसंदेशात त्या म्हणाल्या, 'नाना पाटेकर हे केवळ एक महान अभिनेते नव्हते, तर 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे सच्चे समाजसेवक होते. त्यांचा परखडपणा, मातीशी असलेली नाळ आणि सामाजिक तळमळ सदैव स्मरणात राहील. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक संवेदनशील आणि बुलंद व्यक्तिमत्त्व गमावले आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.'

**ॲड. यशोमती ठाकूर**
(माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य)

### नटसम्राट नाना



आजची सकाळ ती हृदयावर आघात करणारी बातमी घेऊन आली आणि नाट्य - सिनेरसिकाना धक्का देऊन गेली. रंगभूमी बरोबरच मराठी आणि हिंदी सिनेमा सृष्टीवर अधिराज्य गाजवणारा नटश्रेष्ठ नाना आपल्याला सोडून पडद्याआड गेले, त्यांनी शेवटची एक्सिट घेतली या बातमीवर विश्वासच बसत नाही.जीवनाच्या रंगभूमीवर समाजसेवेचे व्रत घेऊन जगणारे नाना आता आपल्यात नाहीत ही कल्पना सुद्धा सहन होत नाही. साधारणपणे १९८२ - ८३ मधे अमरावतीच्या वनिता समाज येथे स्व. रिमा लागू यांचे सोबतचे नाना पाटेकरांचे 'पुरुष' नाटक होते तेंव्हा त्यांना पहिल्यांदा पाहण्याचा मला योग आला तो स्व. राजाभाऊ मोरे यांच्या सोबत. त्यानंतर नाना पुन्हा अमरावतीला आले ते दुसरे नाटक घेऊन तन माजोरी आणि त्यांच्या या भूमिका पाहिल्यानंतर अनेक कलावंत मनोमन त्यांचे शिष्य झालेत. नाट्यपरिषदेचा अध्यक्ष म्हणून नानांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# डॉ.अरुण मानकर अनुवादित 'गांधी' पुस्तकांचे प्रकाशन

**अमरावती/का.प्र.**



अमेरिकेतील जगविख्यात लेखक,गांधीवादी,जागतिक शांततेचे पुरस्कर्ते,जेम्स डब्ल्यू डग्लस यांच्या 'गांधी अँड अनस्पीकेबल' या इंग्रजी पुस्तकाचा डॉ.अरूण मानकर यांनी मराठीत 'गांधी आणि अनिर्वचनीय' या नावाने अनुवाद केला.तसेच नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर गांधी विचारधारा विभागामार्फत प्रकाशित 'गांधीजगत' या पुस्तकाचे डॉ.अरुण मानकर यांनी संपादन केले.या दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ दर्यापूर येथे आयोजित केला होता.

या कार्यक्रमात बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष नगर पालिकेचे मुख्याधिकारी, डॉ.विकास खंडारे म्हणाले की, आजच्या एआय च्या काळात गांधीजींच्या तत्त्वज्ञानावरील हे पुस्तक शोध प्रबंध आहे.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते,निवृत्त प्राचार्य श्रीकृष्ण मावंदे यांनी गांधी चरित्राचा वेध घेतला.तसेच अनुवादित पुस्तकाची बलस्थाने विषद करीत,आजच्या जगाला गांधी विचारांची अत्यंत आवश्यकता आहे.असे सांगितले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे,शेतकरी आंदोलक तथा लेखक विजु विल्हेकर यांनी 'साबरमती के संत तुने कर दिया कमाल' गीत आपल्या बुलंद आवाजात गाऊन भाषणाची सुरुवात केली.पुढे ते म्हणाले गांधींनी आयुष्यभर मरणाची भीती बाळगली नाही.डी.एन.पाटील फाऊंडेशन,चला गांधी साकारू या! मिशन,कस्तुरी नर्सरी,दर्यापूर गार्डन क्लब,जल वृक्ष चळवळ व डॉ.अरुण मानकर मित्रपरिवारातर्फे हा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाचे मनोज पाटील प्रास्ताविक तर विजय मेंढे यांनी आभार संचालन प्रा.डॉ.रंजीत गणोदे यांनी केले.कार्यक्रमाला दिनकर गायगोले,राजा वडाळ,अनिल कुंडलवार,डॉ. महेंद्र काळे,उमेश पागृत, विलास पुंडकर, सुनील बसवंत,विजय लाजूरकर,माणिकराव मानकर, मनोज तायडे, माधव देशमुख,प्रभाकर गहले,गणेश लाजुरकर,अमोल शेंडे,सुनील पाटील गावंडे,सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती,आणि इतर गणमान्य मंडळी उपस्थित होती.

# दिवाळीच्या सुटीनंतर 'पॅट'चा पेपर; विद्यार्थ्यांचा ताण वाढणार!

## परीक्षा प्रथम सत्र परीक्षेसोबत घेण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत दरवर्षी सत्र परीक्षेदरम्यान संकलित मूल्यमापन चाचणी अर्थात 'पॅट' परीक्षा घेण्यात येते. मात्र, यंदा जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार 'पॅट-२' परीक्षा दिवाळीच्या सुट्टीनंतर घेण्यात येणार असल्याने शिक्षक संघटनांनी या निर्णयाला विरोध केला आहे. दिवाळीच्या सुट्टीनंतर लगेचच विद्यार्थ्यांवर परीक्षेचा ताण टाकणे योग्य नसल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

राज्यात दिवाळीच्या सुट्टीत बहुतांश विद्यार्थी मूळगावी किंवा अन्यत्र फिरण्यासाठी जातात. यंदा मात्र सुट्टी संपल्यानंतर शाळेत परतताच विद्यार्थ्यांना 'पॅट' परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे सुट्टीचा आनंद घेण्याऐवजी विद्यार्थ्यांवर परीक्षेची चिंता राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.शिक्षण विभागाकडून इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी दरवर्षी 'पॅट' परीक्षा घेतली जाते. यंदा परिषदेकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार भाषा, गणित आणि इंग्रजी या तीन विषयांची 'पॅट-२' चाचणी दिवाळीची सुट्टी संपल्यानंतर नोव्हेंबरमध्ये होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुट्टीच्या काळातही परीक्षेची तयारी करावी लागण्याची शक्यता आहे.

सुटीनंतर लगेच परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव निर्माण होऊ शकतो. विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य आणि तणावमुक्त शिक्षण यांचा विचार करून परीक्षेचे नियोजन करणे आवश्यक आहे, अशी भूमिका महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार यांनी व्यक्त केली.

सुटीनंतर पुन्हा परीक्षेची तयारी करावी लागल्यास विद्यार्थ्यांवर अनावश्यक मानसिक दबाव येऊ शकतो. त्यामुळे तणावमुक्त शिक्षणाच्या दृष्टीने 'पॅट' परीक्षा ऑक्टोबरअखेर घेणे अधिक योग्य ठरेल,असे लोमेश खैरकर मुख्याध्यापक,जि.प. हायस्कूल उत्तमसरा यांनी सांगितले.

शाळांमध्ये प्रथम सत्र परीक्षेचे नियोजन ऑक्टोबरमध्ये केले जाते. त्याच कालावधीत 'पॅट' परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांचा ताण कमी होऊन शाळांचे शैक्षणिक नियोजनही अधिक सुकर होईल,असे श्रीमती मिनाक्षी इंगळे मुख्याध्यापक,जि.प.शाळा उत्तमसरा यांनी सांगितले.

सुट्टी संपल्यानंतर लगेच 'पॅट' परीक्षेची तयारी करण्याची वेळ विद्यार्थ्यांवर येऊ नये. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करता ही परीक्षा प्रथम सत्र परीक्षेसोबत घेणे अधिक योग्य व व्यवहार्य ठरेल, असे शैलेश दहातोंडे मुख्याध्यापक जि.प.शाळा कोलटेक यांनी सांगितले.दरम्यान, शिक्षक संघटनांनी याबाबत शिक्षण आयुक्त तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे निवेदन देऊन परीक्षेच्या वेळापत्रकाचा पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे. दिवाळीच्या सुटीनंतर विद्यार्थ्यांना थेट परीक्षेच्या तणावात न ढकलता त्यांना नियमित अभ्यासासाठी सकारात्मक वातावरण मिळावे, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात आली आहे.

## उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांचा दौरा

**अमरावती-**उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत शुक्रवारी,९ ऑक्टोबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.दौऱ्यानुसार, मंत्री डॉ. सामंत यांचे शुक्रवारी दुपारी २.३० वाजता विमानाने अमरावती विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर दुपारी ४ वाजता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. के. जी. देशमुख सभागृहात राज्य मराठी विकास संस्था आणि विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता मंत्री डॉ. सामंत नागपूरकडे प्रयाण करतील.

## निवडणूक निरीक्षक अभय महाजन नियुक्त

**अमरावती-**भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक म्हणून अभय अरविंद महाजन (भाप्रसे) यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी दिली आहे.महाजन यांचा निवासाचा पत्ता 'तापी', सार्वजनिक बांधकाम विभाग शासकीय विश्रामगृह, चपराशीपुरा, अमरावती असा असून त्यांचा भ्रमणध्वनी क्र.८९९९१०८९१२ असा आहे. तसेच ईमेल आयडी - amravatigeneralobserver@gmail.com असा आहे. निवडणूक निरीक्षक यांना 'तापी', सार्वजनिक बांधकाम विभाग शासकीय विश्रामगृह येथे सकाळी ११ ते दुपारी १२ वा. या कालावधीत भेटता येईल. तसेच नमूद भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल. असेही निवडणूक विभागातर्फे कळविण्यात आले आहे.

## 'अक्षरलेणी' भित्तीपत्रकाचे उद्घाटन

**अमरावती -**अभिजात मराठी भाषा सन्मान दिनाचे औचित्य साधून महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा अंतर्गत सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी मराठी भाषा तथा तत्त्वज्ञान अध्ययन केंद्र, रिद्धपूर येथे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि साहित्यिक अभिव्यक्तीला मंच उपलब्ध करून देणाऱ्या 'अक्षरलेणी' भित्तीपत्रकाचे उद्घाटन उत्साहात करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला चालना मिळावी, त्यांच्या साहित्यिक प्रतिभेला वाव मिळावा तसेच विविध साहित्यप्रकार, सामाजिक विषय, भाषा आणि संस्कृती यांविषयीची त्यांची जाणीव अधिक समृद्ध व्हावी, या उद्देशाने 'अक्षरलेणी' भित्तीपत्रकाची निर्मिती करण्यात आली आहे. या भित्तीपत्रकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कविता, कथा, लेख, विचार, साहित्यिक माहिती, चित्रे तसेच विविध सर्जनशील साहित्य सादर करण्याची संधी मिळणार आहे. डॉ. शुद्धोधन कांबळे यांच्या हस्ते सदर भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी 'अक्षरलेणी' भित्तीपत्रकाचे अवलोकन करून विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. भित्तीपत्रक हे केवळ लेखन मांडण्याचे माध्यम नसून विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला, निरीक्षणशक्तीला आणि अभिव्यक्तीला दिशा देणारे प्रभावी माध्यम असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक वास्तवाचे भान ठेवून दर्जेदार लेखन करावे, असे आवाहन केंद्र प्रभारी डॉ. नीता मेश्राम यांनी यावेळी केले.

# अल-निनोच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामात पाण्याचे काटेकोर नियोजन करा

## उपलब्ध जलसाठ्यानुसारच पिकांची निवड; ठिबक व तुषार सिंचनाचा अवलंब करा
## तालुका कृषी अधिकारी संचित ढाकरे यांचे आवाहन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
यंदा अल-निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण व वितरण अनियमित राहण्याची शक्यता लक्षात घेता आगामी रब्बी हंगामात उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करणे अत्यावश्यक ठरणार आहे. विहीर, बोअरवेल, तलाव आदी जलस्रोतांमध्ये उपलब्ध असलेल्या पाण्याचा अंदाज घेऊनच शेतकऱ्यांनी रब्बी पिकांचे क्षेत्र निश्चित करावे. तसेच पाण्याचा प्रत्येक थेंब पिकाच्या उत्पादनासाठी योग्य पद्धतीने वापरावा, असे आवाहन चांदूर रेल्वेचे तालुका कृषी अधिकारी संचित ढाकरे यांनी केले आहे.

तालुक्यात रब्बी हंगामात प्रामुख्याने हरभरा व गहू ही पिके घेतली जातात. यासोबतच तूर तसेच संत्रा बागांचे व्यवस्थापन देखील महत्त्वाचे आहे. उपलब्ध पाणीसाठा मर्यादित असल्यास पारंपरिक पद्धतीने मोकळे पाणी देण्याऐवजी ठिबक, तुषार किंवा संरक्षित सिंचन पद्धतींचा वापर करून पाण्याची बचत करणे गरजेचे असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. हरभरा हे तुलनेने कमी पाण्यावर येणारे पीक असले तरी काही संवेदनशील अवस्थांमध्ये सिंचन करणे महत्त्वाचे आहे. पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी फांद्या फुटण्याच्या अवस्थेत आणि ५० ते ५५ दिवसांनी घाटे भरण्याच्या अवस्थेत पाणी देणे फायदेशीर ठरते. मात्र, हरभऱ्याला फुलोऱ्याच्या टप्प्यावर पाणी देणे टाळावे, अन्यथा फुलगळ होऊन झाडाची शाकीय वाढ वाढण्याची शक्यता असते. कमी पाण्यात चांगले उत्पादन मिळविण्यासाठी तुषार सिंचनाचा वापर करणे उपयुक्त ठरणार आहे.

गव्हाच्या पिकाला जमिनीच्या प्रकारानुसार साधारणपणे ५ ते ६ पाण्याच्या पाळ्या लागू शकतात. मात्र पाणीटंचाईच्या परिस्थितीत प्रत्येक पाळी देणे शक्य नसल्यास पिकाच्या महत्त्वाच्या अवस्थांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. मुकुटमुळे फुटण्याची अवस्था सुमारे २१ दिवसांनी, कांडी धरण्याची अवस्था ४० दिवसांनी, फुलोरा सुमारे ६० दिवसांनी आणि दाणे भरण्याची अवस्था ८० दिवसांनी येते. पाण्याची कमतरता असल्यास किमान मुकुटमुळे फुटताना व दाणे भरताना सिंचन करणे आवश्यक आहे. मोकळ्या पाण्याऐवजी तुषार किंवा इतर संरक्षित सिंचन पद्धतींचा वापर केल्यास पाण्याची बचत करता येते. दीर्घ मुदतीचे तूर पीक सध्या महत्त्वाच्या टप्प्यात असून, जमिनीतील ओलावा वेगाने कमी होत असल्यास पिकावर पाण्याचा ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या काळात पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये. ओलावा टिकविण्यासाठी एका आड एक सरीने पाणी देणे किंवा संरक्षित सिंचनासाठी तुषार पद्धतीचा वापर करणे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते.

चांदूर रेल्वे तालुक्यात संत्रा बागांचे क्षेत्र मोठे असल्याने अल्प पाणीसाठ्याच्या परिस्थितीत संत्रा उत्पादकांनी विशेष दक्षता घेणे गरजेचे आहे. संत्रा झाडांना मोकळे पाणी देण्याऐवजी ठिबक सिंचनाचा वापर करावा. तसेच झाडांच्या छत्रछायेखाली वाळलेले गवत, पराटी किंवा मल्चिंग पेपरचे आच्छादन केल्यास जमिनीतील ओलावा टिकून राहण्यास मदत होते आणि बाष्पीभवन कमी होते. त्यामुळे पाण्याची लक्षणीय बचत होऊ शकते. अंबिया बहाराचे नियोजन करताना उपलब्ध पाणीसाठ्याचा अंदाज घेऊनच निर्णय घ्यावा, असे कृषी विभागाने सुचविले आहे.

**पाण्याच्या उपलब्धतेनुसारच पिकांचे क्षेत्र ठरवा**



'तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी विहीर, बोअरवेल किंवा तलावातील पाण्याची उपलब्धता तपासूनच रब्बी पिकांचे क्षेत्र निश्चित करावे. पिकांना गरजेपेक्षा जास्त पाणी न देता ठिबक व तुषार सिंचनाचा अवलंब करावा. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे हीच यंदाच्या रब्बी हंगामाची गरज आहे,' असे आवाहन तालुका कृषी अधिकारी संचित ढाकरे यांनी केले आहे.




# नाना ते 'नाम'



अभिनेता नाना पाटेकर यांच्या अभिनयामागे त्यांच्या संघर्षाने भरलेल्या आयुष्याचा मोठा वाटा होता. बालपणीची गरिबी, वडिलांचा बंद पडलेला व्यवसाय, तेराव्या वर्षी चित्रपटाचे पोस्टर रंगवण्याचे काम, न्यूनगंड आणि पहिल्या मुलाचे निधन अशा अनेक प्रसंगांनी त्यांना घडवले.

**नाना पाटेकरः संघर्षातून साकारलेला एक समृद्ध नटसम्राट**

नाना पाटेकर यांच्या अभिनयाची, त्यांच्या गाजलेल्या संवादांची आणि 'नटसम्राट'मधील गणपतराव बेलवलक रांच्या व्यक्तिमत्त्वाची भुरळ सर्वांनाच पडली. परंतु, पडद्यावर दिसणारा नानांचा 'रागीटपणा' आणि अभिनय हा कुठल्याही ड्रामा स्कूलमधून आलेला नव्हता, तर तो त्यांनी खऱ्या आयुष्यात भोगलेल्या गरिबी आणि संघर्षातून जन्माला आला होता.

आज नानांच्या चित्रपटांमधील प्रसंग सोशल मीडियावर पुन्हा व्हायरल होतील. 'आ गे मेरी मौत का तमाशा देखने'पासून 'साला ये दुःख काहे नहीं खत्म होता बे..'पर्यंत अनेक संवाद पुन्हा ऐकवले जातील. पण नाना पाटेकर यांना समजून घ्यायचे असेल, तर त्यांच्या चित्रपटांपेक्षा त्यांच्या आयुष्यात डोकावणे अधिक महत्त्वाचे आहे. मग लक्षात येतं की, आयुष्यानेच नानांना अभिनय शिकवला असावा!

नानांचा जन्म मुंबईत झालेला असला, तरी त्यांचे बालपण रायगड जिल्ह्यातील मुरूड जंजिरा येथे गेले. त्यांचे वडील गजानन पाटेकर मुंबईत कापडाच्या व्यवसायात होते आणि आई निर्मला काटकसरी, शिस्तप्रिय होत्या. लहानपणी आपल्या दोन भावांपेक्षा आपण दिसायला कमी असल्याची भावना नानांच्या मनात होती. या न्यूनगंडातूनच त्यांनी रंगभूमीचा आधार घेतला, असे त्यांनी सांगितले होते. तिसरीत असतानाच गावातील नाटकां मध्ये ते सहभागी होऊ लागले. मात्र नाटक हा छंद म्हणून सुरू झालेला प्रवास पुढे जगण्याचा आधार होईल, असे त्यांनाही तेव्हा माहीत नव्हते.

**वयाच्या तेराव्या वर्षी 'कमावता माणूस'**

नानांच्या आयुष्यातला एक प्रसंग त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वात महत्त्वाचा आणि कलाटणी देणारा ठरला. ते नववीत असताना, म्हणजे साधारण तेराव्या वर्षी, त्यांच्या वडिलांचा व्यवसाय बंद झाला. कुटुंब अचानक आर्थिक संकटात सापडले. शाळा दुपारी आणि त्यानंतर काम, अशी त्यांची दिनचर्या सुरू झाली. सिनेमाची पोस्टर्स रंगवण्याचे काम ते करायचे. त्यासाठी त्यांना महिन्याला ३५ रुपये मिळत आणि दिवसातून एक वेळचे जेवणही मिळत असे. त्या वयात इतर मुले खेळत असताना नाना मात्र कुटुंबाच्या उदरनिर्वाहाला हातभार लावत होते. नंतर त्यांनी एका मुलाखतीत गरिबीबद्दल सांगताना, 'गरिबी केवळ पैशांची कमतरता नसते; गरिबी माणसाला सामाजिक दृष्ट्याही एकटे करते', असा अनुभव व्यक्त केला होता. कदाचित म्हणूनच

मेहुल कुमार यांच्या आठवणीनुसार, क्लायमॅक्सच्या आधी नानांना हृदयाशी संबंधित त्रास झाला होता आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांसोबत ते सेटवर आले. क्लायमॅक्स एका दिवसात शूट करण्यात आला.

नंतर नानांनीही सांगितले की, तो प्रसंग

भरलेले होते, एकेकाळी ते दिवसाला तब्बल ६० सिगारेट्स ओढत असत. वयाच्या ५६व्या वर्षी त्यांनी एका क्षणी त्या सोडून दिल्या. हा तपशील त्यांच्या 'खडूस' प्रतिमेपेक्षा 'वेगळा नाना' दाखवतो.

**दीड कोटींची गाडी न घेण्याचा निर्णय**

नानांचा आणखी एक कमी चर्चिला

# नाना पाटेकरः 'गरिबी' जगलेला, 'समृद्ध' अभिनेता!

नंतर त्यांच्या अभिनयात 'गरिब माणसाचा राग' रसिकांना खरा वाटला आणि भीडत राहिला. तो राग ते कुठल्या अभिनयशाळेत शिकले नव्हते, तर तो राग ते खऱ्याखुऱ्या आयुष्यात जगले होते.



**नानांच्या रागामागे एक वेगळी कहाणी**

नानांचा राग त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वाधिक चर्चिला गेलेला भाग. पण त्यांनी स्वतः एका मुलाखतीत सांगितले होते की हा राग हा अनेकदा त्यांच्या न्यूनगंडावरचे आवरण होता. यामुळे त्यांच्या अभिनयाकडे पाहण्याची दृष्टीच बदलते. ते पडद्यावर संतापायचे तेव्हा तो केवळ संवाद नसायचा. तर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारी अस्वस्थता, आवाजातील कडवटपणा, अचानक वाढणारी तीव्रता यामागे आयुष्यभर साठलेली असुरक्षितता होती. म्हणूनच नानांच्या संवादांपेक्षा त्यांच्या मौनाचा परिणाम अनेकदा जास्त झाला. त्या असुरक्षिततेबद्दल त्यांनी सविस्तर सांगितले होते.

**'क्रांतिवीर'चा क्लायमॅक्स लिहिलेला नव्हता!**

नानांच्या अभिनयाविषयीचा एक विलक्षण किस्सा 'क्रांतिवीर'च्या क्लायमॅक्सशी संबंधित आहे, चित्रपटाचा गाजलेला क्लायमॅक्स प्रत्यक्ष शूटिंगच्या आधी पूर्णपणे लिहिलेला नव्हता. दिग्दर्शक

लिहिलेला नव्हता; त्या क्षणी जे मनात आले ते ते बोलत गेले. इतकेच नव्हे, तर त्यांनी नंतर त्या संवादांची एकही ओळ आपल्याला आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले होते. म्हणूनच तो प्रसंग अभिनयापेक्षा जगलेला संताप वाटतो.

**मुलाच्या मृत्यूने बदललेले नाना**

नानांच्या आयुष्यातील सर्वात खोल जखम त्यांच्या पहिल्या मुलाच्या मृत्यूची. त्यांचा पहिला मुलगा जन्मतःच गंभीर समस्यांनी त्रस्त होता आणि अवघ्या दोन-सव्वादोन वर्षांच्या आसपास त्याचा मृत्यू झाला. या अनुभवाबद्दल बोलताना नानांनी स्वतःच्या वागण्याकडे अत्यंत कठोरपणे पाहिल्याचं सांगितलं होतं. सुरुवातीला 'लोक काय म्हणतील' याची काळजी आपल्याला मुलापासून भावनिकदृष्ट्या दूर ठेवत होती, अशी कबुली त्यांनी दिली होती. मुलावर प्रेम करायला सुरुवात केली, तोपर्यंत तो निघून गेला..असेही ते म्हणाले होते. कदाचित यानंतरच नानांच्या अभिनयात मृत्यूचा विषय वेगळ्या पद्धतीने दिसू लागला. पुरस्कार, चित्रपट चालला किंवा नाही, लोकांनी कौतुक केले किंवा नाही या साऱ्यापेक्षा आयुष्याच्या क्षणभंगुरतेची जाणीव त्यांना अधिक होती, असे ते म्हणाले होते.

**६० सिगारेट्सपासून अचानक मुक्ती**

नानांचे व्यक्तिमत्त्व विरोधाभासांनी

गेलेला पैलू म्हणजे शेतकरी कुटुंबांबद्दलची त्यांची बांधिलकी. अलीकडेच लेखक रणबीर पुष्प यांनी सांगितलेला एक किस्सा म्हणूनच महत्त्वाचा. नाना सुमारे दीड कोटी रुपयांची आलिशान गाडी घेण्याच्या विचारात होते. मात्र शेतकरी आत्महत्यांमुळे उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांची परिस्थिती पाहिल्यानंतर त्यांनी तो पैसा गाडीवर खर्च न करता गरजू कुटुंबांना मदत करण्याकडे वळवला. यात प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न नव्हता. उलट, नानांच्या स्वभावाप्रमाणेच त्यात काहीशी अस्वस्थ करणारी साधेपणाची वृत्ती होती. आपल्याकडे असलेला पैसा आपल्यासाठीच का आणि कशासाठी?, असा विचार त्यांनी बोलून दाखवला होता.

२०२६च्या मुंबई महापालिका निवडणुकीत मतदान करण्यासाठी नाना पुण्याहून मुंबईला आले. मतदानासाठी त्यांना तीन-चार तासांचा प्रवास करावा लागला.

तरी त्यांनी मतदान करणे हे नागरिकाचे कर्तव्य असल्याचे सांगत मतदान केले. कारण नाना केवळ अभिनेता नव्हते. ते प्रसिद्धीच्या चौकटीत मावणारे व्यक्तिमत्त्व नव्हते. त्यांना राग यायचा, ते चिडायचे, त्यांच्याकडून चुका झाल्या, त्यांनी स्वतःच्या चुका मान्य केल्या. त्यांनी गरिबी पाहिली, अपमान सहन केला, मुलाला गमावले, स्वतःच्या कमतरतांशी झगडलेष्ठ आणि इतके सारे घडूनही अभिनयाचे क्षेत्र समृद्ध केले.

**विनायक परब**

# नाना पाटेकर यांना मिळालेले पुरस्कार

**नागरी पुरस्कार**

**पद्मश्री (२०१३):** चित्रपट आणि कला क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल भारत सरकारकडून देशातील चौथ्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरव करण्यात आला.

**राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार**

नाना पाटेकर यांना एकूण ३ राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाले आहेत:

**१९९०:** 'परिंदा' चित्रपटासाठी सर्वश्रेष्ठ सहाय्यक अभिनेता .

१९९५: 'क्रांतीवीर' चित्रपटासाठी सर्वश्रेष्ठ अभिनेता .

१९९७: 'अग्निसाक्षी' चित्रपटासाठी सर्वश्रेष्ठ सहाय्यक अभिनेता

**फिल्मफेयर पुरस्कार**

फिल्मफेयरच्या इतिहासात मुख्य अभिनेता, सहाय्यक अभिनेता आणि खलनायक अशा तिन्ही महत्त्वाच्या श्रेणींमध्ये पुरस्कार जिंकणारे नाना पाटेकर हे बॉलिवूडमधील मोजकेच कलाकार आहेत. त्यांनी एकूण ४ फिल्मफेयर पुरस्कार जिंकले आहेत:

**१९९०:** 'परिंदा' (सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता).

**१९९३:** 'अंगार' (सर्वोत्कृष्ट खलनायक).

**१९९५:** 'क्रांतीवीर' (सर्वोत्कृष्ट अभिनेता).

**२००६:** 'अपहरण' (सर्वोत्कृष्ट खलनायक)

**फिल्मफेयर पुरस्कार मराठी**

**२०१७:** 'नटसम्राट' चित्रपटातील गणपतराव बेलवलकर यांच्या भूमिकेसाठी सर्वश्रेष्ठ अभिनेता पुरस्कार

**इतर प्रमुख पुरस्कार आणि सन्मान**

**महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कारः** मराठी चित्रपटसृष्टीतील उत्कृष्ट कामगिरीसाठी गौरव.

राज कपूर विशेष योगदान पुरस्कारः महाराष्ट्र शासनातर्फे सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मानित.

**आनंद विकटन सिनेमा अवॉर्ड (२०१९):** 'काला' (तमिळ चित्रपट) मधील उत्कृष्ट खलनायकी भूमिकेसाठी.

**गदिमा पुरस्कार (२०२१):** गदिमा प्रतिष्ठानतर्फे मनोरंजन आणि सामाजिक कार्यातील बहुमोल योगदानाबद्दल प्रदान.

**दीनानाथ मंगेशकर पुरस्कार (२०२१):** उत्कृष्ट अभिनय आणि कला क्षेत्रातील सेवेसाठी सन्मानित.

**मानद लेफ्टनंट कर्नल (२०१३):** कारगिल युद्धादरम्यान प्रादेशिक सेनेत दिलेल्या लष्करी सेवेसाठी आणि देशसेवेसाठी मिळालेला बहुमान.

# विदर्भाची 'ती' खास आठवण

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या आकस्मिक निधनाने सर्वांनाच धक्का बसला आहे. त्याचबरोबर चित्रपटसृष्टीही शोकाकूल झाली आहे. सहनायक, नायक, खलनायक, चरित्रनायक अशा किती तरी अभिनयाच्या पैलूतून नाना हे भारतीय चित्रपटसृष्टीत एक सशक्त अभिनेते म्हणून नाव मिळवले. पण नानांना नायक म्हणून पहिली संधी आणि ओळख विदर्भाने दिली होती हे वाचून ऐकून कुणालाही आश्चर्य वाटेल, पण हे सत्य आहे.

अकोल्याच्या श्री शिवाजी महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य डॅडी देशमुख यांनी १९८२मध्ये 'राघूमैना'या रंगीत मराठी चित्रपटाची निर्मिती केली. त्यात नायक म्हणून नाना पाटेकर तर नायिका मधू कांबीकर अशी जोडी होती. अशोक सराफ, निळू फुले हे दिग्गज कलाकार ही त्यात होते.नायक म्हणून नवख्या नाना पाटेकर यांना संधी देण्याचे धाडसच निर्माते डॅडी देशमुख यांनी केले होते.

नानांचा मुख्य भूमिकेतील हा पहिलाच चित्रपट होता. त्याआधी 'गमन'(हिंदी१९७८)व सिंहासन (१९७९)भालू (१९८०)या चित्रपटात पाहुणे कलाकार म्हणून नाना होते. त्या तीनही चित्रपटांच्या श्रेयनामावलीत शेवटी बारीक अक्षरात नाना पाटेकर नाव दिसायचे. डॅडी देशमुख यांनी १९७७मध्ये संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर 'देवकी नंदन गोपाला' या कृष्णधवल व यशस्वी चित्रपटाची निर्मिती केलेली होती. त्याचे दिग्दर्शक राजदत्त होते.'राघूमैना' चित्रपटासाठी नायक म्हणून राजदत्त यांनी डॅडी देशमुखांना नाना पाटेकर यांचे नाव सुचवले.

विठ्ठल वाघ, श्रीकृष्ण राऊत व डॅडी देशमुख यांनी 'राघूमैना'ची गाणी लिहिली. तर पटकथा वसंत सबनीस यांनी. लोककलावंताच्या प्रेमकथेची शोकांतिका अशी थीम असलेल्या त्या चित्रपटात अभिनेत्री मधू कांबीकर (मैना)च्या सोबतीने नाना(राघू)ची ट्यूनिंग जमली. नायक म्हणून प्रथमच संधी मिळाल्याने नानाने अभिनयात जीव ओतला. एका फिरत्या



तमाशा फडात ढोलकी वाजवणारा राघू व त्यातीलच नृत्य कलावंतीण मैना या दोघांत प्रेम होते.

फडाला पैसा पुरवणारा सावकार (निळू फुले)याचा देखण्या 'मैना'वर डोळा असतो. राघू व मैनात प्रेम फुलल्याचे पाहून सावकार हा राघूला कर्जाच्या जाळ्यात अडकवतो.




सावकाराच्या जाचाला कंटाळून राघू व मैना फड सोडून निघून जातात. स्वतःचा संसार थाटण्याचा प्रयत्न करतात. पण समाज त्यांना स्वीकारत नाही. तमाशातील बाई म्हणून गावकऱ्याकडून मैनेची अवहेलना होते. शेवटी राघूला संघर्ष करावा लागतो. प्रेम, वंचना, समाजाची बंधने यामुळे कथा शोकांतिकडे झुकते. ढोलकी वाजवणारा राघू शेवटी बंदूक हातात घेतो. त्याकाळातील ग्रामीण महाराष्ट्रातील लोककलावंताच्या जीवनाचे वास्तव चित्रण 'राघूमैना'तून मांडले गेले.

अकोला, चिखलदरा, पातूर, लोणार या ठिकाणच्या चित्रीकरणातून अस्सल ग्रामीण बाज चितारला गेला होता. विदर्भाच्या मातीत तयार झालेल्या 'राघूमैना'ला दादासाहेब फाळके उत्कृष्ट चित्रपट पुरस्कार (१९८३-८४),तर नाना पाटेकर यांना उत्कृष्ट अभिनेता शिवाजी गणेशन पुरस्कार मिळाला. उत्कृष्ट दिग्दर्शक-राजदत्त, उत्कृष्ट पटकथा-वसंत सबनीस, उत्कृष्ट कलादिग्दर्शन-किशोर मोरे अशा प्रतिष्ठित पुरस्कारांवर मोहर उठवून ''राघू-मैना' हा अस्सल ग्रामीण प्रेमकथेवरील चित्रपट ८०च्या दशकात तरुणाईने डोक्यावर घेतला होता. नाना पाटेकर यांना नायक म्हणून पहिली ओळख 'राघूमैना'या मराठी चित्रपटाने दिली होती.

नानाच्या चित्रपट कारकिर्दीसाठी हा चित्रपट मैलाचा दगड ठरला होता. आपल्या सकस अभिनयाने नाना पाटेकर यांनी क्रांतिवीर, प्रहार, तिरंगा, अंकूश, यशवंत, नटसम्राट अशा कित्येक चित्रपटांतून यशोशिखर गाठले. नानांनी आज अकस्मात घेतलेली एक्झिट सर्वांनाच चटका लावून गेली आहे. विदर्भाच्या मातीनेही 'राघूमैना' चित्रपटाद्वारे हा हिरा सर्वप्रथम हेरला होता. हे सांगणे विदर्भासाठी अभिमानास्पद आहे.



# 'नटसम्राट', 'क्रांतिवीर' ते 'परिंदा'!

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी वयाच्या ७५ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने संपूर्ण मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली आहे.



मराठीसह बॉलीवूडमधील दिग्गज कलाकारांनी नाना पाटेकरांच्या आठवणीत भावुक पोस्ट शेअर केल्या आहेत. १९७८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'गमन' सिनेमातून नाना पाटेकर यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. चित्रपटसृष्टीत एन्ट्री घेतल्यावर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. त्यांचे एका पाठोपाठ एक सगळेच सिनेमे सुपरहिट ठरले. 'क्रांतिवीर', 'परिंदा', 'तिरंगा' यांसारख्या चित्रपटांनी तर बॉक्स ऑफिसवर इतिहास रचला होता. हे सिनेमे प्रेक्षकांना आता कुठे पाहता येतील जाणून घेऊयात.

**क्रांतिवीर-** क्रांतिवीर चित्रपट १९९४ मध्ये प्रदर्शित झाला होता. या सिनेमात नानांनी 'प्रताप नारायण तिलक' ही भूमिका साकारली होती. हा चित्रपट प्रताप नावाच्या एका तरुणाभोवती फिरतो, जो समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि राजकीय नेत्यांविरुद्ध आवाज उठवतो. या चित्रपटातील नानांचा 'ये मुसलमान का खून, ये हिंदू का खूनष्ठ बता इसमें मुसलमान का कौन सा, हिंदू का कौन साष्ठ' हा डायलॉग सर्वत्र तुफान गाजला होता. आता 'क्रांतिवीर' सिनेमा प्रेक्षकांना अमेझॉन प्राइमवर पाहता येईल. या चित्रपटाचा रनटाइम २ तास २७ मिनिट आहे.

**डॉ. प्रकाश बाबा आमटे – द रिअल हिरो**

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे आणि त्यांच्या पत्नी डॉ. मंदाकिनी आमटे यांनी गडचिरोली (हेमलकसा) येथील गोंड आदिवासींच्या कल्याणासाठी व आरोग्यासाठी केलेल्या कार्यावर हा बायोपिक आधारित आहे. यामध्ये सोनाली कुलकर्णी आणि नाना पाटेकर यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. अमेझॉन प्राइम आणि Zee5 वर हा बायोपिक पाहता येईल.




**परिंदा-** 'परिंदा' हा चित्रपट १९८९ मध्ये प्रदर्शित झाला होता. यामध्ये नानांनी अण्णांची भूमिका साकारली होती. हा चित्रपट प्रेक्षक नेटफ्लिक्स तसेच अमेझॉन



प्राइमवर पाहू शकतात.

**अग्निसाक्षी-** १९९६ मध्ये प्रदर्शित झालेल्या अग्निसाक्षी सिनेमा नाना पाटेकरांनी विश्वनाथ ही भूमिका साकारली होती. हा चित्रपट प्रेक्षकांना अमेझॉन प्राइम आणि जिओ हॉटस्टारवर पाहता येईल.

नटसम्राट-१ जानेवारी २०१६ रोजी 'नटसम्राट' सिनेमा प्रदर्शित झाला आणि या चित्रपटाने मराठी कलाविश्वाला सुद्धा एक नवीन दिशा मिळाली. नटसम्राटला बॉक्स ऑफिसवर प्रचंड यश मिळालं. नानांच्या अभिनयाचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आलं. हा ब्लॉकबस्टर सिनेमा प्रेक्षक अमेझॉन प्राइम, नेटफ्लिक्स तसेचैंा५ वर सुद्धा पाहू शकतात.

**तिरंगा-** १९९३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'तिरंगा' सिनेमात सुद्धा अनेक दमदार कलाकारांची मांदियाळी होती. यामध्ये नानांनी पोलिस इन्स्पेक्टर शिवाजीराव वाघलेंची भूमिका साकारली होती. हा चित्रपट प्रेक्षकैंा५, अमेझॉन प्राइम आणि जिओहॉटस्टारवर पाहू शकतात.

**प्रहार-** १९९१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'प्रहार' सिनेमातही नाना महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकले होते. विशेष म्हणजे या सिनेमाचं दिग्दर्शन सुद्धा त्यांनी स्वतः केलं होतं. हा चित्रपट अमेझॉन प्राइमवर उपलब्ध आहे.

**पक पक पकाक-** 'पक पक पकाक' या २००५ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटाने मराठी सिनेमाला एक नवीन दिशा दिली. नाना पाटेकरांनी साकारलेला 'भूत्या' घराघरांत पोहोचला. विशेष म्हणजे यातील गाणीही सर्वत्र लोकप्रिय आहेत.



# देशी कट्टा कमरेला लावून न्यायालयासमोर फिरणारा जेरबंद!

## दोन जिवंत काडतुसे, मॅग्झीन, दुचाकीसह १.५७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

■ प्रतिनिधी | अकोला ■

गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने कमरेला देशी कट्टा लावून शहरात फिरणाऱ्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेने शिताफीने जेरबंद केले. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या वाहनतळासमोरील लोखंडी गेटजवळ सापळा रचून केलेल्या या कारवाईत आरोपीकडून देशी बनावटीचा कट्टा, दोन जिवंत काडतुसे, दोन मॅग्झीन, सुझुकी जिक्सर मोटारसायकल व मोबाईल असा तब्बल १ लाख ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



एलसीबीची कारवाई

संतोष नरसिंग ठाकूर (२९), रा. म्हातोडी रोड, घुसर, ता. जि. अकोला, ह.मु. १८ क्रमांक शाळेसमोरील गल्ली, रामदासपेठ मठ, अकोला, असे जेरबंद करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. ७ ऑक्टोबर रोजी एलसीबीचे पथक अकोला शहरात पेट्रोलिंग करीत असताना, निळ्या रंगाच्या सुझुकी जिक्सरवरून एक इसम कमरेला देशी कट्टा लावून फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने तो फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी वेळ न दवडता जिल्हा व सत्र न्यायालयाच्या वाहनतळासमोर सापळा रचला.

काही वेळातच संशयित इसम मोटारसायकलवरून तेथे आला. पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेत पंचांसमक्ष अंगझडती घेतली. यावेळी त्याच्याकडे देशी बनावटीचा कट्टा दोन मॅग्झीनसह आणि दोन जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी एमएच ३० बीजे ८३६८ क्रमांकाची सुझुकी जिक्सर मोटारसायकल आणि मोबाईल फोनही ताब्यात घेतला. या कारवाईत देशी कट्टा व दोन मॅग्झीन, दोन जिवंत काडतुसे, मोटारसायकल आणि मोबाईल असा एकूण १ लाख ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध रामदासपेठ पोलीस ठाण्यात कलम ३ व २५ आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक बी. रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत अधिकारी निलेश देशमुख, गोपाल जाधव, विष्णु बोडखे, माजीद पठाण, अनिल चव्हाण तसेच पोलीस अंमलदार शेख हसन, उमेश पराये, सुलतान पठाण, भारकर धोत्रे, अमित दुबे, अब्दुल माजिद, रविंद्र खंडारे, महेंद्र मलिये, किशोर सोनवणे, खुशाल नेमाडे, मंगेश इंगळे, वसीमोद्दीन, एजाज अहमद, राहुल गायकवाड, स्वप्नील खेडकर, श्रीकांत पातोंड, अन्सार अहमद, राज चंदेल, आकाश मानकर, धिरज वानखडे, पवन डांबलकर, अभिषेक पाठक, मोहम्मद आमीर, सतीश पवार, अशोक सोनवणे, भीमराव दिपके तसेच चालक विनोद ठाकरे, प्रविण कश्यप, रामकिसन डोईफोडे, मनिष ठाकरे, देवानंद खरात आणि प्रकाश लोखंडे यांनी सहभाग घेतला.

# घरगुती गॅसचा ऑटोमध्ये अवैध भरणा

## ५८ सिलेंडरसह लाखोंचा मुद्देमाल जप्त

### एसडीपीओ पाटील यांच्या पथकाची कारवाई; तिघे ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोला ■

घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरमधून ऑटोमध्ये बेकायदेशीररीत्या गॅस भरण्याचा प्रकार सुरू असल्याची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाने दुबे वाडी परिसरातील एका ठिकाणी छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल ५८ गॅस सिलेंडर, तीन वाहने, गॅस रिफिलिंगचे साहित्य आणि रोख रकमेसह एकूण ९ लाख ४२ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी तिघांना ताब्यात घेतले आहे.



घरगुती सिलेंडरमधील गॅस ऑटोमध्ये भरून देण्याचे प्रकार शहरात सुरू असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या. अशा अवैध रिफिलिंग रॅकेटवर कारवाई करून त्याचे उच्चाटन करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिल्या होत्या. त्यानुसार गुरुवारी (८ ऑक्टोबर) उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने मिळालेल्या विश्वसनीय माहितीच्या आधारे सिव्हिल लाइन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दुबे वाडी येथे छापा टाकला.

कारवाईदरम्यान मनोज रमेश दीक्षित (३६, रा. रेल्वे स्टेशनजवळ, अकोला) हा पंप मशिनच्या साहाय्याने घरगुती गॅस सिलेंडरमधील गॅस ऑटोमध्ये भरताना आढळून आला. त्याचवेळी बिस्मिल्ला खान रहेमान खान (२९) आणि मोहम्मद आसिफ शेख जुम्मा (२७) हे त्यांच्या ऑटोमध्ये घरगुती गॅस अवैधरित्या भरून घेताना पोलिसांच्या हाती लागले.

छाप्यात महिंद्रा मालवाहू वाहन क्रमांक एमएच ३० बीडी ०८४४, ऑटो क्रमांक एमएच ३० बीजी ०३७८ आणि एमएच ३० बीसी २४४० अशी तीन वाहने जप्त करण्यात आली. या वाहनांची अंदाजे किंमत ८ लाख रुपये असून, त्यासोबत ५८ गॅस सिलेंडर, रिफिलिंगचे साहित्य आणि १ लाख ४२ हजार ३५० रुपये रोख असा एकूण ९ लाख ४२ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

या प्रकरणातील तिन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियमातील कलम ३, ७ तसेच बीएनएस कलम २८८ अन्वये सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत स.पो.नि. किशोर पवार, पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप पळसपगार तसेच पोलीस अंमलदार रविंद्र घिवे, विनय जाधव, मोहम्मद नदिम, प्रफुल्ल बांगर आणि गोपाल बायस्कर यांनी सहभाग घेतला.

# प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर दिव्यांगाचे आमरण उपोषण मागे

## प्रहार जिल्हाप्रमुख जीवन खवले यांच्या मध्यस्थीने आंदोलनाची सांगता

**सात दिवसांत मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन**



■ प्रतिनिधी | अकोट ■

वडिलोपार्जित घराकडे जाणारा वहिवाटीचा रस्ता अडविल्याच्या निषेधार्थ तसेच रस्ता तातडीने खुला करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले आमरण उपोषण प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. सात दिवसांत मागण्यांची पूर्तता करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्यानंतर उपोषणकर्त्यांनी लिंबू पाणी घेऊन आंदोलनाची सांगता केली.

तालुक्यातील पारोळा येथील रहिवासी अतुल नागे व दिव्यांग असलेले जीवन नागे यांच्या घराकडे जाणाऱ्या वहिवाटीच्या रस्त्यावर अडथळा निर्माण करण्यात आल्याचा आरोप आहे. याबाबत प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने संबंधितांनी ३ ऑक्टोबरपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते.

दिव्यांग व्यक्तीच्या या आंदोलनाची प्रशासनाने दखल घेत अकोट पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून विस्तार अधिकारी मदनसिंग बहूरे, ग्रामसेवक तसेच प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख जीवन खवले यांनी उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी उपोषणकर्त्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

प्रशासनाच्या वतीने उपोषणकर्त्यांच्या चारही प्रमुख मागण्या आगामी सात दिवसांत निकाली काढण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यामुळे उपोषणकर्त्यांनी आंदोलन मागे घेतले. मात्र, दिलेल्या मुदतीत रस्ता मोकळा न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला. यावेळी सरपंच निखिल गजानन कडू, उपसरपंच दादाराव गवई, शंकर पवार, सुमेध बागलकर, निलेश नागे, विनोद कडू, मनीष ब्राह्मणकर, अजय गवई, संतोष डांगे यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निरंतर वैद्यकीय शिक्षण उपक्रम संपन्न

**अकोला :** स्थानीय जनरल प्रॅक्टिशनर अर्थात जीपीए असो.च्या वतीने जीपीए सदस्यांसाठी निरंतर वैद्यकीय शिक्षण अर्थात सीएमई उपक्रम साकार करण्यात आला. सेन्ट्रल प्लाझा सभागृहात संपन्न या सीएमई मध्ये व्याख्याते म्हणून डॉ उदित लड्ढा व डॉ. निशा लड्ढा उपस्थित होते.

# ‘मधु संध्या’त भक्तिगीतांचा सुरेल जागर

**रोटरी अकोट व्हिजन व आयएफआरएम विदर्भ व्हिजनचा उपक्रम**



■ प्रतिनिधी | अकोट ■

स्वर्गीय मधुकरराव बळीरामजी भुस्कट यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रोटरी क्लब अकोट व्हिजन व आयएफआरएम विदर्भ व्हिजनतर्फे ‘मधु संध्या–भक्ती गीतांचा सुरेला संगम’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विविध भक्तिगीतांच्या सुरेल सादरीकरणाने संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले.

श्री. वैष्णव महाराज बोरोडे यांच्यासह संदेश रोडे, दीपली कडू, आनंद भोरे, मोहनराव सपकाळ, अजित सपकाळ, अरुण सांगळोदकर, संदीप डोके आदींनी भक्तिगीते सादर केली. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. हरीश ढवळे यांनी भक्तिगीतांचा भावार्थ उलगडून सांगत कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले. गौरव रत्न यांनी की-बोर्ड, अश्विन बोरोडे यांनी पॅड, तर दुर्गेश बाळे यांनी तबल्याची साथसंगत केली. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष संदीप भुस्कट, सचिव अभिजीत अग्रवाल, संस्थापक अध्यक्ष आनंद भोरे, आयएफआरएमचे चेअरमन किरण गुहे, सचिव प्रवीण बनसोड, नंदकिशोर शेगोकार, बाबुराव झांबरे, चेतन उपासे, संजय बोरोडे, अनंत काळे, अतुल मालानी यांच्यासह पदाधिकारी, सदस्य व नागरिक उपस्थित होते.

## भागवत कथेची आज पूर्णाहुती

**अकोला :** पितृसेवा भागवत कथा आयोजन समिति तथा पूज्य सद्गुरू सुधांशुजी महाराज प्रणित विश्व जागृति मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने पितृपक्षाच्या पावन पर्वानिमित्त स्थानिक गोरक्षण रोडवरील जानोरकर मंगल कार्यालयात सुरू असलेल्या पु. आचार्य शिवदत्तजी महाराज यांच्या संगीतमय श्रीमद् भागवत कथेत गुरुवारी रुक्मिणी विवाह व सुदामा मिलन कथा सांगण्यात आली. या कथेत सुंदर झाकी साकार करण्यात आली. या कथेच्या अनुषगाने या उत्सवाची सांगता करण्यात आली. आज शुक्रवार दि ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता होम हवन होऊन सकाळी ११ वाजता डॉ प्रशांत ठाकरे यांच्या काल्याच्या किर्तनाने या भागवत कथेची सांगता होणार आहे.

## आज भव्य आरोग्य तपासणी शिबिर

**अकोला :** श्री अग्रसेन यांच्या जयंती उत्सवात सांस्कृतिक उपक्रमास प्रतिसाद मिळत आहे. अग्रवाल समितीचे अध्यक्ष महेंद्र खेतान यांच्या अध्यक्षतेत आयोजित या उपक्रमात महिला, युवक व समितीचे कार्यक्रम होत आहेत. या सप्ताह उपक्रमात अग्रसेन भवन येथे आज शुक्रवार दि ९ ऑक्टोबर रोजी भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात फिजिशियन डॉ. अशोक अग्रवाल, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. आरती अग्रवाल, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. पूजा खेतान, वातरोग तज्ज्ञ डॉ. नीती केडिया, दंतरोग तज्ज्ञ डॉ. अंशुल गुप्ता, छाती व श्वसनरोग तज्ज्ञ डॉ. यश केडिया, डॉ. शुभम अग्रवाल, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. ईशांक गुप्ता आणि अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अचिन मुरारका यांच्यासह तज्ज्ञ रुग्णांची तपासणी करणार आहेत.

## जाहीर नोटीस

दिनांक :- ०९/१०/२०२६

**माझे नाव :- अग्रवाल वेदीका मनिष,** वय -१९ वर्षे रा. ३०१, रॉयल इस्टेट अपार्टमेंट, जठारपेठ, राऊतवाडी अकोला, महाराष्ट्र - ४४४००५

मी माझ्या शपथपत्राद्वारे (Affidavite) असे जाहीर करते की, मी माझे जुने नाव बदलून **नवीन नाव - वेदीका मनिष अग्रवाल,** असे ठेवले आहे. भविष्यात मला याच नवीन नावाने ओळखले जावे. याविषयीचे नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र दिनांक २७/०९/२०२६ रोजी अकोला महाराष्ट्र येथे तयार केले आहे.

प्रतिज्ञापत्र नं. १७५/२६. **जुने नाव - अग्रवाल वेदीका मनिष, नविन नाव - वेदीका मनिष अग्रवाल,** वडिलांचे नाव - मनिष ओमप्रकाश अग्रवाल, पत्ता - ३०१ रॉयल इस्टेट अपार्टमेंट जठारपेठ, राऊतवाडी अकोला, महाराष्ट्र -४४४००५

**Change In Name**

I Have Change My Name In My Wife Passport Passport No. M3530281 From **GURBAKSH KARAMCHAND MENGHANI** --TO-- **GURUBAKSH KARAMCHAND MENGHANI** My Residential Address is - Gurunanak Nagar Murtizapur Akola Maharashtra - 444107

**Change In Name**

I Have Change My Name In My Passport Passport No. M3530281 From -- **KANCHAN GURBAKSH MENGHANI** --TO-- **KANCHAN GURUBAKSH MENGHANI** My Residential Address is - Gurunanak Nagar Murtizapur Akola Maharashtra - 444107

**Change In Name**

I Have change My Name from **MANGLABAI VASANTRAO DESHMUKH** -TO- **MANGALA SANTOSHRAO DESHMUKH** My Residential Address In At Charangao Tq Patur Dist Akola -444511

## जाहीर नोटीस

**वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६६०/२०२६ — प्रोसेस नं. १२५६७/२०२६
चौ.ता. १९/११/२०२६ — दिनांक : ०३/१०/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. रागीणी चंद्रकांत पिंपळे रा. क्रांती चौक, गजानन विहार जवळ, नितीन प्लाझा जवळ, न्यु तापडिया नगर, अकोला. ता. जि. अकोला. सध्या रा. फ्लॅट नं. ०७, पंचम अपार्टमेंट, आंबेडकर चौक, राठी संसार जवळ, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद. (संभाजीनगर) २. सौ. यशश्री मुकेश तांदळे रा. एन ९, एच–३६–३, श्रीक्रिष्णा नगर, टी. व्ही. सेंटर हुडको जवळ, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद. (संभाजीनगर)

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : चंद्रकांत हरीदास पिंपळे
**पत्ता :-** रा. क्रांती चौक, गजानन विहार जवळ, नितीन प्लाझा जवळ, न्यु तापडिया नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चंद्रकांत हरीदास पिंपळे यांचे दि. २६/०५/२०२४ रोजी संभाजी नगर ता. जि. संभाजीनगर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ११४/२०२५ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, आंबेडकर नगर, जऊळका, ता. अकोट, जि. अकोला.

**अर्जदार :-** श्री. सतीश ईश्वरदास घनबहादूर रा. जऊळका. पो. वरुड ता. अकोट जि. अकोला.

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुदयावर चौकशी करणार आहेत. वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ? खाली निर्दिष्ट केलेला मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन) :-** रोख रक्कम रु. ५००/-
अध्यक्ष / सचिव यांच्या जवळ जमा आहे.
लाउट स्पिकर, कॅवीनेट बॉक्स, १००० लिटर क्षमतेच्या दोन सिंटेक्स पाणी टाकी वरील साहित्याची अंदाजे किंमत रु. १६०००/- (सोळा हजार रुपये फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन) :-** मौजे जऊळका, ता. अकोट, जि. अकोला येथील मालमत्ता क्र. ३१४ क्षेत्रफळ - २००० चौ. फुट या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, पु. प. - २९, उ.द. - ८०. अंदाजे किंमत ६,५५,९४६/-
चतु; सिमा :- पूर्वेस - बोळ / थांडे, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - शेती, उत्तरेस - रस्ता.
ग्रामपंचायत ठराव, व नमुना ८ अ सोबत जोडला आहे.

सदरच्या चौकशी प्रकारणा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत हि नोटिस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून (३०) तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला -१ यांच्या शिक्कयानिशी आज दिनांक ८ / १० / २०२६ रोजी दिली.

शिक्का — **अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६७२/२०२६ — प्रोसेस नं. १२६९०/२०२६
चौ.ता. २५/११/२०२६ — दिनांक : ०६/१०/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. मीरा कैलाशनारायण गुप्ता २. सौरभ कैलाशनारायण गुप्ता ३. सुमीत कैलाशनारायण गुप्ता सर्व रा. माधव नगर, प्लॉट नं. ३२, स्टार वूड अपार्टमेंट समोर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कैलाशनारायण रामनाथ गुप्ता
**पत्ता :-** रा. माधव नगर, प्लॉट नं. ३२, स्टार वूड अपार्टमेंट समोर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कैलाशनारायण रामनाथ गुप्ता यांचे दि. १५/१२/२०२२ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर सूचना

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, आमचे पहिले पक्षकार नामे प्रकाश खंडुजी राऊत यांनी खालील वर्णनाची व चर्तुसिमेतील मालमत्ता विनोद आत्माराम पचगडे, रा. अकोला, ता. जि. अकोला यांच्याकडून विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे. **मालमत्तेचे वर्णन -** मौजे शिवणी, प्र.ता.जि. अकोला येथील ग्रामविकास अधिकारी साहेब व मा. सरपंच ग्रा.पं. शिवणी यांनी दिलेला वार्ड क्र. ६ मधील राम नगर, अ.नं. ४१ ज्याचा ग्रा.पं. मालमत्ता क. ४०७८ असून त्यामधील प्लॉट क्र. ४१ त्याचे मोजमाप पूर्व पश्चिम बाजू ३०.०० फुट, उत्तर दक्षिण बाजू ४०.०० फूट यांचे एकुण क्षेत्रफळ १२००.०० मी. फूट असून त्याच्या चतुसिमा पुर्वेस :- प्लॉट नं. ४२ ची खुली जागा, पश्चिमेस :- प्लॉट नं. ४० फुटाचा रोड, उत्तरेस :- २० फूटाचा रोड, दक्षिणेस :- प्लॉट क्र. ३१ मी खुली जागा

व आमचे दुसरे पक्षकार ज्योती आतिष उमाळे यांनी खालील वर्णनाची व चर्तुसिमेतील मालमत्ता विनोद आत्माराम पचगडे, रा. अकोला, ता.जि. अकोला यांच्याकडून विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :-** मौजे शिवणी, प्र.ता.जि. अकोला येथील ग्रामविकास अधिकारी साहेब व मा. सरपंच ग्रा.पं. शिवणी यांनी दिलेला वार्ड क्र. ६ मधील राम नगर, मधील अ.नं. ४२ ज्याचा ग्रा.पं. मालमत्ता क्र. ४०७९ असून त्यामधील प्लॉट क्र. ४२ त्याचे मोजमाप पूर्व पश्चिम बाजू :- २५.०० फुट, उत्तर दक्षिण बाजू :- ४००० फूट यांचे एकुण क्षेत्रफळ १०००.०० चौ. फूट त्याच्या चर्तुसिमा :- पुर्वेस :- प्लॉट नं. ४३ ची खुली जागा, पश्चिमेस : प्लॉट नं. ४१ ची खुली जागा, उत्तरेस :- २० फूटाचा रोड, दक्षिणेस :- अ.नं. ३२ ची जागा.

वरील वर्णनाच्या व चतुसिमेतील मालमत्तेसंबंधी वि न्यायालयामध्ये वाद असल्यास तसेच कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा व व्यक्तीचा कुठल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व संबंध असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी कागदपत्रासह संपर्क करावा. विहित मुदतीत कोणत्याही व्यक्तीचा कुठल्याही प्रकारची लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेवर कोणत्याही कर्ज, गहाण, बोजा व व्यक्तीचा कुठल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व संबंध नाही असे गृहित धरून माझे पक्षकार सदर मालमत्तेची खरेदी नोंदवून घेतील. त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

अकोला
दिनांक :- ०८/१० / २०२६

**ॲड. अनिकेत जी. डाबेराव**
अकोला बार असोसिशन, अकोला. ता. जि. अकोला. मो.क्र. ९५४५४५३५९७

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५५७/२०२६ — प्रोसेस नं. ११९८७/२०२६
चौ.ता. ०७/११/२०२६ — दिनांक : २१/०९/२०२६

**अर्जदार :** महादेवराव हरिभाऊ लोड रा. गुजराती पुरा, उगवा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : हरिभाऊ नारायण लोड
**पत्ता :-** रा. उगवा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत हरिभाऊ नारायण लोड यांचे दि. ०८/०४/१९७५ रोजी राहते घरी उगवा ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर सुचना

दि. ७.९.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार, हे विजय काशीनाथ वाखारकर यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे शिवापूर, ता. जि अकोला येथील शेत सर्व्हे क्र १०४, गट क्र ३००, पैकी मंजूर लेआऊट मधील, खुला लेआऊट प्लॉट क्र १४, (७/१२ नोंदीनुसार ३००/१/अ/१४) चा खुला प्लॉट ज्याचे एकूण क्षेत्रफळ १७६ चौ मी. (१८९४.४६ चौ.फुट) ज्यास चतु:सिमा पूर्वेस :- लेआऊट प्लॉट क्र १३, पश्चिमेस:- लेआऊट प्लॉट क्र १५, उत्तरेस:- लेआऊट प्लॉट क्र ८, दक्षिणेस ९ मीटर रुंद लेआऊट रोड, अशी मालमत्ता विकत घेत आहेत, व तसा करार झालेला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि याचि कृपया नोंद घ्यावि.

**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर, स्टेशन रोड, अकोला मोबाईल क्र ९८२३०९१३७७

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६३६/२०२६ — प्रोसेस नं. १२६७१/२०२६
चौ.ता. २०/११/२०२६ — दिनांक : ०५/१०/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. सुनंदा अशोक झांबरे २. सचिन अशोक झांबरे दोघेही रा. अन्वी मिर्झापूर, ता. जि. अकोला. ३. धिरज अशोक झांबरे रा. घर नं. के९२ / २, एन९, हुडको, टी. व्ही. सेंटर, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद. (संभाजीनगर) ४. सौ. सीमा तुषार पाटील रा. टेक्निकल हायस्कुल मागे, सह्याद्री अपार्टमेंट, भोले कॉलनी, भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगाव खांदेश.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोक शंकरराव झांबरे
**पत्ता :-** रा. अन्वी मिर्झापूर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक शंकरराव झांबरे यांचे दि. २५/०५/२०२६ रोजी राहते घरी अन्वी मिर्झापूर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २० / ११ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २९७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## ड्रममधील पाण्यात तणनाशक मिसळल्याचा संशय

# गरीब शेतकऱ्याचे दोन लाखांचे पीक डोळ्यादेखत वाळले

### दुष्काळात तेरावा महिना; बोरगाव टूमणीतील धक्कादायक प्रकार

**साहूर/जनमाध्यम**

दुष्काळाने आधीच शेतकऱ्याची कंबर मोडली असताना आता अज्ञात व्यक्तीच्या कथित कृत्यामुळे एका अल्पभूधारक शेतकऱ्याचे उभे पीक उद्ध्वस्त झाल्याचा धक्कादायक प्रकार बोरगाव टूमणी येथे समोर आला आहे. संजय सांभारे यांच्या शेतातील ड्रममध्ये फवारणीसाठी साठवलेल्या पाण्यात अज्ञात व्यक्तीने तणनाशक औषध मिसळल्याचा संशय असून त्यानंतर फवारणी केलेले एक एकरातील मिरचीचे संपूर्ण पीक अवघ्या दोन दिवसांत पिवळे पडून वाळले. या प्रकारामुळे शेतकऱ्याचे सुमारे दोन लाख रुपयांचे अपेक्षित उत्पन्न धोक्यात आले आहे.





संजय सांभारे यांनी आपल्या एक एकर शेतात मिरचीची लागवड केली होती. पीक चांगले जोमात असल्याने दुसऱ्या दिवशी फवारणी करण्यासाठी त्यांनी शेतातील ड्रममध्ये पाणी भरून ठेवले होते. मात्र दुसऱ्या दिवशी कीटकनाशक मिसळून फवारणी केल्यानंतर मिरचीची झाडे अचानक वाळू लागली. काही दिवसांत पीक पूर्णपणे पिवळे पडल्याने शेतकऱ्याला धक्काच बसला. फवारणीच्या पाण्यात आधीच तणनाशक मिसळले असावे, असा संशय सांभारे यांनी व्यक्त केला आहे. एक एकरातून १८ ते २० क्विंटल मिरची उत्पादन अपेक्षित होते. सध्याच्या बाजारभावानुसार त्यातून सुमारे दोन लाख रुपये मिळण्याची अपेक्षा होती. आतापर्यंत पिकासाठी जवळपास एक लाख रुपये खर्च झाल्याचेही शेतकऱ्याचे म्हणणे आहे. त्यामुळे पीक वाया गेल्याने खर्चासह अपेक्षित उत्पन्नावरही पाणी फिरले आहे.दुष्काळाने पिकाला पाणी नाही आणि कुणाच्या द्वेषाने पिकाच्या पाण्यातच विष? असा संतप्त सवाल या घटनेनंतर उपस्थित होत आहे. शेतकऱ्याचे पीक नष्ट करण्याचा प्रयत्न झाला असेल तर हा केवळ एका शेतकऱ्याचा आर्थिक प्रश्न नसून ग्रामीण भागातील सामाजिक सलोख्यालाच काळिमा फासणारा प्रकार आहे.

याप्रकरणी संजय सांभारे यांनी पोलिस ठाण्यात तक्रार देऊन ड्रममधील पाण्यात तणनाशक कोणी मिसळले याचा सखोल तपास करण्याची मागणी केली आहे. दोषी व्यक्तीचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी तसेच झालेल्या नुकसानीची शासनाने भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. पोलिस तपासानंतरच या प्रकारामागील नेमके कारण आणि दोषी व्यक्ती स्पष्ट होणार आहे.

# दारूच्या व्यसनाने संसाराची राखरांगोळी; आरोग्य सेविकेची जीवनयात्रा संपवली

**समुद्रपूर/जनमाध्यम**

तालुक्यातील उब्दा येथील आरोग्य उपकेंद्रात कार्यरत आरोग्य सेविकेने आरोग्य विभागाच्या निवासस्थानात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ७ ऑक्टोबर रोजी उघडकीस आली. सरीता परचाके खुरसंगे असे मृत आरोग्य सेविकेचे नाव आहे. पतीकडून होणाऱ्या कथित छळाला कंटाळून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप तिची मोठी बहीण कल्पना मडावी यांनी समुद्रपूर पोलिसांत दिलेल्या तक्रारीत केला आहे. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी पती आशिष खुरसंगे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



सरीता यांचे २०१५ मध्ये आशिष खुरसंगे यांच्यासोबत विवाह झाला होता. त्यांना दहा वर्षांची मुलगी आणि दोन वर्षांचा मुलगा आहे. सरीता मागील दोन वर्षांपासून उब्दा येथील आरोग्य विभागाच्या निवासस्थानी कुटुंबासह राहत होत्या. मुलांच्या शिक्षणासाठी वर्धा येथे ये-जा करीत होत्या. सुमारे १५ दिवसांपूर्वी त्या पुन्हा कुटुंबासह उब्दा येथे राहण्यास आल्या होत्या. बहिणीच्या तक्रारीनुसार, पतीला दारूचे व्यसन असून तो किरकोळ कारणावरून सरीता यांच्याशी वाद घालून मारहाण करीत असे. दारूसाठी पैसे मागून पैसे न दिल्यास मारहाण केली जात असल्याचे सरीता यांनी बहिणीला अनेकदा सांगितल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच कल्पना मडावी या पतीसह उब्दा येथे पोहोचल्या. त्यावेळी सरीता यांचा मृतदेह पोलिसांनी शवविच्छेदनासाठी समुद्रपूर येथील शासकीय रुग्णालयात नेला होता. मृतदेहाची पाहणी केल्यानंतर बहिणीने पोलिसांत तक्रार दाखल केली.बहिणीच्या तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून ठाणेदार दीपक वानखोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शरद आवारे, विकी मस्के व संभाजी मूलकर पुढील तपास करीत आहेत.



# जुडोच्या मैदानात दोन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

### नागपूर विभागात प्रथम क्रमांक

**हिंगणघाट/जनमाध्यम**

येथील संजय मेमोरियल टीचर्स एज्युकेशन सोसायटी संचालित संजय गांधी स्मृती विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांनी जुडो क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

नागपूर विभागीय स्तरावर झालेल्या जुडो स्पर्धेत विद्यालयाच्या कनक विनोद कोल्हे हिने १४ वर्षे वयोगटात, तर गणेश आनंद गुंजेवार याने १७ वर्षे वयोगटात दमदार खेळाचे प्रदर्शन केले. दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या गटात नागपूर विभागात प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरीय जुडो स्पर्धेसाठी पात्रता मिळविली. त्यांच्या या यशामुळे विद्यालयासह हिंगणघाटच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

कठोर मेहनत, नियमित सराव, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश शहरासाठी अभिमानाची बाब ठरले आहे. संस्थेचे अध्यक्ष वाघमारे, सचिव वैशाली वणीकर, कार्याध्यक्ष पांढरे, उपाध्यक्ष सिद्दीकी, सहसचिव लेदाडे तसेच कार्यकारिणी सदस्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.मुख्याध्यापक नियाजुद्दीन सिद्दीकी, क्रीडा शिक्षक बंडू खंडारे, शिक्षक सूर्यवंशी आणि सर्व शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनातून हे यश मिळाले. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी दोन्ही खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या.

# वन्यजीव सप्ताहात जखमी पक्षाला जीवदान

### जीवरक्षक फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांची संवेदनशीलता; दहा वर्षांपासून मुक्या जीवांची सेवा

**हिंगणघाट/जनमाध्यम**

वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने जीवरक्षक फाउंडेशन हिंगणघाटच्या कार्यकर्त्यांनी जखमी पक्ष्याला मदत करून त्याचे प्राण वाचविले. २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान वन्यजीव सप्ताह साजरा होत असतानाच ही माणुसकीची घटना घडली.

जीवरक्षक फाउंडेशनचे अध्यक्ष दिगंबर खांडरे यांच्या स्नेहल किसान नर्सरी परिसरात एक पक्षी जखमी अवस्थेत आढळून आला. पक्ष्याची गंभीर अवस्था लक्षात येताच खांडरे यांनी तातडीने त्याची सुटका केली. त्यानंतर पक्ष्याला आवश्यक सेवा आणि काळजी देण्यात आली.जखमी अथवा संकटात सापडलेल्या वन्यजीवांकडे दुर्लक्ष न करता त्यांना वेळेत मदत मिळवून देणे गरजेचे आहे. वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने घडलेल्या या घटनेतून वन्यजीवांप्रती संवेदनशीलता आणि माणुसकीचा संदेश मिळाला आहे.

जीवरक्षक फाउंडेशन गेल्या सुमारे दहा वर्षांपासून जखमी, निराधार आणि संकटात सापडलेल्या पशुपक्ष्यांना मदत, उपचार व संरक्षण मिळवून देण्यासाठी कार्यरत आहे. वन्यजीव सप्ताह हा केवळ उपक्रम आणि भाषणांपुरता मर्यादित न राहता पशुपक्ष्यांप्रती संवेदनशीलता दैनंदिन जीवनाचा भाग व्हावी, असा संदेश या कार्यातून देण्यात आला.



# सोयाबीनच्या गंजीला आग: साडेतीन लाखांचे नुकसान

**पुलगाव**-खातखेडा शिवारातील शेतात ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजीला अज्ञात व्यक्तीने आग लावल्याची घटना ६ ऑक्टोबर रोजी घडली. या घटनेत शेतकऱ्याचे सुमारे साडेतीन लाख रुपयांचे नुकसान झाले. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.विठ्ठल मारोती रिठे यांनी पोलिसांत तक्रार दिली. ते ६ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास शेतातून जेवणासाठी घरी आले होते. त्यानंतर रात्री आठच्या सुमारास एकांबा येथील पोलीस पाटलांचा फोन आला. शेतातील सोयाबीनच्या गंजीला आग लागल्याची माहिती मिळताच ते मुलासह शेतात पोहोचले.तेथे सोयाबीनची गंजी आगीत पूर्णपणे जळून खाक झाल्याचे दिसून आले. अज्ञात व्यक्तीने जाणूनबुजून आग लावल्याचा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. पुलगाव पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# प्राचार्या धरती तमगिरे यांचा सन्मान

### गिताई प्रतिष्ठानच्या ४७ व्या वर्धापन दिनानिमित्त गौरव

**हिंगणघाट/जनमाध्यम**

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच भारतीय संस्कृती आणि पारंपरिक मूल्यांची जपणूक करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या भवन्स गिरधरदास मोहता विद्या मंदिरच्या प्राचार्या धरती तमगिरे यांचा गिताई प्रतिष्ठानच्या ४७ व्या वर्धापन दिनानिमित्त सन्मान करण्यात आला.विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीची ओळख निर्माण व्हावी, पारंपरिक मूल्यांची जाणीव व्हावी आणि संस्कारांची शिदोरी मिळावी, यासाठी तमगिरे यांच्या प्रयत्नांची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात आला. शिक्षणातून केवळ ज्ञान नव्हे, तर संस्कार आणि मूल्यांची जपणूक व्हावी, या दृष्टिकोनातून त्यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा अभ्यास व अनुभव घेण्यासाठी आलेले




जपानचे असाई गुरु यांच्या पवित्र उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी गिताई प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते. संत गाडगेबाबा अध्ययन केंद्राचे प्रमुख दिलीप काळे यांनीही कार्यक्रमाला उपस्थिती लावली.विद्यार्थ्यांच्या मनात संस्कृती आणि संस्कारांची मूल्ये रुजविणाऱ्या या कार्याचा गौरव झाल्याने शैक्षणिक वर्तुळातून समाधान व्यक्त करण्यात आले.

## हिंगणघाटात वाहतूक नियमभंगावर दणका

# ३०८ वाहनचालकांवर कारवाई; ५.८७ लाखांचा दंड

**हिंगणघाट/जनमाध्यम**

जीवन सुरक्षा अभियानांतर्गत हिंगणघाट शहरात वाहतूक पोलिसांनी नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला.या कारवाईत तब्बल ३०८ चलान प्रकरणे दाखल करून ५ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या ठिकाणी वाहने उभी करणे, विनापरवाना वाहन चालविणे, ट्रिपलसीट, कर्णकर्कश सायलेंसर, फॅन्सी नंबर प्लेट तसेच अन्य नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास दिल्याप्रकरणी पालकांविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार दोन गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच ड्रंक अँड ड्राइव्हप्रकरणी चार वाहनचालकांवर कारवाई करून त्यांची वाहने ताब्यात घेण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक यांच्या उपस्थितीत ही मोहीम राबविण्यात आली. वाहतूक नियंत्रण शाखेचे प्रभारी अधिकारी विजयकुमार घुले, पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. वाहनचालकांनी हेल्मेट, सीटबेल्टचा वापर करून वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांनी केले.

# कॅनॉन जिमतर्फे नाना पाटेकरांना श्रद्धांजली



**वर्धा/जनमाध्यम**

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी समजताच कॅनॉन जिममधील उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. डॉ. विक्रम बेलखोडे यांच्या अध्यक्षतेखाली श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले.

नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनयातून मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण केली. अभिनयासोबतच सामाजिक संवेदनशीलतेची जाणीव ठेवणारा कलाकार म्हणूनही त्यांचे योगदान स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने मोठी हानी झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.यावेळी पत्रकार ईक्राम हुसेन, ट्रेनर अनिल लोहकरे, सतीश पलेरिया, साक्षी शर्मा, प्राजक्ता सातपुते, धनश्री वाघमारे, प्रतीक काटोले, पूर्वा ढोमणे यांच्यासह कॅनोन जिममधील सदस्य उपस्थित होते. उपस्थितांनी नाना पाटेकर यांच्या स्मृतींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

**रवींद्र लाखे,**

# कल्याणकारी योजना हव्यात, पण फुकट वाटपाला लगाम हवा...!

**वर्धा-** लोककल्याणकारी योजना या लोकशाही व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. गरीबांना अन्न, शेतकऱ्यांना संकटाच्या काळात मदत, दुष्काळग्रस्तांना नुकसानभरपाई, कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि महिलांना आर्थिक आधार देणे ही सरकारची जबाबदारीच आहे. त्यामुळे प्रत्येक सरकारी मदतीला सरसकट फुकट वाटप म्हणणे योग्य ठरणार नाही.

मात्र गरजू नागरिकाला संकटातून बाहेर काढण्यासाठी दिलेली मदत आणि कोणताही दीर्घकालीन आर्थिक परिणाम न पाहता निवडणुकीच्या राजकारणातून केली जाणारी घोषणा यातील फरक ओळखण्याची वेळ आली आहे.मोफत धान्य, लाडकी बहीण, कामगार योजना, शेतकरी मदत, कर्जमाफी, दुष्काळग्रस्तांना मदत, नमो शेतकरी अशा विविध योजनांवर सरकार मोठा निधी खर्च करते. यातील अनेक योजनांचा सामाजिक उद्देश योग्य आहे. गरिबाच्या घरात अन्न पोहोचणे किंवा संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला मदत मिळणे आवश्यकच आहे.पण प्रश्न असा आहे की, या मदतीचा खर्च राज्याच्या आर्थिक क्षमतेशी सुसंगत आहे का?

**कल्याणकारी योजना म्हणजे काय**

कल्याणकारी योजना नागरिकाला सक्षम करणाऱ्या असाव्यात. उदाहरणार्थ शिक्षण, आरोग्य, सिंचन, रोजगार, कौशल्यविकास, सामाजिक सुरक्षा आणि दुष्काळ निवारण यावरील खर्च हा भविष्यातील मानवी व आर्थिक क्षमता वाढवू शकतो.

याउलट केवळ राजकीय लोकप्रियतेसाठी सातत्याने रोख रक्कम किंवा वस्तू वाटत राहणे आणि त्यातून रोजगार, उत्पादन किंवा उत्पन्ननिर्मिती न होणे हा फुकट वाटपाचा प्रकार ठरू शकतो.मदत अशी असावी की उद्या त्या मदतीची गरज कमी व्हावी.

**सरकारची बाजूही समजून घ्यावी लागेल**

सरकारचे म्हणणे असे असू शकते की, महागाई, बेरोजगारी, दुष्काळ आणि शेतकरी संकटाच्या काळात थेट आर्थिक मदत केल्याशिवाय सामान्य कुटुंबांना दिलासा मिळणार नाही. महिलांच्या खात्यात जाणारी रक्कम कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावते. मोफत धान्यामुळे गरीब कुटुंबाचा अन्नावरील खर्च कमी होतो. शेतकरी मदतीमुळे संकटाच्या काळात कुटुंब टिकून राहते.हा युक्तिवाद पूर्णपणे नाकारता येणार नाही.

मात्र त्याचवेळी सरकारने दुसरा प्रश्नही स्वीकारला पाहिजे. या योजनांचा खर्च दीर्घकाळ टिकवण्यासाठी महसूल आणि विकासाच्या गरजा यांचा समतोल कसा राखला जाणार?

**कर्ज घेऊन लोकप्रियता किती दिवस**

सरकारकडे पैसा मर्यादित असतो. महसूल वाढवणे, कर्ज घेणे आणि खर्चाचे प्राधान्य ठरवणे या तीन गोष्टींवर राज्याची आर्थिक ताकद अवलंबून असते.कल्याणकारी योजनांवर खर्च करताना पायाभूत सुविधा, उद्योग, रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि सिंचन यांसाठी पुरेसा निधी शिल्लक राहिला पाहिजे. कारण आजची मदत उद्याचा रोजगार निर्माण करत नसेल तर गरिबीचा प्रश्न कायम राहतो.शेतकऱ्याला कर्जमाफी देणे हा संकटातील आधार असू शकतो. पण त्याच शेतकऱ्याला सिंचन, बाजारपेठ, उत्पादन खर्चावर नियंत्रण आणि योग्य भाव मिळाला तर पुन्हा कर्जमाफीची वेळच येणार नाही.महिलेला आर्थिक मदत देणे आवश्यक असू शकते. पण त्याच महिलेला रोजगार, कौशल्य आणि उद्योगाची संधी दिली तर ती कायमस्वरूपी स्वावलंबी होऊ शकते.म्हणून अनुदानापेक्षा उत्पन्ननिर्मिती हा दीर्घकालीन उपाय आहे.

**श्रीलंकेचा धडा काय सांगतो**

महाराष्ट्राची किंवा भारताची परिस्थिती श्रीलंकेसारखी होईल, असे थेट सांगणे योग्य नाही. दोन्हींची आर्थिक रचना आणि क्षमता वेगळी आहे. मात्र श्रीलंकेच्या आर्थिक संकटातून एक धडा मिळतो.सरकारी खर्च, महसूल आणि कर्ज यांचा समतोल बिघडला तर आर्थिक संकटाची तीव्रता वाढू शकते. त्यामुळे भीती निर्माण करण्यापेक्षा आर्थिक शिस्तीवर चर्चा होणे गरजेचे आहे.

**जनतेला पैशांचा हिशेब मिळायला हवा**

सरकारने कल्याणकारी योजनांना विरोधकांचा आरोप म्हणून न पाहता त्यांची आर्थिक परिणामकारकता तपासली पाहिजे.किती लाभार्थी?,किती खर्च,किती पात्र आणि किती अपात्र,योजनेमुळे किती कुटुंबे स्वावलंबी झाली,राज्याच्या महसुलाच्या तुलनेत योजनांचा खर्च किती,आणि भविष्यात हा खर्च किती वर्षे पेलता येईल,या प्रश्नांची पारदर्शक उत्तरे जनतेसमोर आली पाहिजेत.

**फुकट नव्हे, सक्षम करणारे राज्य हवे**

गरीबाला अन्न द्या, पण त्याला रोजगाराची संधीही द्या.शेतकऱ्याला संकटात मदत करा, पण त्याला कायम कर्जमाफीची गरज पडणार नाही अशी शेतीव्यवस्था उभी करा.महिलेला आर्थिक आधार द्या, पण तिला स्वतःचे उत्पन्न निर्माण करण्याची संधी द्या.कामगाराला अनुदान द्या, पण त्याला कौशल्य आणि सामाजिक सुरक्षा द्या.

दुष्काळग्रस्ताला मदत द्या, पण पुढील दुष्काळाची तीव्रता कमी करणारे जलसंधारण करा.हीच कल्याणकारी राज्याची खरी दिशा आहे.

लोकांच्या अडचणींवर खर्च करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. मात्र प्रत्येक समस्येचे उत्तर फक्त पैसे वाटण्यात शोधणे ही आर्थिकदृष्ट्या धोकादायक प्रवृत्ती ठरू शकते.जनतेला सरकारची मदत हवी आहे, पण त्याहून अधिक गरज आहे स्वावलंबनाची.राजकीय लोकप्रियतेपेक्षा आर्थिक शाश्वतता मोठी आहे.

आजची योजना उद्याचे ओझे बनणार नाही, याची काळजी घेणे ही सरकारची जबाबदारी आहे.कारण तिजोरीतील पैसा संपल्यानंतर घोषणा करता येतात, पण त्या घोषणा पूर्ण करण्यासाठी पैसा उरत नाही.कल्याणकारी राज्य हवेच; मात्र फुकट वाटपाच्या स्पर्धेत राज्याची आर्थिक शिस्त गमावता कामा नये.

**जनतेला आधार देणे आणि राजकीय लोकप्रियतेसाठी पैसा वाटणे यात फरक; आर्थिक शिस्तीचा प्रश्न आता ऐरणीवर**

# दहशत माजविणाऱ्या तरूणाला अटक

**वर्धा-**हातात लोखंडी सुरा घेऊन सार्वजनिक रस्त्यावर सैरावैरा फिरत परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या तरुणाला रामनगर पोलिसांनी ताब्यात घेतले. सुमीत मुरलीधर वैद्य (१९, रा. देशमुख लेआउट, बोरगाव मेघे) असे आरोपीचे नाव आहे.पोलिस पथक रात्री परिसरात गस्त घालत असताना सिंदी मेघे ग्रामपंचायत ते अग्निहोत्री कॉलेज मार्गावर एक तरुण हातात लोखंडी सुरा घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी धाव घेतली. तेथे आरोपी सार्वजनिक रस्त्यावर सुरा फिरवत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेत चौकशी केली. मात्र त्याने समाधानकारक उत्तर दिले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. पंचांसमक्ष त्याच्या ताब्यातून १७ इंच लांबीचा लोखंडी सुरा जप्त करण्यात आला. त्याची किंमत सुमारे ५०० रुपये आहे. याप्रकरणी रामनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला.

**हिंगणघाटातून वृद्ध बेपत्ता**

**हिंगणघाट-**शहरातील इंदिरा गांधी वॉर्डातून मारोतराव चौधरी हे वृद्ध बेपत्ता झाल्याची तक्रार हिंगणघाट पोलिसांत दाखल करण्यात आली आहे. विठ्ठल चौधरी यांनी याबाबत तक्रार दिली. मारोतराव चौधरी हे कृषी उत्पन्न बाजार समितीत चालक म्हणून काम करून निवृत्त झाले आहेत.६ ऑक्टोबर रोजी सकाळी ते स्टेट बँक ऑफ इंडिया, हिंगणघाट येथे पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यानंतर ते घरी परतले नाहीत.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३१२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# अवैध सावकारी, मायक्रो फायनान्सच्या मनमानी वसुलीला लगाम

## DDR प्रकरणे तीन महिन्यांत निकाली काढण्याची मागणी

**-बच्चू कडूंच्या पाठपुराव्याला यश**

**-जिल्हा उपनिबंधकांना जलद कारवाईचे निर्देश**



'दुष्काळात शेतकरी आधीच अडचणीत आहे. सरकारने त्याला सवलत दिल्यानंतर सावकार किंवा मायक्रो फायनान्सच्या वसुलीच्या नावाखाली त्याचा छळ होत असेल, तर ते आम्ही खपवून घेणार नाही. प्रलंबित प्रकरणे वर्षानुवर्षे चालवून कर्जदारांना कार्यालयांच्या फेऱ्या मारायला लावायच्या नाहीत. तीन महिन्यांत प्रकरणांचा निकाल लागला पाहिजे आणि त्रास देणाऱ्यांवर तात्काळ कारवाई झाली पाहिजे. प्रश्न मांडून थांबणे हा आमचा स्वभाव नाही; प्रश्नाचा निकाल लागेपर्यंत पाठपुरावा करणार.'

**-आमदार बच्चू कडू**

**मुंबई/प्रतिनिधीः-** विधान परिषद सदस्य आ. बच्चू कडू यांनी दुष्काळग्रस्त शेतकरी, महिला बचत गट आणि मायक्रो फायनान्सच्या कर्जदारांच्या मनमानी वसुलीचा मुद्दा सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे मांडला. या पार्श्वभूमीवर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विशेष बैठक घेण्यात आली. अवैध सावकारीची प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत आणि जिल्हा उपनिबंधकांनी प्रकरणनिहाय गतीने निर्णय घ्यावेत, असे निर्देश मंत्र्यांनी दिले.

दुष्काळाच्या काळात शेतकरी, महिला भगिनी आणि महिला बचत गटांवर मायक्रो फायनान्स किंवा अवैध सावकारांकडून मानसिक व आर्थिक दबाव टाकून वसुली होत असल्याच्या तक्रारी बच्चू कडू यांनी मांडल्या. अशा प्रकारे त्रास देणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची भूमिका बैठकीत स्पष्ट करण्यात आली.

बच्चू कडू यांनी प्रलंबित DDR प्रकरणे तीन महिन्यांत निकाली काढावीत, अशी ठाम मागणी केली. तसेच अवैध सावकारीच्या व्यवहारातून जमीन-मालमत्ता बळकावल्याच्या तक्रारींची गांभीर्याने चौकशी करून नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. दुष्काळी परिस्थितीत अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी नियमित आढावा घ्यावा, तसेच जिल्हा उपनिबंधक आणि पोलीस प्रशासनाने समन्वयाने कार्यवाही करावी, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी स्पष्ट केले. बैठकीला आ. बच्चू कडू उपस्थित होते. सर्व जिल्हा उपनिबंधक तसेच संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.

# पीडीएमसीतील चोरीची दुचाकी २४ तासांत जप्त

## गाडगेनगर पोलिसांच्या डीबी पथकाची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** पीडीएमसी रुग्णालयाच्या कॅज्युअल्टीसमोर उभी केलेली डॉक्टरची दुचाकी चोरीला गेल्याच्या घटनेचा गाडगेनगर पोलिसांनी छडा लावत दुचाकीसह एका आरोपीला ताब्यात घेतले. विक्रम उर्फ विक्की कृपाप्रसाद नांदणे (वय २६, रा. वाकी रायपूर, ता. भातकुली) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

पीडीएमसी रुग्णालयातील डॉ. आदिती ओमप्रकाश कानडे (वय २७) या ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता ड्युटीसाठी रुग्णालयात आल्या होत्या. त्यांनी वडिलांच्या नावावर असलेली ग्रे रंगाची होंडा ॲक्टिव्हा (एमएच २७ बीएम २६१९) कॅज्युअल्टीसमोर उभी केली होती. दुपारी १२ वाजता ड्युटी संपल्यानंतर त्या घरी जाण्यासाठी बाहेर आल्या असता दुचाकी जागेवर दिसून आली नाही. याप्रकरणी त्यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या निर्देशानुसार डीबी पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान ही चोरी अभिलेखावरील आरोपी विक्रम उर्फ विक्की नांदणे याने केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. त्याच्या ताब्यातून चोरीस गेलेली सुमारे ५० हजार रुपये किमतीची होंडा ॲक्टिव्हा जप्त करण्यात आली. वाहनावरील क्रमांक काढण्यात आला होता. मात्र, चेसिस व इंजिन क्रमांकावरून ते चोरीस गेलेले वाहन असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक संदिप हिवाळे करीत आहेत.

ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, पोलिस उपायुक्त परिमंडळ-१ यशवंत सोळंके, सहायक पोलिस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईम पोलिस निरीक्षक विजया पंधरे, पोलिस निरीक्षक (प्रशासन) प्रमोद पाचकवडे यांच्या सूचनेनुसार डीबी पथक प्रमुख सपोनि. संदिप हिवाळे, पोहवा. भारत वानखडे, पो.ना. राजेश गुरेले, पो.शि. मतिन शेख, सुशांत प्रधान, धनराज कुमरे, महेश शर्मा, प्रताप लोखंडे व चालक पोहवा. अजय निस्ताणे यांनी केली.

# ग्रामीण भागात १५ ऑक्टोबर पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी संतोष काकडे यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७(१) व ३७(३) अन्वये पोलीस आयुक्त परिक्षेत्र वगळून ग्रामीण भागासाठी प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

त्यानुसार १ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजेपासून १५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात आदेश लागू राहणार आहे. या कालावधीत पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव करणे, मिरवणुका काढणे तसेच परवानगीशिवाय सभा घेणे यावर निर्बंध राहतील.

शस्त्र, लाठी, भाला, चाकू आदी वस्तू बाळगणे, फटाके व कच्च्या मालाची वाहतूक, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रांचा वापर, तसेच सार्वजनिक ठिकाणी घोषणाबाजी, गाणी वाजविणे, अंगविक्षेप किंवा बदनामीकारक वक्तव्ये करण्यासही मनाई करण्यात आली आहे.

दरम्यान, शासकीय व निमशासकीय कामकाज, विवाह, नाटक, तमाशा, धार्मिक व शासकीय कार्यक्रम तसेच आठवडी बाजारांना आदेशातून वगळण्यात आले आहे. मिरवणूक अथवा जमावासाठी संबंधित पोलीस ठाण्याची लेखी परवानगी घेणे आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# नोकरीच्या नावावर भावासह बहिणीची ६२ लाखांनी फसवणूक

## बनावट नियुक्तीपत्रही दिले ,नागपूरच्या ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय अन्न महामंडळाच्या मुख्यालयात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून भाऊ-बहिणीची ६२ लाख रुपयांनी फसवणूक करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात राजापेठ पोलिसांनी नागपूरच्या सहा आरोपींनी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार भाऊ-बहिणींचा विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी पीडितांना तीन वेळा दिल्लीला नेऊन एफसीआय कार्यालयाबाहेर उभे केले आणि बनावट नियुक्तीपत्रही दिले. बेलतरोडी पोलीस ठाण्यातून 'झिरो डायरी'द्वारे केस ट्रान्सफर होऊन मिळाल्यानंतर मंगळवारी राजापेठ पोलीसांनी आरोपी जितेंद्र उर्फ आप्पा प्रभाकर गेडाम, मनोज आगले,एक महिला, नामदेव विश्वनाथ कडू,अपूर्व नामदेव कडू, शिवम सेन (सर्व रा. नागपूर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

माहिती नुसार पीडित महिला आणि तिचा भाऊ शहरातील गोपाल नगर परिसरातील गणेश कॉलनी येथील रहिवासी आहेत. दोघेही पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर नागपूरमध्ये भाड्याने घर घेऊन स्पर्धा परीक्षांचे कोचिंग घेत होते आणि सरकारी नोकरीची तयारी करत होते.वर्ष २०२३ मध्ये तक्रारदार महिलेची ओळख आरोपी महिलेच्या माध्यमातून इतर आरोपींशी झाली.

संपर्क वाढल्यानंतर आरोपींनी दोन्ही भावंडांना दिल्ली येथील भारतीय अन्न महामंडळाच्या मुख्यालयात पक्की सरकारी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले.

आरोपींच्या आमिषाला बळी पडून पीडितांनी ११ ऑगस्ट २०२३ ते ४ एप्रिल २०२४ या कालावधीत एकूण ६२ लाख रुपये आरोपींना दिले. ही रक्कम रोख आणि आरटीजीएस द्वारे देण्यात आली. पैशांची संपूर्ण देवाण- घेवाण अमरावती येथील तक्रारदाराच्या घरी झाली होती.

पीडितांचा पूर्ण विश्वास जिंकण्यासाठी आरोपी त्यांना तीन वेळा दिल्ली येथील अन्न महामंडळाच्या कार्यालयातही घेऊन गेले. तेथे आरोपींनी दोघांना मुख्य कार्यालयाबाहेर उभे ठेवले आणि स्वतः आत निघून जात होते, जेणेकरून पीडितांना वाटावे की त्यांची आतपर्यंत मजबूत ओळख आहे.

डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत नोकरी न लागल्याने तक्रारदाराने आरोपींकडे आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली. पैसे अडकल्याचे पाहून आरोपींनी दोघांना बनावट नियुक्तीपत्र देऊन अनेक महिने फिरवले. सततच्या टाळाटाळ आणि खोट्या आश्वासनानंतर अखेर पीडितांना समजले की त्यांची फसवणूक झाली आहे. हे लक्षात आल्यानंतर पीडितेने नागपूर शहरातील बेलतरोडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पैशांच्या देवाण-घेवाणीचा संपूर्ण घटनाक्रम शहरातील राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने, बेलतरोडी पोलिसांनी 'झिरो डायरी'मध्ये गुन्हा दाखल करून केस डायरी राजापेठ पोलिसांकडे वर्ग केली.राजापेठ पोलिसांनी आता सहाही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करून सखोल तपास सुरू केला आहे.

# सुपर मध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काळी फित लावून आंदोलन

## थकित वेतन आणि दिवाळी बोनससाठी संताप

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये वर्ग-४ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी प्रलंबित वेतन आणि हक्काच्या बोनसच्या मागणीसाठी आज गुरुवार ८ ऑक्टोंबर रोजी काळे झेंडे हातात घेत तसेच हाताला काळ्या फिती बांधून प्रशासनाचा निषेध नोंदविला. कंत्राटी पद्धतीने रुग्णालयात सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी तसेच कर्मचाऱ्यांना त्यांचा हक्काचा बोनस मिळावा, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

कर्मचाऱ्यांनी आंदोलनादरम्यान प्रशासनाच्या धोरणा विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या विरोधातही घोषणाबाजी करण्यात आली. अनेक दिवसांपासून वेतन व इतर हक्कांसाठी पाठपुरावा करूनही अपेक्षित तोडगा न निघाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे आंदोलनातून दिसून आले. रुग्णालयातील अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे आणि न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांच्या मागण्या तातडीने निकाली काढाव्यात, अशी मागणी आंदोलकांनी केली. २००८ पासून हे कर्मचारी सेवेमध्ये आहे पण त्यांना वेळेवर वेतन नाही मिळत. त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. कर्मचाऱ्यांना दिवाळी पूर्वी वेतन आणि बोनस दिले जाण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. या मध्ये कंत्राटी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# अमरावतीत पारा पोहोचला ३९.६ अंश सेल्सिअसवर

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑक्टोबर महिना सुरू झाला असला तरी विदर्भात मात्र उन्हाळ्याची जाणीव होत आहे. सकाळपासून जाणवणारी उष्णता, दुपारी तापणारे ऊन आणि वाढलेला उकाडा यामुळे 'ऑक्टोबर हीट'चा चटका नागरिकांना जाणवू लागला आहे. मान्सूनने माघार घेतल्यानंतर पावसाने उघडीप दिली आणि त्याचवेळी कमाल तापमानाने उसळी घेतली आहे. मंगळवारी अमरावतीत राज्यातील सर्वाधिक ३९.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. अमरावतीचे कमाल तापमान सरासरीपेक्षा तब्बल सात अंशांनी अधिक राहिले. त्यामुळे ऑक्टोबरच्या सुरुवातीलाच शहरातील वातावरण उन्हाळ्यासारखे तापले आहे. दुपारच्या वेळी उन्हाची तीव्रता वाढत असल्याने रस्त्यावरची वर्दळही उष्णतेच्या चटक्यामुळे प्रभावित होत आहे. विदर्भातील अन्य शहरांमध्येही तापमानाचा पारा चढलेला आहे. वर्ध्यात ३८ अंश, अकोल्यात ३७.९ अंश, चंद्रपुरात ३७ अंश आणि नागपुरात ३६.२ अंश कमाल तापमान नोंदविण्यात आले. अकोल्यातील तापमान सरासरीपेक्षा ३.८ अंशांनी अधिक आहे. हवामान विभागाने विदर्भातील कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक असल्याचे नमूद केले आहे. मान्सून कमकुवत झाल्याने विदर्भात पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे वातावरणात पावसाळी गारवा राहण्याऐवजी उन्हाची तीव्रता वाढत आहे. पुढील सात दिवस विदर्भाच्या कमाल तापमानात विशेष बदल होण्याची शक्यता नसल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. त्यामुळे 'ऑक्टोबर हीट'पासून लगेच दिलासा मिळण्याची शक्यता कमी आहे. अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशीम या जिल्ह्यांत पुढील काही दिवस हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे. अकोल्यासाठी पुढील सात दिवस पावसाची शक्यता नसल्याचे हवामान विभागाच्या अंदाजात नमूद आहे. तापमान वाढीचा परिणाम शेतीवरही होण्याची शक्यता आहे. मान्सूननंतर लगेचच तापमान सरासरीपेक्षा अधिक राहिल्यास जमिनीतील ओलावा वेगाने कमी होऊ शकतो. त्यामुळे रब्बी हंगामाच्या सुरुवातीला शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढण्याची शक्यता आहे.


## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९**
**९४२२१२०४०६**


## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६३९/२०२६ ने.ता.२६.१०.२०२६

अर्जदार - १. **श्री उमेश वामनराव गोमकाळे,**
वय ५१ वर्षे, धंदा - शेती
रा.बोडणा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदाराचे **वडिल नामे वामन मोतीराम गोमकाळे** हे दिनांक **२७/०६/२०२०** रोजी **Bodana,Tq. Morshi, Dist. Amravati** येथे मय्यत झालेले आहे. तसेच अर्जदाराची **आई नामे कमला वामनराव गोमकाळे** ही **दिनांक ०७/०५/२०२५** रोजी **Bodana,Tq. Morshi, Dist. Amravati** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- ०७/१०/२०२६**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर सुचना

सर्व जनतेस सूचीत करण्यात येते की, माझे पक्षकार **श्री सचीन काशीनाथ नाशीककर, रा. नमुना गल्ली नं.५, अमरावती** यांनी **१) श्री दादाराव मारोतराव खडसे, २) सौ.चंदा दादाराव खडसे, रा.दोघे पार्वती नगर, नं.२, अमरावती** यांचे मालकीचा व ताब्यात असलेल्या खालील वर्णन केलेल्या प्लॉटचा सौदा केलेला आहे. त्या प्लॉटचे वर्णन :-

नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावतीचे हददीतील **मौजे-महाजनपुर, प्रगणे-बडनेरा,** ता.जि.अमरावती येथील **शेत सर्व्हे क्र.७/२** मधील मनपा, ०९.०५.१९८६ नुसार लेआउट मंजुर व ज्याचा रा.मा. क्र./एन.ए.पी.-३४/ महाजनपुर-६१/१९८५-८० नुसार लेआउट कन्हर्शन मंजुर झालेल्या जागेतील **प्लॉट नं. ४२ (बेचाळीस)** ज्याची साईज मंजुर नकाशाप्रमाणे **१२ मी. X १६ मी.याचे एकुण क्षेत्रफळ २०६६चौ.फुट (१९२ चौ. मिटर) आहे,** याची चर्तुसिमा खालीलप्रमाणे आहे :-

पुर्वेस -सर्व्हीस लाईन, पश्चिम - ले आउट मधील रोड,
उत्तर- प्लॉट नं.४१, दक्षिण - रोड

सबब वरील वर्णन केलेल्या प्लॉटबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, ताबा, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध, कर्ज, गहाण, बोजा,बक्षीस,वारसा हक्क, कुळहितसंबंध इत्यादी कोणत्याही प्रकारे हितसंबंध पुर्वीचा करार व्यवहार अथवा आक्षेप असल्यास त्यांनी खाली दिलेल्या पत्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह प्रत्यक्ष संपर्क साधावा व लेखी पोच घ्यावी. अन्यथा वरील मुदतीनंतर माझे पक्षकार वर नमुद केलेल्या प्लॉटची खरेदीखत नोंदणीकृत करुन देतील, त्यानंतर कोणाचेही कुठल्याही प्रकारची हरकत, उजर चालणार नाही. कृपया याची नोंद आम जनतेने घ्यावी.

**दिनांक ०८.१०.२०२६**
**स्थळ- अमरावती**

**सही/-**
**ॲड. नितिन व्ही.कोल्हटकर** (नोटरी)
**नमुना लेन नं.५, अमरावती**
**मो.- ९४२२८४३४४२**


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ३५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.२०६२/२०२६**
**वृषाली + २ - वि.- निरंक**
**पुढील ता.३१.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**

1. **Vrushali w/o. Amit Ingole,** Age about 35 yrs. Occ.- Doctor (Maiden name Vrushali Ramdas Khobragade) R/o. 201-B, Second Floor, Gokul Enmclave, Near Saparsh Hospital, Zingabai Takli, Mankapur, Nagpur- 440030
2. **Sonali d/o. Ramdas Khobragade,** Age about 34 yrs. Occ.- Service (After marriage name Sonali w/o. Saurav Moon) R/o. Plot No.-6, Road No.-11, Vishwakarma Nagar, VTC : Parvati Nagar, PO: Parvati Nagar, Nagpur
3. **Swapnil s/o. Ramdas Khobragade**, Age about 32 yrs. Occ.- Private Job R/o.7-A, Medical Colony, Ashok Colony, Morshi Road, Shivaji Nagar, S.O. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Surekha Ramdas Khobragade** हया दिनांक **३०.०७.२०२६** रोजी **नागपूर** येथे मयत झाले. अर्जदार **Vrushali w/o Amit Ingole (Maiden name Vrushali Ramdas Khobragade) +2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Vrushali w/o Amit Ingole (Maiden name Vrushali Ramdas Khobragade) +2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.३०.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## -जाहीर नोटीस-

**विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, मोर्शी**

**मि.कि.के.नं.३०६/२०२६, ने.ता. २६/१०/२०२६**

**- अर्जदार-**

**नाजेमुन सादीक खान, वय ४४ वर्ष, धंदा-घरकाम**
**(लग्नापूर्वीचे नांव नाजेरुन मुनीरबेग)**
रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-गैरअर्जदार-**

**निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
ग्रामपंचायत कार्यालय चिंचोलीगवळी, ता.मोर्शी, जि.अमरावती

या नोटीसव्दारे सर्वत्र लोकांना कळविण्यांत येते की, अर्जदार नामे **नाजेरुन मुनीरबेग** हिचा **जन्म दिनांक ३०/०१/१९८२** रोजी तिचे माहेरी **चिंचोलीगवळी** येथे झालेला आहे. अर्जदाराचे आईवडिलांनी किंवा त्याचे इतर कोणत्याही नातेवाईकांनी त्याच्या जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय चिंचोलीगवळी** किंवा इतर कोणत्याही शासकीय कार्यालयात केलेली नाही. अर्जदाराला वैयक्तीक कामाकरिता जन्माच्या दाखल्याची गरज असल्याने अर्जदाराने जन्म- मृत्यू नोंदणी अधिनियम २०२६ चे कलम १३ (३) नुसार तिच्या जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना देण्याबाबत सदरचे प्रकरण विद्यमान न्यायालयात न्यायालयात दाखल केले असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यांस त्यांनी प्रसिध्दी तारखेपासून एक महिन्याच्या आंत विद्यमान न्यायालयांत आपले म्हणणे सादर करावे अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप किंवा हरकत नाही असे गृहीत धरुन अर्जावर सुनावणी करुन अर्जदार नामे नाजेरुन मुनीरबेग हिचा **जन्म दिनांक ३०/०१/१९८२** रोजी झाल्याबाबतची जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना दिल्या जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक - ०५/१०/२०२६

शिक्का

**आदेशानुसार**
सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१८०२/२०२६**
**Swapnil Hari Adhav + 3 Versus NIL**
**पुढील ता.१४.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants :-**

1. **Swapnil Hari Adhav,** Age about 55 yrs. Occ.- Service R/o. Pimple Saudagar, Pune City, Pune
2. **Nilesh Hari Adhav,** Aged about 51 yrs. Occ.- Service R/o. Pimple Saudagar, Pune City, Pune
3. **Rakhee Mahesh Desai,** Aged about 47 yrs. Occ.- Doctor R/o. Bhyandarpada, Kasavadavli, Thane
4. **Ratna Hari Adhav,** Aged about 77 yrs. Occ.- Household R/o. Sai Nagar, Amravati

-- Versus --

Non-Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Haribhau @ Hari Shamrao Adhau** हया दिनांक **०३.०७.२०२५** रोजी **अमरावती,ता.जि.अमरावती** येथे मयत झाले आहे. **Swapnil Hari Adhav + 3 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Swapnil Hari Adhav + 3 Versus NIL** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०७.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## -जाहीर नोटीस-

**विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, मोर्शी**

**मि.कि.के.नं.३०४/२०२६, ने.ता. २६/१०/२०२६**

**- अर्जदार-**

**सादीक खॉ इब्राहीम खॉ, वय ४७ वर्ष, धंदा- मजुरी**
रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-गैरअर्जदार-**

**निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
ग्रामपंचायत कार्यालय अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

या नोटीसव्दारे सर्वत्र लोकांना कळविण्यांत येते की, अर्जदार नामे **सादीक खॉ इब्राहीम खॉ** याचा **जन्म दिनांक १५/०८/१९७९** रोजी त्यांचे राहते घरी **अंबाडा** येथे झालेला आहे. अर्जदाराचे आईवडिलांनी किंवा त्याचे इतर कोणत्याही नातेवाईकांनी त्याच्या जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय अंबाडा** किंवा इतर कोणत्याही शासकीय कार्यालयात केलेली नाही. अर्जदाराला वैयक्तीक कामाकरिता जन्माच्या दाखल्याची गरज असल्याने अर्जदाराने जन्म- मृत्यू नोंदणी अधिनियम २०२६ चे कलम १३ (३) नुसार त्यांच्या जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना देण्याबाबत सदरचे प्रकरण विद्यमान न्यायालयात न्यायालयात दाखल केले असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यांस त्यांनी प्रसिध्दी तारखेपासून एक महिन्याच्या आंत विद्यमान न्यायालयांत आपले म्हणणे सादर करावे अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप किंवा हरकत नाही असे गृहीत धरुन अर्जावर सुनावणी करुन अर्जदार नामे **सादीक खॉ इब्राहीम खा** याचा **जन्म दिनांक १५/०८/१९७९** रोजी झाल्याबाबतची जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना दिल्या जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक - ०५/१०/२०२६

शिक्का

**आदेशानुसार**
सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोर्शी

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **136/19/2026**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **हनुमान मंदिर सुरवाडी खुर्द, ता.तिवसा, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री प्रमोद सुगनराज गौरखेडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :-** ग्रामपंचायत कार्यालय सुरवाडी ता.तिवसा, जि.अमरावती जुना घर क्र. २४३, मालमत्ता क्र.२४३, हनुमान मंदिर सुरवाडी खुर्द आर.सी.सी.मंदिर ४००+४००=८०० चौ.फुट बांधकाम व खाली जागा ५३२० चौ.फुट एकुण जागा ६१२० चौ.फुट म्हणजेच (५६८.७७ चौ.मीटर) (अंदाजे किंमत ४०,०००/-) चाळीस लक्ष रुपये गाव नमुना ८ अे प्रमाणे

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २४.०८.२०२६ रोजी दिली.

**सही/-**
**अधीक्षक, न्याय शाखा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

**आर.एम.जे.सी.क्र.२४३/२०२६ ने.ता.१९.११.२०२६**

**अर्जदार :** १. **सौ.संगिता बबनराव भुजाडे (लग्नानंतरचे नाव)**
**कु.संगिता रंगरावजी बोकडे (लग्नापुर्वीचे नाव)**
वय ५२ वर्षे, व्यवसाय- मजुरी
रा.वार्ड क्र.३, बडे प्लॉट,पंचधारा रोड, पुलगांव, ता.देवळी, जि.वर्धा

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** **१. जया रंगरावजी बोकडे, वय - वयस्क,**
**रा.खरवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
**Through Next Friend गजानन बबनराव बोकडे,**
**रा.खरवाडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार व गैरअर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक रंगरावजी शामरावजी बोकडे** यांचा **मृत्यू दि.०९/१२/२०१३** रोजी तसेच **मृतक इंदू रंगरावजी बोकडे** हिचा **मृत्यू दि.०८/०६/२०१९** रोजी रा.खरवाडी ता.चांदूर बाजार जि.अमरावती येथे झालेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार व गैरअर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार व गैरअर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना व गैरअर्जदारांना मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२४३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.०६.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

# शहानूर धरणात फक्त ७६.२० टक्के जलसाठा

## रब्बीच्या नियोजनात प्रशासनाची कसरत



**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**
अंजनगाव सुर्जी आणि दर्यापूर या दोन्ही तालुक्यांची भाग्यरेषा मानल्या जाणाऱ्या शहानूर मध्यम प्रकल्पात यंदा समाधानकारक पाणीसाठा झाला आहे. पावसाने शेवटच्या टप्प्यात चांगली साथ दिल्यामुळे धरणाच्या जलसाठ्यात उल्लेखनीय वाढ झाली आहे. मात्र, ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतची पिण्याची आणि सिंचनाची एकूण गरज पाहता, उपलब्ध साठा काहीसा कमी असल्याने प्रशासनाला पाण्याचे काटेकोर नियोजन करावे लागणार आहे. सप्टेंबर महिन्याच्या उत्तरार्धात झालेल्या पावसामुळे धरणात पाण्याची चांगली आवक झाली.२३ सप्टेंबर २०२६ रोजी धरणाची पातळी ४४५.०० मीटर (पूर्ण साठवण पातळी ४४९.५० मीटर) होती, तर अवघ्या आठवड्याभरात, म्हणजेच ३० सप्टेंबर २०२६ च्या अधिकृत अहवालानुसार, उपयुक्त पाणीसाठा वाढून ३५.०९ दलघमी (७६.२०%) झाला आहे. सध्या धरणात नवीन पाण्याची आवक थांबल्यामुळे धरणाचे सर्व दरवाजे (गेट्स) बंद ठेवण्यात आले आहेत.याबाबत माहिती देताना शहानूर धरण प्रकल्पाचे शाखा अभियंता मनोज पावरा यांनी सांगितले की, पावसाच्या शेवटच्या टप्प्यामुळे धरणात सध्या ३५.०९ दलघमी पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. मात्र, पुढील वर्षाची म्हणजेच ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतची पिण्याची आणि सिंचनाची एकूण गरज ३९.०० दलघमी आहे. उपलब्ध साठा हा एकूण गरजेपेक्षा

शासन नियमानुसार पिण्याच्या पाण्याला आमचे सर्वोच्च प्राधान्य राहील. त्यानंतर उपलब्धतेनुसार रब्बी सिंचनाचे नियोजन केले जाईल. संभाव्य टंचाई टाळण्यासाठी नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी पाण्याचा अत्यंत काटकसरीने व योग्य वापर करावा,' असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.धरणात सध्या एकूण गरजेपेक्षा ३.९१ दलघमी पाणी कमी असल्याने रब्बी सिंचनासाठी पाण्याचे आवर्तन सोडताना प्रशासनाला विशेष कसरत करावी लागेल. त्यामुळे यंदा रब्बी पिकांचे नियोजन करताना शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा विचार करून कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांना प्राधान्य देणे फायद्याचे ठरणार आहे.

### आगामी वर्षाचे पाणी वाटप नियोजन

जलसंपदा विभागाच्या अहवालानुसार, पिण्याचे पाणी आणि रब्बी सिंचन मिळून एकूण ३९.०० दलघमी पाण्याची आवश्यकता आहे. यामध्ये पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

**अ) पिण्याच्या पाण्यासाठी एकूण गरज: ३०.५० दलघमी**
शहानूर प्रकल्पातून एकूण ३ प्रमुख प्रादेशिक पाणी पुरवठा योजना राबविल्या जातात
योजना १: १५६ गावे व २ शहरे पाणी पुरवठा योजना
योजना २: ७९ गावे पाणी पुरवठा योजना
योजना ३: पथ्रोट गाव पाणी पुरवठा योजना
(या योजनांसाठी प्रत्यक्ष वापर २५.०० दलघमी तर बाष्पीभवन व इतर वापरासाठी ५.५० दलघमी असे एकूण ३०.५० दलघमी पाणी राखीव ठेवावे लागेल.)

**ब) रब्बी सिंचनासाठी एकूण गरज: ८.५० दलघमी**
कालव्याद्वारे पाणी उपसा: ६.० दलघमी
कालवा उपसा सिंचन सहकारी पाणी वापर संस्था: २.५ दलघमी
धरणाची सद्यस्थिती (३० सप्टेंबर २०२६)

| घटक तपशील / | आकडेवारी |
|---|---|
| पूर्ण साठवण पातळी (FRL) | ४४९.५० मीटर |
| सध्याची पाणी पातळा | ४४५.०० मीटर |
| सध्याचा उपयुक्त जलसाठा | ३५.०९ दलघमी (Mm%) |
| पाणीसाठ्याची टक्केवारी | ७६.२०% |
| दरवाजांची स्थिती | सर्व दरवाजे पूर्णपणे बंद |

# नितेश गॅस एजन्सी समोर उन्हातानात नागरिकांच्या रांगा

## बुकिंगनंतरही सिलेंडर मिळण्यास विलंब; वितरण व्यवस्थेची चौकशी करा



**वलगांव/वार्ताहर**
वलगाव येथील नितेश गॅस एजन्सीच्या कथित गैरकारभारामुळे परिसरातील ग्राहकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात आली आहे. गॅस सिलिंडरचे बुकिंग केल्यानंतरही वेळेत सिलिंडर मिळत नसल्याने ग्राहकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

गॅस सिलेंडर ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक गरज असून, बुकिंगनंतर निर्धारित वेळेत त्याचे वितरण होणे अपेक्षित आहे. मात्र, वलगाव येथील नितेश गॅस एजन्सीच्या वितरण व्यवस्थेबाबत ग्राहकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. सिलेंडर मिळण्यासाठी विलंब होत असल्याने काही ग्राहकांना वारंवार एजन्सीशी संपर्क साधावा लागत असल्याचीही तक्रार आहे.

याशिवाय ग्राहकांना अपेक्षित सेवा मिळत नसल्याने तसेच तक्रारींची योग्य वेळी दखल घेतली जात नसल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात आला आहे. त्यामुळे गॅस वितरणातील विलंबाचे नेमके कारण काय, ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण कशा पद्धतीने केले जाते आणि वितरण व्यवस्था नियमानुसार सुरू आहे का, याची संबंधित विभागाने तपासणी करावी अशी मागणी वलगाव येथील सौरभ कुरळकर सामाजिक कार्यकर्ता व अफसर भाई सामाजिक कार्यकर्ता वलगाव यांनी केली आहे.

'नागरिकांच्या तक्रारी जाणून घेण्यासाठी आम्ही स्वतः नितेश गॅस एजन्सीला भेट दिली. सिलिंडर वितरण आणि ग्राहकांना मिळणाऱ्या सेवेसंदर्भात नागरिकांनी विविध अडचणी आमच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. संबंधित विभागाने या तक्रारींची वस्तुस्थिती तपासून ग्राहकांना वेळेत सेवा मिळेल, याची व्यवस्था करावी.'
**सौरभ कुरळकर,** वलगाव

'गॅस सिलिंडर ही प्रत्येक कुटुंबासाठी आवश्यक सेवा आहे. त्यामुळे बुकिंग केल्यानंतर ग्राहकांना वेळेत सिलिंडर मिळणे आणि त्यांच्या तक्रारींचे निराकरण होणे आवश्यक आहे. नागरिकांच्या अडचणींची गांभीर्याने दखल घेऊन वितरण व्यवस्था सुरळीत करण्याची गरज आहे.'
**अफसर भाई,** सामाजिक कार्यकर्ता वलगाव

## संक्षिप्त



### अधिकाऱ्यांची आष्टी प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट

**टाकरखेडा संभू-** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयएएस अधिकारी सत्यम गांधी यांनी बुधवारी आष्टी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट देऊन पाहणी केली.यावेळी त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातील नियोजन, स्वच्छता तसेच आरोग्य केंद्रातील विविध सुविधांची पाहणी केली. तसेच सहाय्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल उप्पलवार यांच्याकडून कामकाजाची माहिती घेतली. प्राथमिक आरोग्य केंद्रातील नियोजन व स्वच्छतेबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अचानक भेटीमुळे आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्येही सतर्कता दिसून आली.कर्मचारी अधिकारी डॉ. निखिल उप्पलवार वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माण अधिकारी रुनिता गांजारे, प्रयोग शाळा तंत्रज्ञ् वर्षा मोहोड, सतीश मेश्राम, नंदू खांनंदे, राजेंद्र लादे, संजय डोंगरे, विशाखा देवपारे रोशन हिवे, ओम हांडे, ममता वेव्हारे, सहेली सोनगडे इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

### समर्थ मारोटकरची नेमबाजीत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**अमरावती-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रायफल शूटिंग स्पर्धेत लाल बहादूर शास्त्री विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, शिवणी रसूलापूर येथील विद्यार्थी समर्थ प्रमोद मारोटकर याने उत्कृष्ट कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. अभय शूटिंग अकॅडमीचे प्रशिक्षक अभय धमाले यांच्या मार्गदर्शनाखाली समर्थ सातत्याने नेमबाजीचा सराव करीत आहे. आपल्या यशाबद्दल बोलताना समर्थ मारोटकर याने आपल्या यशाचे श्रेय वडील प्रमोद मारोटकर, आई संगीता मारोटकर, प्राचार्य डॉ. संजय खडसे तसेच आपले प्रशिक्षक अभय धमाले यांना दिले.समर्थच्या या यशाबद्दल संस्था अध्यक्ष अनिल दादा जवंजाळ तथा संस्थेच्या कार्यकारिणीच्या वतीने त्याचे अभिनंदन करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य व्ही. डी. काळे यांनी समर्थच्या यशाचे कौतुक करून त्याला आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी विद्यालयातील नवले, तुरंनकर, पवार, कसर, प्रा. डॉ. मनोज सपकाळ, आत्राम, मोटघरे, खरबडे, गुर्जर तसेच कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# श्री एकवीरा देवी संस्थानमध्ये शारदीय नवरात्र महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**
श्री एकवीरा देवी संस्थानमध्ये शारदिय नवरात्र उत्सवाला रविवारपासून प्रारंभ होत असून या निमीत्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन मंदिरात करण्यात आले आहे.

अश्विन शुध्द प्रतिपदा रविवारी ११ ला सकाळी ७.३० वाजता घटनस्थापना होईल व सकाळी १० वाजता ध्वजारोहण होईल. दैनंदिन कार्यक्रमात दररोज सकाळी ४ ते ६.३० वाजता पर्यंत भक्तांचे श्रीस अभिषेक षोडपोपचार पुजा व श्रृंगार आरती होईल. ११ ते १८ ऑक्टोंबर पर्यंत विविध भजनी मंडळाचे भजन व सायंकाळी प्रवचन व किर्तन होईल. दररोज दुपारी ११.३० वाजता नवैद्य व आरती होईल. दररोज सायंकाळी ७ वाजता विष्णुसहस्त्रनाम तथा मंत्र जागर होईल. दररोज रात्री ११.३० चे १ वाजेपर्यंत महाआरती व प्रसाद होईल. तर १९ ऑक्टोंबरला दुपारी ११ वाजता नवमीच्या हवनाला



सुरुवात होईल व सायंकाळी ६ वाजता पुर्णाहुती होईल. २० ऑक्टोंबरला दसऱ्याच्या दिवशी दुपारी ४ वाजता श्रींची पालखी सिमोल्लंघनास निघेल. या उत्सवानिमीत्ताने १६ ऑक्टोंबरला सकाळी ११ वाजता विश्व हिंदु परिषद मातृशक्ती व्दारा सप्तशती पाठाचे आयोजन सुध्दा मंदिर परिसरातील भक्तनिवास येथे करण्यात आले आहे. या नवरात्रमहोत्सवात श्री एकवीरा देवी अन्नक्षेत्र व जनकल्याण संस्था र्ते निःशुल्क महाप्रसादाची व्यवस्था दुपारी १२ ते २.३० वाजेपर्यंत करण्यात आली आहे.

या नवरात्रीउत्सवानिमीत्ताने ११ ते १८ ऑक्टोंबर पर्यंत दररोज रात्री ८ ते १० वाजेपर्यंत नागपूर येथील किर्तनकार ह.भ.प. राहुल अशोकराव गणोरकर यांचे सुश्राव्य किर्तन होईल. त्यांना हारमोनियमवर अतुल भातकुलकर व तबल्यावर स्वप्निल सरदेशमुख साथ संगत करतील. तर सोमवारी दि. १९ ऑक्टोंबरला रात्री ८ ते १० चांगापुर येथील ज्ञानसागर वारकरी संस्थानचे कार्याध्यक्ष ह.भ.प. शालिकराम महाराज खेडकर यांचे वारकरी किर्तन होईल.

श्री एकवीरा देवीच्या नवरात्र उत्सवातील धार्मिक कार्यक्रमाचा तसेच दर्शन व प्रसादाचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री एकवीरा देवी संस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# विद्यार्थिनीं गाजवले बॉक्स क्रिकेटचे मैदान

## इव्हेंट्स व स्कूल ऑफ स्कॉलर यांचा संयुक्त उपक्रम



**अमरावती/का.प्र.**
बेटी दिवसाचे औचित्य साधून १४ वर्षांखालील शालेय विद्यार्थिनींसाठी बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन अभिमान इव्हेंट्स व स्कूल ऑफ स्कॉलर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी स्कूल ऑफ स्कॉलरच्या बॉक्स क्रिकेट मैदानावर करण्यात आले.या स्पर्धेत शहरातील नामवंत शाळांमधील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या क्रिकेट कौशल्याचे दर्शन घडविले.

कार्यक्रमाचे उद्घाटन स्कूल ऑफ स्कॉलरचे प्राचार्य डॉ.एन.संतोष कुमार, नायब तहसीलदार स्नेहल देशमुख, इंजिनियर कुणाल देशमुख, स्कूल ऑफ स्कॉलरचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह हेड प्रशांत लिंगोटे, उपमुख्याध्यापिका समिधा नाहर तसेच कॉर्डिनेटर रीमा शर्मा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.स्पर्धेतील पहिला सामना हॅपी किड्स इंटरनॅशनल स्कूल विरुद्ध शोभाबेन सेठिया स्कूल ब्लेज यांच्यात झाला. या सामन्यात हॅपी किड्स इंटरनॅशनल स्कूलने विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यानंतर नारायणा विद्यालयम विरुद्ध शांतिनिकेतन इंटरनॅशनल स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात शांतिनिकेतनच्या विद्यार्थिनींनी सुरुवातीपासूनच सामन्यावर पकड मजबूत ठेवत विजय मिळविला आणि उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले. अंतिम सामना शांतिनिकेतन इंटरनॅशनल स्कूल आणि हॅपी किड्स इंटरनॅशनल स्कूल यांच्यात रंगला. या सामन्यात हॅपी किड्स इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी खुशी शिरसाट हिने एकाकी झुंज देत संघाला विजय मिळवून देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मात्र, शांतिनिकेतन इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थिनींनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत अंतिम सामना जिंकला आणि विजेतेपदाची ट्रॉफी आपल्या नावे केली. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात स्कूल ऑफ स्कॉलरचे सीईओ अभिषेक यांच्या हस्ते विजेता व उपविजेता संघातील गौरविण्यात आले.संपूर्ण सामन्यात करिता देवेंद्र कपिले क्रिकेट ॲकॅडमीचे पंचगिरी प्रेम बमनेल व कार्तिक वाघमारे यांनी केली. कार्यक्रमाचे समालोचन महेश मुळे यांनी केले.

# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात खाद्यसंस्कृतीवर प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**परतवाडा :** भारतीय विद्यामंदिर, अमरावतीद्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथील गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी 'महाराष्ट्रातील पारंपरिक सण व खाद्यसंस्कृती' या विषयावर दहा दिवसीय निःशुल्क प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राची समृद्ध खाद्यपरंपरा, विविध सण-उत्सवांशी निगडित खाद्यपदार्थ आणि त्यामागील सांस्कृतिक व पोषणात्मक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, तसेच ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, हा या अभ्यासक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन प्रा.डॉ. प्रमोद गारोडे यांच्या हस्ते



करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील विविध पारंपरिक सण व त्यांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांची माहिती मिळणार हे होते. त्याचबरोबर सणांमध्ये तयार केल्या जाणाऱ्या पारंपरिक खाद्यपदार्थांचा अभ्यास करून त्यांच्या पौष्टिक मूल्यांची आणि आरोग्यविषयक महत्त्वाची माहिती विद्यार्थ्यांना प्राप्त झाली. पारंपरिक खाद्यसंस्कृतीच्या जतन व संवर्धनासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे आणि आधुनिक जीवनशैलीमध्ये या परंपरांचे महत्त्व अधोरेखित करणे, हेही या अभ्यासक्रमाचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते.

या अभ्यासक्रमासाठी बी.ए. भाग-१, बी.ए. भाग-२, बी.ए. भाग-३ तसेच एम.ए. भाग-१ व भाग-२ या वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. गृहअर्थशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. दयाश्री कोकाटे तसेच सहयोगी प्राध्यापिका प्रा.जोत्स्ना भोयर, प्रा. प्रीती नवरे, डॉ. प्रिया सगणे यांच्या समन्वयातून हा अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाशी जोडण्याचा हा उपक्रम राबविण्यात आला. आजच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये पारंपरिक सण आणि घरगुती खाद्यपदार्थांचे महत्त्व काही प्रमाणात कमी होत असताना, विद्यार्थ्यांना आपल्या सांस्कृतिक मुळांशी जोडण्यासाठी हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम महत्त्वपूर्ण ठरला. 'पारंपरिक सण आणि खाद्यसंस्कृती ही केवळ परंपरा नसून आपल्या समाजाच्या आरोग्य, संस्कृती आणि कुटुंबव्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे', हा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.



# डॉ.अमृतकर यांचा सपत्नीक सन्मान

**तिवसा-** आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनतर्फे आयोजित निसर्गोपचार गौरव सन्मान पुरस्कार सोहळ्यात तिवसा येथील निसर्गोपचार तज्ञ डॉ. मनीषा संदीप अमृतकर व डॉ.संदीप अमृतकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यात डॉ. संदीप अमृतकर यांचाही गौरव करण्यात आला. डॉ.संदीप अमृतकर हे डॉ.मनीषा अमृतकर यांच्या निसर्गोपचार व योग क्षेत्रातील कार्याला विशेष सहकार्य करतात. या कार्यक्रमास बुलढाणा मतदार संघाचे आ.संजय गायकवाड, नगराध्यक्ष पुष्पा गायकवाड, आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे चेअरमन डॉ. सतीश कराळे, डॉ.नितीन राजे, डॉ. बाबुराव कानडे, डॉ. विजय नवल पाटील, गंगाप्रसाद खरात, डॉ. सचिन सुर्पे उपस्थित होते.

# कुंभमेळयात बालकल्याण क्षेत्रात परदेशी संस्था, कंपन्यांना परवानगी देऊ नये

## विश्वमंगल्य स्वनाथ परिषदेची मुख्यमंत्री मोहन यादव यांच्याकडे मागणी

**अमरावती-** अनाथ तसेच जन्मजात अपंग मुलांच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी कार्यरत असलेल्या विश्वमंगल्य स्वनाथ परिषदेच्या (व्हीएमएसपी) अखिल भारतीय कार्यशाळेत बालकल्याण आणि बालसंरक्षणाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उज्जैन येथील विक्रमादित्य भवन येथे २, ३ व ४ ऑक्टोबरदरम्यान झालेल्या या कार्यशाळेला देशभरातील परिषदेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

परिषदेचे मार्गदर्शक प्रशांत हरताळकर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था गेल्या



अनेक वर्षांपासून अनाथ आणि जन्मजात अपंग मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. मुलांना दर्जेदार शिक्षण, आरोग्यसेवा तसेच व्यावसायिक आणि लष्करी प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचे काम संस्थेमार्फत केले जात आहे.

विश्वमंगल्य स्वनाथ परिषद भारत सरकार, नवी दिल्ली येथील सावित्रीबाई फुले राष्ट्रीय महिला व बाल विकास संस्थेच्या (SPNIWCD) सहकार्यानेही काम करीत आहे. देशातील पाच जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण करण्याबरोबरच विभागासाठी प्रशिक्षण संस्था म्हणून कार्य करण्यासाठी SPNIWCD सोबत परिषदेने सामंजस्य करार (MoU) केला आहे.दरम्यान, उज्जैन येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर बालके आणि बालकल्याण क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था तसेच कंपन्या भारतीय असाव्यात, असा महत्त्वपूर्ण ठराव कार्यशाळेत मंजूर करण्यात आला. या क्षेत्रात परदेशी स्वयंसेवी संस्था आणि परदेशी कंपन्यांना काम करण्यास परवानगी देऊ नये, अशी भूमिका परिषदेने मांडली आहे.

उत्तर प्रदेशात झालेल्या कुंभमेळ्यादरम्यान या निर्णयाचे सकारात्मक परिणाम दिसून आल्याचा दावा परिषदेने केला आहे. त्यामुळे मंजूर ठरावाची तातडीने अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी विश्वमंगल्य स्वनाथ परिषदेने मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव तसेच राज्य सरकारकडे केली आहे.बालकल्याण आणि बालसंरक्षणाच्या क्षेत्रात प्रभावी, पारदर्शक आणि जबाबदार व्यवस्था निर्माण करण्यासाठी परिषद पुढेही प्रयत्नशील राहणार असून, या विषयाकडे संपूर्ण समाजाचे लक्ष वेधण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

# विलास राठोड यांच्या कुटुंबीयांना खा.वानखडे यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द

**तिवसा/वार्ताहर**
जावरा फत्तेपूर येथील विलास राठोड यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणी महावितरणकडून त्यांच्या कुटुंबीयांना चार लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे. खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते कुटुंबीयांना धनादेशाचे वितरण करण्यात आले. १० ऑक्टोबर २०२४ रोजी नवरात्रोत्सव दरम्यान जावरा फत्तेपूर येथे विलास राठोड यांचा विद्युत प्रवाह संचारलेल्या जिवंत तारेला स्पर्श होऊन मृत्यू झाला होता.सदर घटना महावितरणच्या निष्काळजीपणामुळे घडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला होता. या प्रकरणी तत्कालीन परिस्थितीत महावितरण



कार्यालय तसेच उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात चांगलाच तणाव निर्माण झाला होता,प्रसंगी खा.बळवंत वानखडे तसेच तत्कालीन आ.यशोमती ठाकूर यांच्या कार्यतत्परतेने व मध्यस्थीने प्रकरण शांत केले होते व कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते.कर्त्या पुरुषाच्या अकाली निधनामुळे राठोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून,घरातील एकमेव कमावती व्यक्ती गेल्याने पत्नी, दोन लहान मुली व वृद्ध आई यांच्या मृतांच्या कुटूंबियांना धनादेश देते वेळी सामाजिक कार्यकर्ते मुकूंद पूनसे,सुनील मोंढे, विष्णू राठोड,विनोद मोंढे,नरेश भोयर,संजय ठाकरे,अमोल बोके,उद्धवराव पैठणकर, लक्ष्मण राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय





# ४८ कोटींच्या वसुलीची जबाबदारी नेमकी कोणाची?

## तहसीलदार, एसडीओंचे 'कानावर हात'; कागदी कारवाईतून जबाबदारी झटकण्याचा आरोप

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** शासनाचे तब्बल ४८ कोटी रुपये दंडापोटी थकीत असताना या रकमेच्या वसुलीची प्रत्यक्ष जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल आता ऐरणीवर आला आहे. मालमत्तेवर बोजा चढविणे, प्रस्ताव पाठविणे आणि कागदी कार्यवाही दाखविण्यापलीकडे प्रत्यक्ष वसुलीसाठी काय झाले, याचे उत्तर महसूल प्रशासनाकडून अद्याप स्पष्टपणे समोर आलेले नाही. त्यामुळे 'फाईल फिरतेय; पण ४८ कोटींची वसुली कुठे?' असा सवाल उपस्थित होत आहे.

दंडग्रस्त संतोष चांडक यांच्या प्रकरणात वसुलीची प्रक्रिया सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात असले, तरी दुसरीकडे त्यांच्या उद्योगांची चाके सुरू असल्याचे चित्र असल्याचा आरोप आहे. शासनाची देणी थकीत असताना संबंधित व्यक्तीची कंत्राटी देयकेही शासनाकडून अदा होणार असतील, तर दंडवसुलीच्या प्रक्रियेला त्याचा परिणाम होतोय का, याची तपासणी करण्याची मागणी होत आहे.

### ■ तहसीलदार-एसडीओंची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

वसुलीच्या प्रक्रियेत तहसीलदार कार्यालयाची भूमिका महत्त्वाची असताना प्रस्ताव, विहित नमुना, कागदपत्रे आणि पुढील कार्यवाहीच्या नावाखाली प्रकरण लांबणीवर पडत असल्याचा आरोप आहे. तहसीलदार कार्यालयाकडून प्रस्तावात त्रुटी राहिल्या असतील, तर त्या दूर करून तातडीने पुढील कार्यवाही करण्याची जबाबदारीही प्रशासनाचीच आहे. दुसरीकडे उपविभागीय स्तरावरही या प्रकरणाची प्रभावीपणे दखल घेतली जात आहे का, हा प्रश्न आहे. ४८ कोटींच्या शासकीय थकबाकीच्या प्रकरणात तहसीलदार आणि एसडीओ दोन्ही पातळ्यांवर जबाबदारीची चेंडूफेक सुरू असेल, तर शेवटी शासनाच्या तिजोरीचे नुकसान कोण भरून काढणार? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

**कंत्राटी देयकांवर 'ब्रेक' का नाही?**

४८ कोटींच्या दंडाची वसुली प्रलंबित असताना संबंधित दंडग्रस्ताची शासनाकडील कंत्राटी देयके किती आहेत? त्यातील किती रक्कम रोखून धरण्यात आली? दंडाच्या थकबाकीशी या देयकांचे समायोजन करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. जर शासनाकडे देय असलेली मोठी रक्कम वसूल करायची असेल, तर शासनाकडून संबंधिताला देय असलेल्या रकमेबाबत महसूल प्रशासनाने संबंधित विभागांना काही निर्देश दिले आहेत का, याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. एकीकडे सरकारचे ४८ कोटी थकीत आणि दुसरीकडे त्याच सरकारकडून देयके मिळत असतील, तर ही विसंगती नेमकी कोणाच्या परवानगीने? असा सवाल उपस्थित होत आहे.

### वरिष्ठ अधिकारी 'माहिती नाही'च्या भूमिकेत?

या प्रकरणाबाबत वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता संबंधित प्रकरणाची सविस्तर माहिती नसल्याची भूमिका घेतली जात असल्याचा आरोप आहे. ४८ कोटींच्या शासकीय महसुलाशी संबंधित प्रकरणाबाबतच जर अधिकारी वर्ग 'माहिती नाही' असे सांगत असेल, तर मग या प्रकरणाचा पाठपुरावा कोण करीत आहे, असा प्रश्न निर्माण होतो. दंडाची रक्कम निश्चित झाल्यापासून आजपर्यंत कोणत्या अधिकाऱ्याने कोणती कार्यवाही केली, कोणत्या दिवशी कोणती नोटीस बजावली, जप्ती-लिलावासाठी प्रस्ताव कधी तयार झाला, तो कुठे प्रलंबित राहिला आणि प्रत्यक्षात किती रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा झाली, याचा दिनांकनिहाय आणि अधिकाऱ्यानिहाय हिशेब जनतेसमोर येणे आवश्यक आहे.

४८ कोटींच्या थकबाकीदाराला कागदावर बोजा आणि प्रत्यक्षात व्यवसाय सुरू, अशी परिस्थिती असेल तर महसूल प्रशासनाची कारवाई नेमकी कोणासाठी आणि कशासाठी? हा प्रश्न आता केवळ प्रशासनाला नव्हे, तर वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांनाही उत्तर द्यावे लागणार आहे. या संपूर्ण प्रकरणात दंडवसुलीस विलंबाची कारणे, कंत्राटी देयकांबाबत झालेली कार्यवाही आणि संबंधित उद्योगांच्या सद्यस्थितीची स्वतंत्र चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# २१ गोवंशांची सुटका; दोघे संशयित फरार

## लालखडीतील टिनाच्या शेडवर गुन्हे शाखेची धाड



**अमरावती/प्रतिनिधीः-** कत्तलीच्या उद्देशाने आखूड दोराने निर्दयतेने बांधून ठेवलेल्या तब्बल २१ गोवंशांना गुन्हे शाखेच्या पथकाने जीवदान दिले. लालखडी परिसरातील एका प्लॉटवरील टिनाच्या शेडमध्ये ही जनावरे अमानुष अवस्थेत डांबून ठेवण्यात आली होती. यामध्ये १० गायी आणि ११ गोरे-बैलांचा समावेश असून, त्यांची अंदाजे किंमत ३ लाख ३० हजार रुपये आहे. या प्रकरणातील अनिक कुरेशी आणि अतिक कुरेशी (दोघेही रा. गवळीपुरा, अमरावती) हे संशयित फरार आहेत. गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार ८ ऑक्टोबर रोजी वरिष्ठांच्या आदेशानुसार अमरावती शहर आयुक्तालयाच्या हद्दीत अवैध धंदे आणि गुन्हेगार तपासणीसाठी पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी लालखडी परिसरातील एका टिनाच्या शेडमध्ये कत्तलीसाठी गोवंश डांबून ठेवल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. माहितीची खात्री करून महापालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना याची माहिती देण्यात आली. ☞(पान २ वर)

# नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीत १५ दिवस जमावबंदी



**अमरावती/प्रतिनिधीः-** नवरात्रोत्सव, दुर्गादेवी व शारदादेवींच्या मूर्तींची स्थापना तसेच दसरा आणि दुर्गादेवी विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) व ३७(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजेपासून २३ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत, म्हणजेच एकूण १५ दिवस हे निर्बंध लागू राहणार आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ११ ऑक्टोबरपासून नवरात्रोत्सव व शारदोत्सवास प्रारंभ होणार असून, या काळात दुर्गादेवी व शारदादेवींच्या मोठ्या प्रमाणात मूर्तींची स्थापना केली जाणार आहे. तसेच अंबादेवी व एकवीरादेवी मंदिर परिसरात यात्रेचे आयोजन ☞(पान २ वर)

# बालगृहातील तीन मुलींच्या कुटुंबाचा शोध





**अमरावती/प्रतिनिधीः-** येथील शासकीय मुलींच्या बालगृहात दाखल झालेल्या मोना,अनामिका आणि सोनी अकील यादव यांना भेटण्याकरिता आजपर्यंत त्यांचे आई -वडिल व नातेवाईक आलेले नाहीत. मुलींचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने त्यांच्या कुटुंबियांचा शोध सुरु असल्याचे बालगृहाच्या अधिक्षकांनी कळविले आहे.

नांदगाव पेठ पोलीस स्टेशन अंतर्गत १२ ऑगस्ट २०२६ रोजी मोना ही बालिका,भातकुली पोलीस स्टेशन मार्फत, तर ४ सप्टेंबर २०२५ रोजी अनामिका ही बालिका आणि अमरावती रेल्वे पोलिसांमार्फत १४ ऑगस्ट २०२६ रोजी सोनी अकील यादव ही बालिका बाल कल्याण समितीच्या आदेशाने शासकीय मुलींच्या बालगृहात दाखल झाल्या आहेत.

मोना ही बालिका दामिनी पथकाला नांदगाव पेठ जवळील मंदिरात आढळून आली.तिचे वय साधारणत: १६ ते १८ वर्षा दरम्यान असून उंची १४४ सेमी तर वजन ३६ किलो ,वर्ण सावळा आहे.

अनामिकाही ही माईल्ड मतिमंद असून तिचे वय १२ ते १६ वर्षा दरम्यान आहे. तिचे वजन १५☞(पान २ वर)

**परतवाड्यात धक्कादायक घटनेने खळबळ**

# वृद्धावर हल्ला की स्वतः कापले गुप्तांग?

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या चिखलदरा स्टॉप ते लॉगींग युनिट चौकाकडे जाणाऱ्या रस्त्या दरम्यान लॉगींग युनिट कार्यालयासमोरच भरदिवसा दुपारी ३:०० वाजताच्या सुमारास एक अत्यंत थरारक घटना घडली आहे. एका वृद्धाचे गुप्तांग कापल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.त्या वृद्धावर हल्ला झाला आहे की त्या वृद्धानेच हे पाऊल उचलले ? हे पोलिस चौकशीनंतरच पुढील तपासत स्पष्ट होणार आहे .वृत्त लिहेपर्यंत त्या वृद्धाला प्राथमिक उपचार अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात करून अमरावती येथे शासकीय रुग्णालयात त्या वृद्धावर उपचार सुरू असून शस्त्रक्रिया होणार असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी तीनच्या सुमारास लॉगींग युनिट कार्यालयासमोर ही घटना घडली☞(पान २ वर)

# SIR प्रक्रियेविरोधात इंडिया आघाडीचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## निवडणूक आयोग व शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी




**अमरावती/प्रतिनिधीः-** विशेष सखोल पुनरावृत्ती (SIR) प्रक्रियेतील कथित अनियमितता, मतदारांची नावे वगळण्याचा प्रकार आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात इंडिया आघाडीच्या वतीने गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. गर्ल्स हायस्कूल चौकातून दुपारी साडेबारा वाजता सुरू झालेल्या या मोर्चात महाविकास आघाडीतील विविध घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने ☞(पान २ वर)

# खून प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

**-ॲड.प्रकाश देशमुख यांचा प्रभावी युक्तिवाद**



**अमरावती/प्रतिनिधीः-** सन २०१६ मधील खून प्रकरणात आरोपी क्र. १ शरद रमेशराव कुमारे यांची कलम ३०२ व १२०-B सह ३४ अंतर्गत आरोपातून अमरावती सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. आरोपी क्र. १ च्या वतीने ॲड. प्रकाश एम. देशमुख यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

सदर प्रकरण परिस्थितिजन्य पुराव्यांवर आधारित होते. बचाव पक्षाने आरोपीविरुद्ध खुनाचा ठोस हेतू, गुन्हेगारी कट तसेच मृत व्यक्तीसोबत शेवटचे एकत्र असल्याचा पुरेसा व विश्वासार्ह पुरावा अभियोजन पक्षाकडून सिद्ध झालेला नसल्याचा युक्तिवाद केला. न्यायालयाने परिस्थितिजन्य पुराव्यांची साखळी पूर्णपणे सिद्ध झाली नसल्याचे निरीक्षण नोंदविले. सत्र न्यायाधीश सौ. यू. एम. नंदेश्वर☞(पान २ वर)

# दर्यापूर ज्वेलर्स दरोडा टोळीवर मकोका

## पाच आरोपींवर कायद्यान्वये कारवाई; तिघांना अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथील ज्वेलर्स दुकानावर शस्त्रांचा धाक दाखवून दरोडा टाकणाऱ्या टोळीविरुद्ध अमरावती ग्रामीण पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई केली आहे. विविध जिल्ह्यांत गंभीर गुन्हे दाखल असलेल्या या टोळीवर प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून मकोकाची कलमवाढ करण्यात आली आहे.

१ ऑगस्ट २०२६ रोजी दर्यापूर येथील गोविंद गजानन माहोरे यांच्या ज्वेलरी दुकानावर दरोडा पडला होता. जितेंद्र मनसाराम चव्हाण (रा. उमरी, अकोट), शुभम संतोष चांदुरकर (रा. वाडी, खामगाव), अजय मोहन तायडे (रा. खामगाव), विश्वजीत विठ्ठलसिंग सिसोदे (रा. खामगाव) आणि दिनेश उर्फ दिनकर आप्पा नराळे (रा. सातारा) यांनी शस्त्रांचा धाक दाखवून दुकानातील सोन्या-चांदीचे दागिने लुटून नेल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने समांतर तपास करून आरोपी निष्पन्न केले. त्यापैकी जितेंद्र चव्हाण, शुभम चांदुरकर आणि अजय तायडे यांना अटक करून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासली असता त्यांच्याविरुद्ध विविध जिल्ह्यांत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आल्याचे सांगण्यात आले. हे आरोपी वेगवेगळ्या साथीदारांसह स्वतंत्रपणे अथवा संयुक्तपणे संघटित☞(पान २ वर)

# हातभट्टी दारू विक्रेता एक वर्षासाठी स्थानबद्ध

## लोणीतील अतुल खंडाळेवर कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** अवैध गावठी हातभट्टी दारूची निर्मिती व विक्री करून परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या लोणी (ता. वरुड) येथील अतुल बाबाराव खंडाळे (वय ३९) याच्यावर अमरावती ग्रामीण पोलिसांनी स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी खंडाळे याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. ६ ऑक्टोबर रोजी या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली. अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबरोबरच आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे निर्देश पोलिस अधीक्षक निकेतन कदम ☞(पान २ वर)

# मनपा कार्यालयातील लाचखोर कनिष्ठ लिपिक ताब्यात

## कर आकारणी नोंद नावावर करण्यासाठी लाच; एसीबीची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** घराची कर आकारणीची पावती आपल्या नावावर करून देण्यासाठी १ हजार ५०० रुपयांची लाच मागून ती स्वीकारणाऱ्या अमरावती महापालिकेच्या झोन क्रमांक ३ कार्यालयातील कनिष्ठ लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने गुरुवारी, ८ ऑक्टोबर रोजी रंगेहात पकडले. भागीरथ अंबादासराव खैरकर (४८, रा. शिवछाया कॉलनी, शंकरनगर, अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या कनिष्ठ लिपिकाचे नाव आहे. सायन्सकोर मैदान परिसरातील जिल्हा परिषद शाळेजवळ ही कारवाई करण्यात आली.एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, ५० वर्षीय तक्रारदाराच्या वडिलांनी त्यांच्या नावावर एका घराचे बक्षीसपत्र केले होते. ☞(पान २ वर)

# मुदत संपलेली २४१ बिस्किटांची पाकिटे दुकानात

## मोर्शीतील जनता पान सेंटरवर एफडीएची कारवाई



**मोर्शी/प्रतिनिधीः-** बिस्किटांच्या पाकिटांवरील वापरण्याची अंतिम तारीख संपूनही त्यांचा साठा दुकानात ठेवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार मोर्शीतील सिंभोरा चौक परिसरात समोर आला. 'जनता पान सेंटर'च्या तपासणीत ऑगस्ट २०२६मध्येच मुदत संपलेल्या चार प्रकारच्या बिस्किटांची तब्बल २४१ पाकिटे आढळून आली. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने हा साठा ताब्यात घेत कारवाई केली. ब्रिटानिया टायगर नारियल, गुड डे कॅश्यू कुकीज, गुड डे बटर कुकीज आणि मस्का चस्का या चार प्रकारच्या बिस्किटांचा यात समावेश आहे. या साठ्याची किंमत २ हजार ४१० रुपये आहे. ७ ऑक्टोबर रोजी अन्न सुरक्षा अधिकारी जी. पी. दंदे यांच्या पथकाने पंचांसह सिंभोरा रोडवरील ☞(पान २ वर)

# दस्तूर नगरजवळ आढळला तरुणाचा मृतदेह

## आजारामुळे मृत्यू झाल्याचा अंदाज




**अमरावती/प्रतिनिधीः-** दस्तूर नगर चौकाजवळ आज गुरुवार ८ ऑक्टोबरच्या सकाळी एका तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. मृताची ओळख सुनील भगवान शिंदे (वय ३८, भानखेडा) अशी पटली आहे. माहितीनुसार गुरुवारी सकाळी दस्तूर नगर परिसरात अनोळखी तरुणाचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह दिसल्याची माहिती मिळताच हा हत्येचा प्रकार असावा, अशी शंका व्यक्त केली जात होती. त्यामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण ☞(पान २ वर)

